
सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, ५ जून २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २०७ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राष्ट्र म्हणजे काय? राष्ट्राची व्याख्या सांगण्याची आवश्यकता नाही. आपल्या राष्ट्राचा आम्हाला साक्षात्कार झाला असून ते राष्ट्र हिंदू राष्ट्र आहे. भारतीय जीवनात ज्याला हिंदू समाज या नावाने ओळखतात त्याच्याच वैशिष्ट्यांनी भरलेले हे राष्ट्र आहे. संघकार्यनिर्मितीच्या प्रारंभापासूनच हा विचार आपण स्पष्टपणाने समोर ठेवला आहे. म्हणूनच संघाचे नाव राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ठेवले आहे.

**- श्रीगुरुजी**
रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक

# देशभरात दोन टप्प्यात जातनिहाय जनगणना

## १ ऑक्टोबर २०२६ पासून चार राज्यांतून सुरुवात

**नवी दिल्ली, ४ जून**

केंद्र सरकारने बुधवारी जातनिहाय जनगणनेला हिरवा कंदील दिला आहे. त्यानुसार देशभरात जातनिहाय जनगणना दोन टप्प्यात होणार असून पहिला टप्पा १ ऑक्टोबर २०२६ पासून तर दुसरा टप्पा १ मार्च २०२७ पासून सुरू होणार आहे. पहिल्या टप्प्यात उत्तराखंड, हिमाचल, लडाख आणि जम्मू आणि काश्मीर या चार राज्यात जनगणना होणार आहे. त्यानंतर ५ महिन्यानंतर देशातील इतर राज्यात जातनिहाय जनगणना होणार आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेत झालेल्या मंत्रिगटाच्या बैठकीत आगामी जनगणनांमध्ये जातींच्या जनगणनेचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, बैठकीत देशभरात जनगणनेसोबत जातनिहाय जनगणना करण्याच्या निर्णयाला मंजुरी देण्यात आली. जनगणना दोन टप्प्यात केली जाणार आहे. देशभरात दोन टप्प्यात ही जनगणना केली जाणार असून डोंगरी भागात म्हणजेच लडाख, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड येथून १ ऑक्टोबर २०२६ पासून जनगणनेला सुरुवात होणार आहे. देशातील इतर राज्यात १ मार्च २०२७ पासून जनगणना केली जाईल. यापूर्वी २०११ मध्ये देशात जनगणना झाली. त्यानंतर २०२१ मध्ये जनगणना होणे अपेक्षित होते. मात्र, कोरोना महामारीमुळे जनगणना घेण्याचा निर्णय झाला नाही. विशेष असे की, १८८१ ते १९३१ पर्यंत नियमितपणे होणारी जातनिहाय जनगणना १९५१ च्या पहिल्या जनगणनेत थांबवण्यात आली होती.

### जातनिहाय जनगणना म्हणजे काय?

जातनिहाय जनगणना ही एक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये देशाच्या किंवा प्रदेशाच्या लोकसंख्येचे सर्वेक्षण करून विविध जाती आणि सामाजिक गटांची संख्या, सामाजिक-आर्थिक स्थिती आणि इतर लोकसंख्याशास्त्रीय माहिती गोळा केली जाते. याचा वापर विविध धोरणे आणि योजनांमध्ये केला जातो, ज्यामुळे जनतेला फायदा होतो आणि सरकारला योग्य आकडे जाणून घेण्यासदेखील मदत होत

## संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून

**नवी दिल्ली, ४ जून**

संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून सुरु होणार असल्याची घोषणा संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज केली. संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सांसदीय कामकाजविषयक समितीने संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून सुरु करून १२ ऑगस्टपर्यंत चालवण्याची शिफारस केली आहे.

ही शिफारस मंजुरीसाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे पाठवण्यात आली असल्याचे रिजिजू यांनी सांगितले. इंडिया आघाडीतील १६ राजकीय पक्षांनी ऑपरेशन सिंदूरनंतर उदभवलेल्या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलवावे, अशी मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली असताना सरकारने पावसाळी अधिवेशनाच्या तारखा जाहीर करुन टाकल्या आहेत. अप्रत्यक्षपणे सरकारने विशेष अधिवेशनाची विरोधी पक्षांची मागणी फेटाळून लावली.




## ली जे म्युंग होणार दक्षिण कोरियाचे नवे राष्ट्रपती

**सेऊल :** दक्षिण कोरियातील राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत डाव्या विचारसरणीच्या उदारमतवादी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ कोरियाचे नेते ली जे म्युंग यांनी विजय मिळवला. त्यांनी सत्ताधारी पीपल पॉवर पार्टीचे किम मून सू यांचा पराभव केला.



सुरुवातीच्या मतमोजणीत ली ४८.३१ टक्के मतांसह आघाडीवर होते, तर किम यांना ४२.९ टक्के इतकी मते मिळाली. विजयानंतर ली म्हणाले, मी मतदारांचे आभार मानतो. मी ही जबाबदारी कधीही विसरणार नाही आणि देशाला एकत्र करण्यासाठी, अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आणि उत्तर कोरियासोबत शांतता प्रस्थापित करण्यासाठी काम करेल. त्याचवेळी, किम मून यांनी पराभव स्वीकारताना म्हटले की, मी जनतेचा निर्णय नम्रपणे स्वीकारतो आणि ली जे म्युंग यांना विजयासाठी शुभेच्छा देतो. राष्ट्रपती निवडणुकीत एकूण मतदान ७८.३ टक्के झाले, जे १९९७ नंतरचे सर्वाधिक आहे. तर २०२२ च्या राष्ट्रपती निवडणुकीत ७७.१ टक्के मतदान झाले.

# जल्लोषाला गालबोट; चेंगराचेंगरीत ११ ठार

## चिन्नास्वामी मैदानाबाहेरील घटना, अनेक जखमी

**बंगळुरू, ४ जून**

१८ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर रॉयल्स चॅलेंजर बंगळुरू संघाने आयपीएल स्पर्धा जिंकली. हा विजय साजरा करण्यासाठी येथील चिन्नास्वामी मैदानावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी मैदानाबाहेर हजारो नागरिक जमले. यावेळी चेंगराचेंगरी होऊन ११ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जखमी झाले.



या घटनेमुळे जल्लोषाला गालबोट लागले. बंगळुरू संघाने प्रतिष्ठेची आयपीएल स्पर्धा प्रथमच जिंकली. दुसऱ्या दिवशी चिन्नास्वामी मैदानावर विजय साजरा करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मैदानावर पोहोचण्यापूर्वी विधानसभा सचिवालयाच्या पायऱ्यावर विजयी संघाचा गौरव करण्यात आला. त्यानंतर संघ थेट मैदानावर पोहोचला. मैदान आणि मैदानाबाहेर लाखोंच्या संख्येने चाहते जमले. मैदानाची क्षमता ३५ हजार असताना अडीच ते तीन लाखांच्या आसपास नागरिक जमले. एकच गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी होऊन कित्येक बेशुद्ध पडले. त्यांना रुग्णालयात दाखल केले. यापैकी ११ जणांचा मृत्यू झाला तर शेकडो जखमी झाले. श्वास गुदरमल्याने मृत्यू झाल्याचे बोलले जाते.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### कोहली इतर कोणापेक्षाही जास्त पात्र : पाटीदार

**अहमदाबाद** : हे माझ्यासाठी, विराट कोहलीसाठी आणि सर्व चाहत्यांसाठी खरोखरच खास आहे. ज्यांनी वर्षानुवर्षे पाठिंबा दिला आहे, ते सर्वजण ते पात्र आहेत. माझ्यासाठी ही एक उत्तम संधी आहे आणि कोहलीचे नेतृत्व करणे माझ्यासाठी एक उत्तम धडा आहे, तो इतर कोणापेक्षाही जास्त पात्र आहे, असे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा (आरसीबी) कर्णधार रजत पाटीदार म्हणाला. १८ वर्षांच्या दुःख व निराशेनंतर आरसीबीने पहिल्यांदाच आयपीएल चषक जिंकला. ड्रेसिंग रूममध्ये झालेल्या जल्लोषादरम्यान कोहलीने संपूर्ण स्पर्धेत रजत पाटीदारने केलेल्या संघ नेतृत्वाचे कौतुक केले व कर्णधाराबद्दल आदर दाखवला. रजतने आघाडीवरून संयमाने नेतृत्व केले. त्याचा शांत स्वभाव संपूर्ण स्पर्धेत पूर्णपणे अभूतपूर्व होता, असे कोहली म्हणाला. याच ठिकाणी भारताने २०२३ च्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध पराभव पत्करला होता, त्यानंतर जेतेपदाच्या लढतीपर्यंत कोहली अजिंक्य राहिला होता. तो जबरदस्त फॉर्ममध्ये होता. विजयी खेळी करणाऱ्या खेळाडूंचा समूह वेगवेगळ्या टप्प्यांवर पुढे येत आहेत आणि आरसीबीसोबत मी हे करू शकलो याचा मला आनंद आहे. कृणाल हा बळी टिपणारा गोलंदाज आहे. सुयशने सुद्धा संपूर्ण हंगामात चांगली कामगिरी केली. शेफर्डने अंतिम सामन्यात महत्त्वाचा गडी बाद केला, असे कोहली म्हणाला.

### आम्ही पुढच्या वर्षी परत येऊ, चषक जिंकू : श्रेयस अय्यर

**अहमदाबाद** :निर्भयपणे खेळणारे नवोदित खेळाडू फ्रॅन्चायझीसाठी सर्वात मोठी शळ शिदोरी आहे. पुढील आयपीएल हंगामात



आम्ही पुन्हा येऊ आणि सर्वतोपरी खेळून आयपीएलचा किताब जिंकू, असा विश्वास पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यर याने व्यक्त केला. आमच्या संघातील प्रत्येक खेळाडूचा अभिमान आहे, अनेक तरुणांनी आपला पहिला हंगाम खेळला. त्यांची निर्भयता अद्भूत होती. कर्तव्ये अजूनही अर्धे झाले आहे, पुढच्या वर्षी आपल्याला तो जिंकायचा आहे. आम्ही प्रत्येक सामन्यात ज्या पद्धतीने खेळलो ते सकारात्मक होते, त्यांना खूप अनुभव मिळाला आहे आणि पुढच्या वर्षी आपण त्यावर भर देऊ शकतो, असे श्रेयस आपल्या सवंगड्यांना म्हणाला. अहमदाबादच्या खेळपट्टीवर दोनशेपेक्षा कमी धावा करणे ही एक चांगली धावसंख्या होती. त्यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. कृणाल अद्भूत होता, त्याने आपल्या अनुभवाचा वापर केला, तोच टर्निंग पॉइंट होता, असे श्रेयस म्हणाला.

### डब्ल्यूटीसीमध्ये स्मिथ चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करणार

**नवी दिल्ली** : आगामी ११ ते १५ जून दरम्यान लॉर्ड्सवर होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्टीव्ह स्मिथ चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करेल, अशी ऑस्ट्रेलियाचा कसोटी कर्णधार पॅट कमिन्सने पुष्टी केली आहे. कसोटीत चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना २३ शतके व २६ अर्धशतके झळकावणाऱ्या स्मिथने पहिल्या डावात शतक ठोकले होते, त्यामुळे ऑस्ट्रेलियाला लंडनमधील ओव्हल येथे २०२३ विश्व कसोटी अजिंक्यपद सामन्यात भारतावर विजय मिळवण्याची संधी मिळाली. ऑस्ट्रेलिया सलग दोन डब्ल्यूटीसी जेतेपदे जिंकणारा पहिला संघ होण्याच्या मार्गावर आहे.

# पंतप्रधान मोदींना बंगळुरू चेंगराचेंगरीबद्दल दुःख

**नवी दिल्ली, ४ जून**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बंगळुरू चेंगराचेंगरीबद्दल दुःख व्यक्त केले. त्यांनी लिहिले की, बंगळुरूमधील अपघात खूप दुःखद आहे. या दुःखद क्षणी, ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे त्यांच्यासोबत माझ्या संवेदना आहेत. जखमी लोक लवकर बरे व्हावेत अशी मी प्रार्थना करतो. आरसीबी संघाच्या विजयी मिरवणुकीत आमची कोणतीही भूमिका नव्हती, असे बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी सांगितले. जे काही घडले ते दुर्दैवी आहे. मला वाटते की काही त्रुटी होत्या. बीसीसीआयची यात कोणतीही भूमिका नाही, परंतु हा एक धडा आहे जो शिकता येईल. भविष्यात अशा विजयाच्या उत्सवासाठी नवीन नियम बनवले जातील.

दरम्यान, भाजपाच्या आमदारांनी मुख्यमंत्री सिद्धरामया सरकारला घेरले. ही दुर्घटना सरकारमुळे घडली. त्यांना किती लोक येतील, कोणती खबरदारी घ्यावी लागेल याची कल्पना नव्हती. ही सुरक्षेतील चूक आहे, असे भाजपाचे आमदार चालवादी नारायणस्वामी चेंगराचेंगरीच्या घटनेबद्दल म्हणाले.

**कर्नाटक सरकारने केला आरसीबी संघाचा सत्कार**

बंगळुरू चेंगरा-चेंगरीची घटना घडण्यापूर्वी कर्नाटक सरकारने बुधवारी पहिल्यांदाच आयपीएल चषक जिंकणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाचा सत्कार केला.

कर्नाटकचे राज्यपाल तावरचंद गेहलोत, मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी येथील राज्य विधिमंडळ आणि सचिवालयाचे आसन असलेल्या प्रतिष्ठित विधानसौधासमोरील भव्य पायऱ्यांवर रजत पाटीदार यांच्या नेतृत्वाखालील संघाचा सत्कार केला.

एका छोट्याखानी कार्यक्रमात संघाला पारंपारिक म्हैसूर पेटा (भव्य औपचारिक पगडी), शाल आणि हार घालून सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रम पाहण्यासाठी विधानसौधासमोर मोठ्या संख्येने लोक जमले होते. येथील चिन्नास्वामी क्रिकेट स्टेडियममध्ये कर्नाटक राज्य क्रिकेट अकादमी (केएससीए) द्वारे आयोजित कार्यक्रमातही संघ सहभागी झाला. या सोहळ्यानंतर एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर चाहत्यांची गर्दी उसळली व चेंगराचेंगरीची हृदयद्रावक घटना घडली. मंगळवारी अहमदाबाद येथे झालेल्या अंतिम सामन्यात आरसीबीने पंजाब किंग्जवर सहा धावांनी विजय मिळवून त्यांचे पहिले विजेतेपद जिंकले. यापूर्वी तीन वेळा उपविजेतेपद पटकावल्यानंतर आरसीबीला अखेर ट्रॉफी जिंकण्याची संधी मिळाली. (वृत्तसंस्था)

**मृतांच्या कुटुंबीयांना १० लाख रुपयांची मदत : सिद्धरामय्या**

मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी मृतांच्या कुटुंबीयांना १० लाख रुपयांची भरपाई जाहीर केली आहे. जखमींवर मोफत उपचार केले जातील असेही त्यांनी सांगितले. आम्ही डॉक्टरांच्या संपर्कात आहोत. अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांपैकी बहुतेक तरुण होते. सर्व जखमी आता धोक्याबाहेर आहेत. त्यांच्यावर मोफत उपचार केले जात आहेत. सरकार त्यांना सर्वतोपरी मदत करेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# आरसीबीला २० कोटी, उपविजेता पंजाबला १२.५ कोटी

**अहमदाबाद, ४ जून**

आयपीएलच्या १८ व्या आवृत्तीचे विजेतेपद पटकावल्याबद्दल नव्याने विजेतेपद पटकावणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला (आरसीबी) २० कोटी रुपये मिळाले आहेत, तर उपविजेत्या पंजाब किंग्जला १२.५ कोटी रुपये रोख बक्षीस मिळाले आहे.

मंगळवार येथे झालेल्या एका रोमांचक अंतिम सामन्यात आरसीबीने पंजाब किंग्जला ६ धावांनी हरवून जगातील सर्वात मोठ्या टी-२० लीगमधील आपले पहिले विजेतेपद पटकावले. याबरोबरच आरसीबी व विराट कोहली यांच्या १८ वर्षांच्या प्रतीक्षेचा अंत झाला.

तिसऱ्या स्थानावर असलेल्या मुंबई इंडियन्सला क्वॉलिफायर २ मध्ये पोहोचल्याबद्दल ७ कोटी रुपये मिळाले, तर चौथ्या स्थानावर असलेल्या गुजरात टायटन्सला एलिमिनेटरमध्ये खेळल्याबद्दल ६.५ कोटी रुपये मिळाले.

गत काही वर्षांत आयपीएलच्या बक्षीस रकमेत झपाट्याने वाढ झाली आहे. २००८ च्या पहिल्या आवृत्तीत विजेत्या संघाला ४.८ कोटी रुपये मिळाले, तर उपविजेत्या संघाला २.४ कोटी रुपये मिळाले.

**दिल्ली क्रिकेट संघटनेने जिंकला सर्वोत्तम खेळपट्टी व मैदान पुरस्कार**

अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या सामन्यांसाठी दिल्ली जिल्हा क्रिकेट संघटनेला (डीडीसीए) सर्वोत्तम खेळपट्टी व मैदान पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्कारांशिवाय संघटनेला ५० लाख रुपयांचे बक्षीस मिळाले. या हंगामात स्टेडियमने सात सामने आयोजित केले होते, ते सर्व प्राथमिक सामने होते. हा पुरस्कार आमच्या क्युरेटर, कर्मचारी आणि व्यवस्थापनाच्या अथक परिश्रमाचे प्रतीक आहे, असे डीडीसीएचे अध्यक्ष रोहन जेटली म्हणाले. (वृत्तसंस्था)




**रोख बक्षीसांसह विजेत्यांची यादी**

विजेते आरसीबी : २० कोटी रुपये
उपविजेता पंजाब किंग्ज : १२.५ कोटी रुपये
तिसरे स्थान मिळवणारा मुंबई इंडियन्स : ७ कोटी रुपये
चौथे स्थान मिळवणारा गुजरात टायटन्स : ६.५ कोटी रुपये
ऑरेंज कॅप विजेता (साई सुदर्शन) : १० लाख रुपये
पर्पल कॅप विजेता (प्रसिद्ध कृष्णा) : १० लाख रुपये
इमर्जिंग प्लेअर विजेता (साई सुदर्शन) : १० लाख रुपये
मोस्ट व्हॅल्यूएबल प्लेअर (सूर्यकुमार यादव) : १५ लाख रुपये
सीझनचा सुपर स्ट्रायकर (वैभव सूर्यवंशी) : १० लाख रुपये + टाटा कर्व्ह कार
सीझनचा फॅन्टसी किंग (साई सुदर्शन) : १० लाख रुपये
सर्वोत्तम कॅच विजेता (कामिन्दू मेंडिस) : १० लाख रुपये
सर्वोत्तम डॉट बॉल (मोहम्मद सिराज) : १० लाख रुपये
सुपर सिक्स (निकोलस) पूरण) : १० लाख रुपये
सीझनचे चौकार (साई सुदर्शन) : १० लाख रुपये
फेअरप्ले अवॉर्ड (चेन्नई सुपर किंग्ज) : १० लाख रुपये
खेळपट्टी व मैदान (दिल्ली कॅपिटल्स गृह मैदान नवी दिल्ली) : ५० लाख रुपये

**आरसीबी वि. पंजाब किंग्ज अंतिम सामन्यातील पुरस्कार विजेत्यांची यादी**

| | |
|---|---|
| सामनावीर (कृणाल पांड्या) : | ५ लाख रुपये |
| सुपर स्ट्रायकर (जितेश शर्मा) : | १ लाख रुपये |
| सर्वाधिक डॉट बॉल (कृणाल पांड्या) : | १ लाख रुपये |
| सर्वाधिक चौकार (प्रियांश आर्य) : | १ लाख रुपये |
| फॅन्टसी किंग (शशांक सिंग) : | १ लाख रुपये |
| सर्वाधिक षट्कार (शशांक सिंग) : | १ लाख रुपये |

# आयसीसी रँकिंगमध्ये मोठा फेरबदल!

**दुबई, ४ जून**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) नवीन क्रमवारी जाहीर केली आहे. गत आठवड्यात फारसे सामने झाले नसले तरी काही सामन्यांनंतर बदल दिसून येत आहेत. तथापि, याचा परिणाम अव्वल ५ फलंदाजांवर झालेला नाही, परंतु खाली बरेच बदल आहेत. विशेष म्हणजे भारताच्या स्फोटक फलंदाजांपैकी एक असलेल्या यशस्वी जयस्वालला न खेळताच फायदा मिळाला आहे, तर पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझम याती आणखी घसरण झाली आहे.

ट्रॅव्हिस हेड अजूनही आयसीसीच्या टी-२० क्रमवारीत प्रथम क्रमांकाचा फलंदाज आहे. त्याचे रेटिंग सध्या ८५६ आहे. अभिषेक शर्मा ८२९ रेटिंगसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. फिल सॉल्ट ८१५ रेटिंगसह तिसऱ्या क्रमांकावर आहे व तिलक वर्मा ८०४ रेटिंगसह चौथ्या क्रमांकावर आहे. भारताचा सूर्यकुमार यादव ७३९ रेटिंगसह पाचव्या क्रमांकावर आहे. जोस बटलर ७३५ रेटिंगसह सहाव्या क्रमांकावर आहे. पथुम निस्सांका याचे रेटिंग ७१४ आहे आणि तो सातव्या क्रमांकावर आहेत. टिम सेफर्ट ७०८ रेटिंगसह आठव्या क्रमांकावर आहेत.

कुशल परेरा एका स्थानाने पुढे गेला आहे, तर यशस्वी जयस्वालही दोन स्थानांनी पुढे गेला आहे. यानंतर, एक बदल झाला आहे. श्रीलंकेचा कुशल परेरा आता एका स्थानाने पुढे गेला आहे व तो ९ व्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याचे रेटिंग ६७६ आहे. दक्षिण आफ्रिकेचा रीझा हेन्ड्रिक्स याचेही ६७६ रेटिंग आहे व तो संयुक्तपणे ९ व्या क्रमांकावर आहे. यशस्वी जयस्वाल सध्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळत नाही, परंतु तो खेळल्याशिवाय दोन स्थानांनी पुढे गेला आहे. तो अव्वल १० मध्ये येऊ शकला नाही, परंतु ६६१ रेटिंगसह तो निश्चितच ११ व्या क्रमांकावर पोहोचण्यात यशस्वी झाला आहे. बाबर आझम आणि मोहम्मद रिझवानची स्थिती खूपच वाईट आहे. दरम्यान, पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमची स्थिती खूपच वाईट आहे. तो सध्या पाकिस्तानच्या टी-२० संघाबाहेर आहे आणि त्यामुळे त्याला एकाच वेळी तीन स्थानांचे नुकसान झाले आहे. (वृत्तसंस्था)




# महाराष्ट्र प्रीमियर लीग क्रिकेट लीग स्पर्धेचे दिमाखात उद्घाटन

**पुणे, ४ जून-**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने (एमसीए) आयोजित अदानी महाराष्ट्र प्रीमियर लीग(एमपीएल) २०२५ आणि महिला महाराष्ट्र प्रीमियर लीग(डब्लूएमपीएल) स्पर्धेचे देवा श्री गणेशा...... तांबडी चामडी.... लालपरी.....टीप टीप बरसा पाणी....काला चष्मा.. देसी बॉईज...तू मेरा हिरो...झिंगाट... जय हो या गाण्यावरील लोकप्रिय अभिनेत्री चित्रांगदा सिंगचे नृत्य आणि नेत्रदीपक ड्रोन शोने स्पर्धेचे दिमाखात उद्घाटन झाले. तसेच काही प्रसिद्ध कलाकारांनीही आपली कला सादर केली.

या उदघाटन प्रसंगी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित महाराष्ट्र प्रिमियर लीगची सुरुवात गहुंजे येथील आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर झाली. याप्रसंगी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रोहित पवार, मानद सचिव ॲड. कमलेश पिसाळ, सहसचिव संतोष बोबडे, एमपीएलचे चेअरमन सचिन मुळे, तसेच अपेक्स कौन्सिल सदस्य शुभेंद्र भांडारकर, सुहास पटवर्धन, राजू काणे, सुनील मुथा, विनायक द्रविड, सुशील शेवाळे, रणजीत खिरीड, केशव वझे, अजय देशमुख, कल्पना तापीकर, सीईओ अजिंक्य जोशी, तसेच सर्व संघमालक, सर्व जिल्हा संघटनेचे सदस्य, क्रीडा, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील शहीद झालेल्या पर्यटकांना श्रध्दाजली वाहण्यात आली. एमपीएलच्या तिसऱ्या पर्वासाठी प्रेक्षक इतक्या मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. यासाठी मी त्यांचे मनापासून आभार मानतो. एमपीएल २०२४ स्पर्धेला उस्त्फुर्त प्रतिसाद प्रेक्षकांचा लाभला. तसेच प्रतिसाद यावर्षी देखील मिळेल, असा मला विश्वास वाटतो. या स्पर्धेच्या माध्यमातून आणखीन गुणवान खेळाडू मिळतील, अशी अपेक्षा असल्याचे महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रोहित पवार यांनी व्यक्त केला.

रोहित पवार पुढे म्हणाले की, या सर्व सामन्यांचे स्टार स्पोर्टस २ या वाहिनावरून तसेच जियो सिनेमा वरून थेट प्रक्षेपण करण्यात येणार असल्याने पुण्याबाहेरील प्रेक्षकांना ही या सामन्यांचा आनंद घेता येणार आहे.या एमपीएल स्पर्धेमध्ये ४ एस पुणेरी बाप्पा, पीबीजी कोल्हापुर टस्कर्स, रत्नागिरी जेट्स, ईगल नाशिक टायटन्स, सातारा वॉरियर्स, रायगड रॉयल्स हे संघ झुंजणार आहेत. तर डब्लूएमपीएल स्पर्धेमध्ये पुणे वॉरियर्स, रत्नागिरी जेट्स, सोलापूर स्मॅशर्स आणि रायगड रॉयल्स यांच्यात चुरस होणार आहे.

**सामन्यांसाठी मोफत तिकिट**

सर्व सामन्यांसाठी मोफत तिकिट इतर असोसिएशनच्या स्पर्धांमध्ये सामना पाहण्यासाठी तिकिट विकत घ्यावे लागते. पण एमसीएने मात्र सर्वसामान्य क्रिकेटर रसिकांना सामन्यांना आनंद आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर घेता यावा म्हणून दरवर्षीप्रमाणे मोफत तिकिट ठेवले आहे. पार्किंगची मुबलक सेवा उपलब्ध आहे. तसेच विद्यार्थ्यांना ही या सामन्यांसाठी आणण्यात येणार आहे.



# ग्रीनस्टार बास्केटबॉल प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**सोलापूर, दि. ४ जून-**

ग्रीन स्टार स्पोर्टर्स क्लबच्या बास्केटबॉल उन्हाळी प्रशिक्षण समारोप शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. आनंद चव्हाण यांच्या हस्ते झाला. राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथील दोन्ही मैदावर सकाळ संध्याकाळ असे दोन सत्रात शिबीर घेण्यात आले. नवोदिताना फंडामेंटल तर जुन्या खेळाडूना ॲडव्हान्स कोचींग देण्यात आले.

शिवाय अंतर्गत सामने घेवुन सामन्याचे प्रशिक्षण देण्यात आले, राष्ट्रीय खेळाडू प्रशिक्षीत प्रशिक्षक अब्दुल माजीद खान पठाण व रणीवर मनसावले यांनी प्रशिक्षण दिले. समारोप प्रसंगी खेडाळूना प्रशस्तीपत्र व टी शर्टचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी २०२४-२०२५ मधील राष्ट्रीय खेळाडूंचा व राष्ट्रीय कर्णधाराचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त हाजीमलंग नदाफ, क्लबचे अध्यक्ष एम. शफी शेख, माजी क्रीडा अधिकारी जुबेर शेख व राष्ट्रीय खेळाडू मुस्तफा सगरी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रणवीर मन्सावाले यांनी केले. अजीम नदाफ यांनी आभार मानले.



# विहान अकादमीची साऊथ सोलापूरवर मात

### बंदपट्टे चषक १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धा

**सोलापूर, दि. ४ जून-**

बंदपट्टे चषक १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत विहान क्रिकेट अकादमीने साऊथ सोलापूर संघावर ९४ धावांनी विजय मिळविला.

येथील दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर बुधवारी झालेल्या सामन्यात विहान अकादमीने सर्व बाद १८१ धावा केल्या. १८२ धावांचे विजयी लक्ष्य साऊथ सोलापूरला पेलवले नाही. त्यांचा डाव ८७ धावांत आटोपला. २२ धावांत ५ बळी टिपणारा वेदांत राठोड सामन्याचा मानकरी ठरला. त्यास स्पर्धाचे प्रायोजक राजू बंदपट्टे व मुंबई पोलीस सुधाकर सिद्धूल यांच्या हस्ते हे पारितोषिक देण्यात आले. यावेळी दत्ता बडगू, राजवर्धन जिल्ला, योगेश कोप्पल व अमोल अंगडी उपस्थित होते.

**संक्षिप्त धावफलक**

विहान क्रिकेट ॲकॅडमी : ३० सर्व बाद १८१( प्रतिक डिगे, ६१, वेदांत कनकट्टी २-१७) वि. वि. साऊथ सोलापूर : २३.१ षटकात सर्व बाद बाद ८७ (आर्यन भोसले २५, वेदांत राठोड ५-२२)

# आशियाई कराटे पदकविजेती भुवनेश्वरी जाधवचा नागरी सत्कार

### पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीची मान्यता असलेल्या वर्ल्ड व एशियन कराटे फेडरेशनतर्फे ताश्कंद उझबेकीस्तान येथे झालेल्या आशियाई कराटे स्पर्धेत ऐतिहासिक कास्य पदक जिंकलेल्या भुवनेश्वरी संगीता सुरेश जाधव हिचा भव्य नागरी सत्कार सोहळा पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. यावेळी जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार, भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार उपस्थित होते.

या सन्मान सोहळ्यात भुवनेश्वरीचे बंधू ट्रेडिशनल व स्पोर्ट्स कराटे असोसिएशनचे सचिव मिहिर जाधव यांनी तिच्या गत पाच वर्षांच्या मेहनत, सराव व संघर्ष, दुखापत, शस्त्रक्रिया, रिहॅब, पुन्हा कौशल्य प्रशिक्षण अशा खडतर साधनेच्या प्रवासाची तसेच आशियाई व जागतिक स्तरावरील कर्तृत्वाच्या क्षणचित्रांची तयार केलेली क्लीप दाखविली. संयोजन समितीतर्फे ओम भैय्या दरक यांनी स्वागत केले. आई संगीता सुरेश जाधव यांनी प्रास्ताविक करताना स्कूल व युनिव्हर्सिटी गेम्स, नॅशनल व एशियन गेम्समधील कराटेची सद्यस्थिती तसेच भविष्यातील संधींचाही उहापोह केला. सिनेट सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांनी विद्यापीठ स्तरावरील कराटेची अंतर्भूतता व भुवनेश्वरीच्या माध्यमातून विद्यापीठाच्या कराटे खेळाडूंना मिळणारी संधी या निमित्ताने व्यक्त केली. भाजप क्रीडा प्रकोष्ठचे जिल्हाध्यक्ष यशवंत पाथरुट यांनी समर्पक स्मृतिचिह्न प्रदान करुन भुवनेश्वरीचे अभिनंदन केले. क्रीडा भारतीचे पश्चिम महाराष्ट्र मंत्री ज्ञानेश्वर मॅकल यांनी सोहळ्याचा समन्वय साधला. यावेळेस संस्कृती प्रतिष्ठानच्या माया गांधी, चंदा पाटील, आशा ठकराल, क्रीडा शिक्षक संघटनेचे सुहास छंचुरे, उज्वल मलजी, पाटील, शिवाजी वसपटे तसेच गट शिक्षण अधिकारी जमादार आणि रुद्रचे आकाश झळकेनवरु, शिवलीला स्पोर्ट्सचे शिवशरण वाणीपरीट व स्वामी, ओकीनावाचे प्रभु, माजी तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव यांच्या वतीनेही भुवनेश्वरीचा सत्कार करण्यात आला. रुद्र ॲकॅडमीचे पालक प्रतिनिधी साईनाथ यादव यांनी आभार मानले. सहस्त्रार्जुन प्रशालेचे मोरेश्वर काटवे यांनी सूत्रसंचालन केले.



**शासनस्तरावर सहकार्य करू**

भुवनेश्वरच्या क्रीडा कौशल्याची व मिळवलेल्या यशाचे कौतुक आहे. शासन स्तरावर पाठपुरावा करून शक्य तितके सहकार्य करण्याचा प्रयत्न करू.

**- नरेंद्र पवार,** जिल्हा क्रीडाधिकारी

**पुढील एशियन्समध्ये सुवर्ण नक्की मिळवेल :** सोलापूर विद्यापीठानंतर दुसरे सहकार्य करण्यास आम्ही तयार आहोत. भुवनेश्वरीने मिळविलेले कांस्य कराटे खेळाडूंसाठी आणि सोलापूरसाठी अभिमानाची बाब आहे. पुढील एशियन गेम्समध्ये भुवनेश्वरी नक्की सुवर्णपदक मिळवेल.

**- एम. राजकुमार,** शहर पोलिस आयुक्त

**भुवनेश्वरीमुळे एशियन्सचे दरवाजे खुले :** भुवनेश्वरीमुळे भारतीय कराटे खेळाडूंसाठी एशियन गेम्सचे दरवाजे खुले झाले असून ही सोलापूरकरांसाठीच नव्हे तर सर्व भारतीय कराटे क्षेत्रासाठी अभिमानाची बाब आहे. तिच्या यशाने सोलापूर विद्यापीठाच्या नावलौकिकात भर पडली असून विद्यापीठ यापुढेही विद्यापीठ कार्यक्षेत्रातील आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थी खेळाडूंना सर्वतोपरी सहकार्य करेल.

**- प्रा सचिन गायकवाड,** व्यवस्थापन परिषद सदस्य सोलापूर विद्यापीठ

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठीही महाराष्ट्र महत्वाचे केंद्र

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; महाराष्ट्र २०२९ चा कृती आराखडा लवकरच

**तभा वृत्तसेवा। जमीर काझी**
**मुंबई, दि. ४ जून-**

महाराष्ट्र आता केवळ भारतातीलच नव्हे तर आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठीही महत्त्वाचे केंद्र बनत आहे, आणि भविष्यातील उद्योग आणि नाविन्यतेसाठी राज्य तयार होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केले. हॉटेल ताज पॅलेस येथे बँक ऑफ अमेरिकातर्फे आयोजित २०२५ इंडिया कॉन्फरन्समध्ये : एक्सेलेटरिंग ग्रोथ, महाराष्ट्रा वन ट्रिलीयन या कार्यक्रमात ते बोलत होते.

फडणवीस म्हणाले की, ''मेक इन इंडिया'' या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या धोरणाचा सर्वाधिक लाभ महाराष्ट्राला झाला आहे. ''ऑपरेशन सिंदूर'' ने भारतीय संरक्षण उत्पादनक्षमता किती प्रगत झाली आहे, हे दाखवून दिले आहे. उत्तर प्रदेश व तमिळनाडूमध्ये संरक्षण उद्योगाचे क्लस्टर्स असले तरी खऱ्या अर्थाने भारतातील संरक्षण उत्पादनाचे केंद्र महाराष्ट्रच आहे. महाराष्ट्राने या क्षेत्रात मोठी घोडदौड केली असून, राज्य आज मोठ्या प्रमाणावर संरक्षण उत्पादनाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

देशातील सुमारे ६०टक्के डेटा सेंटर क्षमता आता महाराष्ट्रात आहे. मुंबई ही आधीच देशाची प्रमुख फिनटेक राजधानी झाली आहे, तसेच महाराष्ट्र हे स्टार्टअपसाठी देखील एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे. जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या संधींबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जगभरातील गुंतवणूकदार आता सुरक्षित पर्याय शोधत आहेत, जे जागतिक पुरवठा साखळीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतील, आणि भारत या संधीसाठी सर्वात योग्य स्थानावर आहे. महाराष्ट्र शासन या संधीसाठी पूर्णतः सज्ज आहे. दावोस आर्थिक परिषदेदरम्यान महाराष्ट्राने १६ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आकर्षित केली असल्याचेही त्यांनी नमूद केले. यापैकी निम्म्याहून अधिक गुंतवणूक उत्पादन क्षेत्रात आहे, हे लक्षवेधी असून 'मेक इन इंडिया'चा प्रत्यक्ष परिणाम राज्यात दिसून येत आहे. उत्पादन व औद्योगिक विकास हेच राज्याच्या प्रगतीचे केंद्रबिंदू असून, ''मेक इन इंडिया'' योजनेमुळे महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणावर फायदा झाला आहे.

राज्याच्या गतीमान विकासाला आता महाराष्ट्रात आहे. मुंबई ही आधीच देशाची प्रमुख फिनटेक राजधानी झाली आहे, तसेच महाराष्ट्र हे स्टार्टअपसाठी देखील एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे.

जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या संधींबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जगभरातील गुंतवणूकदार आता सुरक्षित पर्याय शोधत आहेत, जे जागतिक पुरवठा साखळीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतील, आणि भारत या संधीसाठी सर्वात योग्य स्थानावर आहे. महाराष्ट्र शासन या संधीसाठी पूर्णतः सज्ज आहे.

दावोस आर्थिक परिषदेदरम्यान महाराष्ट्राने १६ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आकर्षित केली असल्याचेही त्यांनी नमूद केले. यापैकी निम्म्याहून अधिक गुंतवणूक उत्पादन क्षेत्रात आहे, हे लक्षवेधी असून 'मेक इन इंडिया'चा प्रत्यक्ष परिणाम राज्यात दिसून येत आहे. उत्पादन व औद्योगिक विकास हेच राज्याच्या प्रगतीचे केंद्रबिंदू असून, ''मेक इन इंडिया'' योजनेमुळे महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणावर फायदा झाला आहे.

राज्याच्या गतीमान विकासाला प्राधान्य देत विविध क्षेत्रात महाराष्ट्र यशस्वी घोडदौड करत आहे. मुंबईच्या सागरकिनारी मर्यादित विस्तारक्षेत्र लक्षात घेता 'चौथी मुंबई' ही संकल्पना महत्वाची ठरणार आहे. अटल सेतू या २२ किमी लांबीच्या सागरी पुलामुळे मुंबई आणि नवी मुंबई यांच्यात जलद संपर्क साधला गेला असून, यामुळे या भागातील अंतर्गत परिसर मुंबईचा विस्तार मानला जात आहे. या भागात सध्या नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात असून ते ऑगस्टमध्ये सुरू होईल. या संपूर्ण पट्ट्यात एक तीनपट मोठे नवे शहर विकसित करण्याचा विचार आहे, जिथे विविध सकंल्पना असलेली शहरे उभारली जातील. यामध्ये 'एज्यू-सिटी' (विद्यापीठ नगरी) ज्यात दहा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विद्यापीठांचा समावेश असेल ,जिथे मोठ्या संख्यने विद्यार्थी उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण घेतील. तसेच 'स्पोर्ट्स सिटी', 'मेडिसिन सिटी', 'नॉलेज सिटी', आणि 'इनोव्हेशन सिटी' अशा संकल्पनांचा समावेश असेल. राज्यात सायबर सुरक्षा केंद्र अत्याधुनिक स्वरुपात सुर करावयाचे नियोजन असून या केंद्राच्या माध्यमातून सायबर गुन्हेगारीच्या विविध प्रकारांवर एकत्मिक पद्धतीने नियंत्रण ठेवण्यात येणार असल्याचे सांगून ते म्हणाले की, 'चौथी मुंबई' ही संकल्पना वाढवण बंदराभोवती विकसित केली जात आहे. येथे भारतातील सर्वात मोठे बंदर आणि नवीन विमानतळ उभारले जाणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विमानतळाला मंजुरी दिली असून त्याचे पुढील सर्वेक्षण सुरु आहे. तसेच बुलेट ट्रेन, आणि कोस्टल रोड वाढवणपर्यंत नेण्याचीही योजना असल्याने हा भाग एक मोठं शहरी केंद्र बनेल, मुंबई, ठाणे आणि पुणे या पारंपरिक औद्योगिक केंद्रांपलीकडे, राज्य शासनाने आता टियर २ आणि ३ शहरांमध्ये औद्योगिक गुंतवणुकीचा वेग वाढवला आहे. छत्रपती संभाजीनगर हे आता ईव्ही (इलेक्ट्रिक व्हेईकल) उद्योगाचे केंद्र बनले असून अनेक मोठ्या कंपन्यांनी गुंतवणूक केली आहे. या ठिकाणी आर्थिक वाढीसाठी पूरक वातावरण तयार होत आहे. गडचिरोली हे देशातील नवीन स्टील सिटी म्हणून उभारले जात आहे, जिथे १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे. नागपूर, नाशिक आणि धुळे यांसारख्या शहरांमध्येही माहिती तंत्रज्ञान, उत्पादन आणि अन्य क्षेत्रातील मोठी गुंतवणूक होत आहे. या सर्व शहरांमध्ये केवळ उद्योगच नव्हे, तर दर्जेदार पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, करमणुकीच्या सुविधा यावर भर देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.



### कृती आराखडा : महाराष्ट्र २०२९

राज्याच्या गतीमान प्रशासनामुळे विविध उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केले जात असल्याचे सांगून फडणवीस म्हणाले की, शंभर दिवसाच्या कार्यक्रमातंर्गत अतिशय चांगली अंमलबजावणी सर्व प्रशासकीय विभागांनी केली असून सध्या प्रशासनासाठी १५० दिवसांचा विशेष कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. ज्यामध्ये प्रत्येक विभागाने 'विकसित महाराष्ट्र २०४७' या दीर्घकालीन ध्येयासाठी आपापल्या विभागांची उद्दिष्टे, कृती आराखडा तयार करायचे आहेत. या योजनेत तीन टप्पे असून त्यात दीर्घकालीन दृष्टिकोन: महाराष्ट्र २०४७ तसेच मध्यम कालावधीचा आराखडा: महाराष्ट्र २०३५ आणि तत्काल कृती आराखडा: महाराष्ट्र २०२९ या तीन टप्प्यांचा समावेश असेल. या सर्व टप्प्यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश असून त्याचा प्रशासनावर आणि उद्योगांवर होणारा परिणाम, आणि नवीन गुंतवणुकीच्या संधी यांचा विचार केला जात, असल्याचे त्यांनी सांगितले.

## महत्त्वाचे...



### जपानचे महावाणिज्यदूत यागी कोजी यांनी घेतली अजित पवार यांची सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. ४ जून -**

भारताच्या औद्योगिक प्रगतीत, पायाभूत सुविधांच्या निर्मितीत जपानची भूमिका महत्वाची राहिली आहे. देशात त्यांची मोठी औद्योगिक गुंतवणुक असून महाराष्ट्रात तीनशेहून अधिक तर, पुणे आणि परिसरात पन्नास कंपन्या कार्यरत आहेत. राज्याच्या औद्योगिक, आर्थिक, सामाजिक प्रगतीत, रोजगारनिर्मितीत मोलांचं योगदान देणाऱ्या या कंपन्यांच्या समस्यांचे निराकरण करुन त्यांच्यासाठी उद्योगपुरक वातावरण निर्माण करणे शासनाची जबाबदारी आहे. असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जपानचे मुंबईतील वाणिज्यदूत यागी कोजी यांच्या भेटीदरम्यान बुधवारी झालेल्या चर्चे वेळी केले. सह्याद्री अतिथीगृह येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी जपानी राज्यात जपानी गुंतवणूक वाढवण्यासह, उद्योगक्षेत्रासमोरील अडचणी दूर करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. उद्योग, आर्थिक क्षेत्रांबरोबरंच दोन्ही सामाजिक,सांस्कृतिक सहकार्य वाढविण्यावरही चर्चेत भर देण्यात आला. यावेळी नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव तथा विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख उपस्थित होते.



### 'कायाप्पाचा पाडा' सर्वोत्कृष्ट नाटक

**नागपूर, दि. ४ जून-**

बृहन्मुंबई महानगरपालिका आपल्या कलावंत कर्मचाऱ्यांसाठी दरवर्षी आंतरविभागीय खात्यांतर्गत नाट्य स्पर्धा भरवीत असते. यंदाचे या स्पर्धेचे ५३ वे वर्ष होते. यावर्षी बा. य. ल. नायर धर्मदाय रुग्णालय तर्फे सादर झालेल्या कायाप्पा चा पाडा या नाटकाला सर्वोत्कृष्ट नाट्य प्रयोग प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. या व्यतिरिक्त या नाटकासाठी आठ वैयक्तिक पारितोषिकही प्राप्त झाले आहे. . सदर नाटक श्री देवेंद्र मधुकर काळसेकर (स्वतः नायर रुग्णालय कर्मचारी) यांनी लिहिले आहे व नाटकाचे दिग्दर्शन नम्रता देवेंद्र काळसेकर यांनी केलेले आहे. यासाठी दिग्दर्शनाचे सर्वोत्कृष्ट द्वितीय पारितोषिक त्यांना प्राप्त झाले. ही दोघं Radiation Oncology विभागात Radio Therapist ह्या हुद्यावर कार्यरत आहेत. सर्व तांत्रिकी प्रथम पारितोषिक प्राप्त करून नायर रुग्णालयाने या स्पर्धेत भरघोस यश मिळवले आहे. नायर नाटक मंडळ, यात अगदी कामगार पासून ते स्टाफ, सिस्टर्स, नर्सेस, लॅब टेक्निशन, डॉक्टर, असोसिएट प्रोफेसर ते अगदी विभाग प्रमुख असे सर्व कर्मचारी एकत्रितपणे येऊन काम करतात. नाटक ही त्यांची फक्त आवड नसून वेड आहे आणि त्यामुळे आपल्या अतिशय जोखमीच्या व व्यस्त अशा कामकाजातून ही तालमीसाठी आपले कार्यालयीन वेळ संपल्यानंतर ते सवड ही काढतात. गेली तीन-चार वर्ष नायर रुग्णालय तर्फे सादर झालेल्या नाटकांनी पहिल्या तीन क्रमांकात आपले स्थान मिळवले आहे व अनेक वैयक्तिक पारितोषिके प्राप्त केलेली आहेत. राज्य नाट्य स्पर्धेत ही त्यांना अनेकदा यश मिळाले आहे. गेल्या वर्षी त्यांनी सादर केलेले नाटक धनंजय माने येथे राहतात का? (लेखिका- रूपाली मिलिंद पवार नायर रुग्णालय कर्मचारी ) याला सर्वोत्कृष्ट द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले व प्रेक्षक प्रतिसादामुळे याचे स्पर्धेनंतर प्रायोगिक रंगभूमीवर पदार्पण झालेले आहे. नायर संघाने त्याचे आतापर्यंत मुंबई व मुंबई बाहेर असे ११ प्रयोग सादर केलेले आहे.



प्रदूषण मुक्तीसाठी कारंजे सुरू

सोलापूर : सिद्धेश्वर मंदिर परिसरातील तलावात कारंजांची संख्या वाढवण्यात आली. प्रदूषण मुक्तीसाठी हे कारंजे १२ तास चालू ठेवण्यात आले आहेत. त्याचे बुधवारी सायंकाळी टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)



## पंढरपूरच्या ६५ एकरमधील आरोग्य शिबिराचे स्थळ बदला

### अखिल भाविक वारकरी मंडळाच्यावतीने निवेदन

**सोलापूर, दि.४ जून-**

श्री क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारीनिमित्ताने ६५ एकरमध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याशिबिराच्या स्थळात बदल करण्यात यावा तसेच इतर विविध मागण्यांचे निवेदन अखिल भाविक वारकरी मंडळाच्यावतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना देण्यात आले आहे. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनाही ईमेलद्वारे पाठवण्यात आले आहे.

आषाढीवारी श्रीक्षेत्र पंढरपूरमध्ये असलेल्या ६५ एकर भक्तीसागर येथे महाआरोग्य शिबीर आयोजित करण्यात येत आहे. या शिबिराचे स्वागत आहे मात्र ते शिबीर दुसऱ्या जागेवर आयोजित करावे. कारण ६५ एकरमध्ये वारकरी मंडपाला जागा कमी पडते. जर पाऊस आला तर चिखल खूप होतो आणि वारकरी भाविकांना खूप त्रास होतो. त्यासाठी ६५ एकरवर सिमेंट काँक्रीट करावे, वारी कालावधीमध्ये टॉयलेट जास्त असावेत आणि सर्व टॉयलेट स्वच्छ असावेत तसेच तिथे पाणी भरपूर प्रमाणात उपलब्ध असावे, ६५ एकरमध्ये स्वतंत्र आपत्कालीन कक्ष असावा, सर्वांना पिण्याचे पाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करण्यासाठी तात्पुरते आरओ प्लॅन्ट उभे करावेत, परिवहन मंडळाच्या बस संख्या वाढवून प्रत्येक मार्गावर स्थानक उभे करावे, अशा मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर इंगळे महाराज, प्रदेश अध्यक्ष जोतिराम चांगभले, राष्ट्रीय सचिव बळीराम जांभळे, प्रदेश उपाध्यक्ष किसन कापसे, प्रदेश सचिव मोहन शेळके, तुकाराम भोसले महाराज आदी उपस्थित होते.

## मनीष सिसोदिया,सत्येंद्र जैन यांना समन्स

### वर्गखोल्या बांधकामात दोन हजार कोटींचा घोटाळा

**नवी दिल्ली, ४ जून-**

सरकारी शाळांमधील वर्गखोल्यांच्या बांधकामात झालेल्या भ्रष्टाचाराप्रकरणी दिल्ली सरकारच्या भ्रष्टाचार विरोधी शाखेने (एसीबी) आप नेते मनीष सिसोदिया आणि सत्येंद्र जैन यांना समन्स बजावले आहेत, असे एका अधिकाऱ्याने बुधवारी सांगितले.

जैन यांना ६ जून रोजी एसीबीसमोर हजर राहण्यास सांगण्यात आले आहे, तर सिसोदिया यांना ९ जून रोजी चौकशीसाठी समन्स बजावण्यात आला आहे.

दिल्ली सरकारी शाळांमध्ये १२,००० हून अधिक वर्गखोल्या किंवा अर्ध-स्थायी संरचनांच्या बांधकामात २००० कोटी रुपयांच्या आर्थिक अनियमिततेच्या आरोपांवर आधारित एसीबीने ३० एप्रिल रोजी एफआयआर दाखल केल्यानंतर हे समन्स बजावण्यात आले आहेत.

मागील आप सरकारच्या काळात अर्थ आणि शिक्षण विभाग सांभाळणारे सिसोदिया आणि सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर मंत्रालयांचे तत्कालीन प्रभारी सत्येंद्र जैन यांची केंद्रीय दक्षता आयोगाने उघड केलेल्या कथित त्रुटींबाबत चौकशी केली जात आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

सीव्हीसीच्या मुख्य तांत्रिक परीक्षकांच्या अहवालात प्रकल्पातील अनेक विसंगती निदर्शनास आल्या आहेत. अहवालावर जवळजवळ तीन वर्षांपासून कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप आहे. (वृत्तसंस्था)

## यंदा दहा कोटी वृक्ष लागवड करणार : मुख्यमंत्र्यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ जून-**

राज्यातील वनाच्छदनाची टक्केवारी वाढविण्यासाठी हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानाअंतर्गत यावर्षी राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केली. पुढील वर्षीही दहा कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट आहे. वृक्षारोपण ही लोकचळवळ झाली तरच ही मोहीम यशस्वी होईल. त्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियान अंतर्गत वृक्ष लागवड मोहिमेसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, वन मंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्यासह विविध विभागांचे सचिव, वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले की, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण आवश्यक आहे. देशात सर्वाधिक वनाच्छदन वाढविण्यात महाराष्ट्रात अग्रेसर आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील एक पेड माँ के नाम या अभियानात महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली आहे. राज्यातील ३३ टक्के वनाच्छदनाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी पुढील वीस वर्षे हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र हे अभियान मोहिम स्वरुपात राबविणे आवश्यक आहे. महाराष्ट्राने गेल्या आठ वर्षात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली आहे. यापूर्वी ३३ कोटी व ५० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट यशस्वीपणे गाठले आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षीचे उद्दिष्ट नक्कीच पूर्ण करता येईल. वृक्षारोपणात किमान दिड ते तीन वर्षे वयाची रोपे लावण्यात यावीत. लावलेली झाडे टिकतील, वाढतील यासाठी प्रयत्न व्हावेत. तसेच लावलेल्या वृक्षारोपणाची जगण्याची टक्केवारी वाढावी, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. तसेच यासाठी रिमोट सेन्सिंग, उपग्रह आदी साधनांचाही वापर करून पारदर्शकपणे कामे होण्याकडे लक्ष द्यावे.

### महामार्गकडेच्या झाडाची जबाबदारी वन विभागाकडे

राज्यातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तसेच पालखी मार्गाच्या कडेला वृक्षारोपण करण्याच्या कामाची जबाबदारी आता वन विभागाकडे सोपविण्यात येईल. त्याचप्रमाणे गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उद्योग येत आहेत. त्यामुळे या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड होणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढील वर्षी गडचिरोली जिल्ह्यात १ कोटी झाडे लावण्याचा विचार असून लवकरच त्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. याशिवाय जोतिबाच्या डोंगरावही मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गाच्या कडेला झाडे लावताना भविष्यात होऊ शकणाऱ्या रस्ता रुंदीकरणाचा विचार करण्यात यावा. तसेच या ठिकाणी जांभूळ, बहावा, सुरंगी, पिंपळ, वड, कडूलिंब, अर्जून या सारखी देशी व सावली देणारी झाडे लावण्यात यावीत. असे सांगितले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने वृक्ष लागवड व देखरेखीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले. बांधकाम विभागाच्या वतीने राज्यात विविध भागात करण्यात येत असलेल्या वृक्षारोपणाची व त्याच्या देखरेखीची माहिती या अँपद्वारे मिळणार आहे. अँड्रॉईड व आयओएस या दोन्ही प्रणालीवर हे अँप चालणार आहे.

## पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर सोलापुरातील आशाराणी भोसले प्रकरणाने खळबळ

### उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची गंभीर दखल

### निष्पक्षपणे तपास करून न्याय दिला जावा

### पोलीस प्रशासनाला दिले निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

सोलापूर जिल्ह्यातील चिंचोली एम आयडीसी, तालुका मोहोळ येथे राहणाऱ्या २६ वर्षीय आशाराणी भोसले यांनी दि. ३ जून २०२५ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली, असा प्राथमिक अंदाज माध्यमांतून समोर आला आहे. मात्र ही आत्महत्या नसून, सासरच्या मंडळींच्या मानसिक छळामुळे त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांच्या नातेवाईकांनी केला आहे.

या दुर्दैवी घटनेची गंभीर दखल विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतली असून, त्यांनी तातडीने सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती घेतली व सखोल तपास करण्याचे निर्देश दिले आहेत. आशाराणी भोसले या तीन महिन्यांच्या गर्भवती होत्या आणि त्यांना दोन वर्षांची मुलगीही आहे, ही बाब मन हेलावणारी आहे. त्यांच्या नातेवाईकांनी सांगितल्याप्रमाणे, सासरच्या मंडळींकडून त्यांना सातत्याने छळ सहन करावा लागत होता. चार ते पाच वेळा घरगुती वाद निर्माण झाल्यानंतर त्यांच्या माहेरच्या मंडळींनी मध्यस्थी करून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र अखेर या मानसिक छळाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केली असावी, असा संशय व्यक्त होत आहे.

पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर लगेचच सोलापुरात घडलेली ही घटना महिलांच्या सुरक्षिततेविषयी गंभीर प्रश्न उपस्थित करत डॉ. गोऱ्हे यांनी या प्रकरणी पोलीस प्रशासनाला सखोल आणि निष्पक्ष तपासाचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यांनी सांगितले की, ही आत्महत्या की पूर्वनियोजित हत्या याचा तपास वैज्ञानिक आणि न्यायवैद्यकीय पद्धतीने करण्यात यावा. घटनास्थळाचा पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, आणि गळफास लावण्याच्या स्थितीचा वस्तुनिष्ठ अभ्यास करावा.

या प्रकरणात सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सध्या सुरू असून, डॉ. गोऱ्हे यांनी तत्काळ आरोपींना अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश पोलीस प्रशासनाला दिले आहेत. कोणताही दबाव न घेता कायद्याच्या चौकटीत निष्पक्षपणे आणि जलदगतीने तपास करून न्याय दिला जावा, अशी आग्रही भूमिका डॉ. गोऱ्हे यांनी घेतली आहे. पीडित कुटुंबाला आवश्यक ती कायदेशीर व मानसिक मदत सरकारमार्फत पुरवण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले. या अनुषंगाने, पोलीस अधीक्षकांनी माहिती दिली की, आशाराणी यांची दोन वर्षांची मुलगी सध्या तिच्या आजोबा-आजींकडे म्हणजेच आईच्या माहेरी आहे. यावर प्रतिक्रिया देताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, या बाळासाठी कोर्टाची ऑर्डर घ्यावी लागेल का, की तिच्या माहेरची मंडळी स्वतः तिला सांभाळण्यासाठी तयार आहेत, याची माहिती घेऊन त्यानुसार पुढील कायदेशीर प्रक्रिया राबवावी.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# तुर्कस्तान, अझरबैजानला शह

भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावप्रसंगी पाकिस्तानला सक्रिय पाठिंबा देणे अझरबैजान आणि तुर्कस्तानच्या अंगलट आले आहे. देशातील ५० टक्के पर्यटकांनी या देशातील बुकिंग रद्द करण्याचा निर्णय घेतला असून, या दोन्ही देशांमधील वस्तूंवर बहिष्कार घालण्याच्या आवाहनाला मोठ्या प्रमाणात समर्थन मिळत असल्याचे दिसत आहे. भारताने आजवर कुणा देशावर हल्ला करून, त्याची भूमी बळकावल्याचे उदाहरण नाही. कुठल्या युद्धात भारताने संपूर्ण भूमिका समजल्याशिवाय कुणाला पाठिंबा दिलेला नाही. रशिया-युक्रेन युद्धातही भारताने उभयतांना युद्धापासून दूर राहण्याचे आवाहन करून तटस्थतेची भूमिका निभावली होती. पहलगामच्या बैसरण घाटीत पाकिस्तानी जिहादी दहशतवाद्यांनी २६ हिंदू पर्यटकांची हत्या केल्यानंतर भारत सरकारने पुकारलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ने पाकिस्तानचे कंबरडे मोडले. भारताने एकीकडे लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबूल मुजाहिद्दीनला पाणी पाजले आणि दुसरीकडे जनजागृती करून अनेक देशांना पाकिस्तानने केलेल्या आगळिकीची माहितीही दिली. या साऱ्या लढाईत दहशतवादाला बळी पडलेले बहुतांशी देश भारताच्या पाठीशी उभे राहिले असताना अझरबैजान आणि तुर्कस्तानने मात्र पाकिस्तानच्या पाठीशी उभे राहून भारताशी शत्रुत्व विकत घेतले आहे. पाकिस्तानला पाठिंबा दिल्याने भारतीय पर्यटकांमध्ये या देशांविरुद्ध तीव्र भावना निर्माण झाल्या. यामुळे अझरबैजान आणि तुर्कस्तानला भेट देणाऱ्या भारतीय पर्यटकांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. अनेक ट्रॅव्हल एजन्सीजने या देशांमधील बुकिंग रद्द केल्या. यामुळे त्यांच्या पर्यटन उद्योगाला आर्थिक फटका बसला आहे. भारतीय व्यापारी संघटनांनी तुर्कस्तान आणि अझरबैजानमधून आयात कमी करण्याचे आवाहन केले आहे. काही तुर्की कंपन्यांचे भारतातले करार रद्द करण्यात आले आहेत, त्यात विमानतळावर विमान वाहतूक सेवा देणाऱ्या सेलेबी कंपनीचा समावेश आहे. भारताच्या नाराजीमुळे या देशांसोबतचे संबंध ताणले गेले आहेत. भारत एक मोठी अर्थव्यवस्था आणि जागतिक शक्ती असल्याने, त्यांचे समर्थन गमावणे या देशांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर धोक्याचे ठरणार, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. भारताने यापूर्वी दाखवून दिले आहे की, तो आपल्या राष्ट्रीय हिताचे रक्षण करण्यासाठी कोणत्याही देशावर अवलंबून राहणार नाही आणि जे देश भारताच्या विरोधात भूमिका घेतील, त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील. पाकिस्तानची मदत करण्यामागे या दोन्ही देशांचा मुस्लिम धर्मदेखील महत्त्वाचा ठरला आहे.या दोन्ही देशांचा भारतासोबतचा व्यापार १२ अब्ज डॉलर्सचा आहे. अलिकडे या देशांमध्ये जाणाऱ्या भारतीयांची संख्या वाढली आहे. पण पाकिस्तानच्या गोटात जाऊन बसल्याने त्यांना मोठा आर्थिक फटका बसणे, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. भारत तुर्कस्तानला कार, रसायने आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची निर्यात करतो. भारतात या देशातून इंधन, मशिनरी, सिमेंट आणि ड्रायफ्रूट्स आयात होतात. तुर्कस्तानच्या अनेक कंपन्या भारतात लोकप्रिय आहेत. यामध्ये गोदिवा, उल्कर, आणि एलसी वायकिकी यांचा समावेश आहे. तेथील स्किन केअर आणि पर्सनल केअर ब्रॅण्डही भारतात शिरकाव करीत आहेत. पण नव्या बदललेल्या समीकरणामुळे या साऱ्या व्यापारावर तणावाची आणि बॉयकॉटच्या मागणीची काळी छाया पडली आहे. अझरबैजानही पर्यटनाच्या दृष्टीने भारतासाठी महत्त्वाचा देश होता. या देशासाठी नवी दिल्लीहून दर आठवड्याला १० थेट उड्डाणे आहेत. रशिया, तुर्कस्तान, इराणनंतर सर्वाधिक भारतीय पर्यटक अझरबैजानला जातात. बदललेल्या समीकरणात या देशासोबतचा व्यापारही धोक्यात येणार आहे. या दोघांना शह देण्यासाठी भारताने आर्मेनियाला साद घातली असून, भारत-आर्मेनिया युती पाकिस्तानी मित्रांसाठी ध्योक्याची ठरणार आहे.

अझरबैजानचे माजी अध्यक्ष हैदर अलीयेव यांनी म्हटले होते की, तुर्कस्तान आणि अझरबैजान यांच्यात ''एक राष्ट्र, दोन राज्ये'' इतके घनिष्ठ बंधुत्व आहे. बदलत्या भूराजकीय गणितांमुळे हे नाते आता अधिक जटिल परंतु घट्ट अशा युतीमध्ये विकसित झाले आहे. २०२० साली झालेल्या काराबाख युद्धामुळे या दोन देशांनी आर्मेनियाशी शत्रुत्व या समान धाग्याचा वापर करून परस्पर मैत्रीसंबंध अधिकच गहिरे केले आहेत. सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर नागोर्नो-काराबाख संघर्षात रशियाने आर्मेनियाची बाजू घेतली होती. परंतु चार वर्षांपूर्वी झालेल्या मोठ्या संघर्षात रशियाने अझरबैजानचे तेल, गॅस आणि दळणवळणासाठी असणारे महत्त्व ओळखून आर्मेनियाला अपेक्षित पाठिंबा दिला नाही. दुसरीकडे पाकिस्ताननेही अझरबैजानच्या बाजूने मैदानात उतरून या देशाची कोंडी केली. परिणामी दुर्बळ ठरलेल्या आर्मेनियाला नागोर्नो-काराबाखचा मोठा भूभाग अझरबैजानला सोपवावा लागला. तुर्कस्ताननेही संलग्न सीमा बंद करून आर्मेनियाच्या संकटात भर टाकली. आर्मेनियातील कॉकेशिअस भागातील ख्रिश्चनांना कित्येक दशके इस्लामी जिहादी कारवायांचा फटका बसत आला आहे. १९१५-१६ मध्ये जिहादी मुस्लिमांनी जवळपास १२ लाख आर्मेनियन ख्रिश्चनांचे शिरकाण केले होते. सध्या तुर्कस्तानच्या प्रभावक्षेत्रात असलेल्या भूभागात तेव्हा आर्मेनियन ख्रिश्चनांची जनसंख्या २० टक्के होती. मुस्लिमांकडून झालेल्या हत्या व असुरक्षिततेमुळे ख्रिश्चनांनी पलायन केल्यामुळे आज तेथे केवळ २ टक्के ख्रिश्चन उरले आहेत. या पृष्ठभूमीवर भारताकडून आर्मेनियात होणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या विक्रीत लक्षणीय वाढ झालेली आहे. आर्मेनियाला पूर्वी शून्य निर्यात करणारा भारत आज त्यांचा प्रमुख शस्त्रास्त्र पुरवठादार बनला आहे. भारत आणि आर्मेनिया यांच्यातील या सौहार्दाच्या संबंधांमुळे आशिया खंडाच्या उत्तरेला युरोपचे द्वार असणाऱ्या या कॉकेशिअस पर्वतरांगांच्या नजीकच्या या भूभागात भारताला धोरणात्मक आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले असून, भारताचे प्रभावक्षेत्र वाढले आहे.

स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटनुसार २०१६ ते २०१८ दरम्यान आर्मेनियाच्या शस्त्रास्त्र आयातीत भारताचे योगदान जवळजवळ शून्य होते. गेल्या काही वर्षांत ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आर्मेनियाने २०२२ ते २०२४ दरम्यान केलेल्या एकूण शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा आयातीपैकी ४३ टक्के भारतातून केली आहे. भारताने आर्मेनियासोबत शेकडो दशलक्ष डॉलर्सचे करार केले आहेत. आर्मेनिया हा देश आकाश-१एस एअर डिफेन्स मिसाईल सिस्टिम या स्वदेशी विकसित भारतीय हवाई संरक्षण प्लॅटफॉर्मचा पहिला परदेशी ग्राहक आहे. भारताने आर्मेनियाला पिनाका मल्टी-बॅरल रॉकेट लाँचर्स हे अत्यंत सक्षम रॉकेट लाँचर्स पुरवण्यास सुरुवात केली आहे. आर्मेनियाच्या तोफखान्याला प्रगत बनवण्यासाठी भारताने प्रगत आर्टिलरी गन सिस्टिम पुरवल्या आहेत. या देशाने मार्च २०२० मध्ये ४० दशलक्ष डॉलरमध्ये भारताकडून ४ स्वाती वेपन लोकेटिंग रडार खरेदी केले. या देशाने रणगाडाविरोधी रॉकेट आणि विविध दारुगोळा पुरवठ्याबाबत भारताशी करार केला आहे.

गेल्या काही वर्षांपासून अझरबैजान आणि तुर्कस्तान या दोन मुस्लिम देशांच्या कात्रीत सापडलेल्या आर्मेनियाशी धोरणात्मक संबंध प्रस्थापित करून, भारत त्याला विविध शस्त्रास्त्रे पुरवत आहे. आर्मेनियाचे त्याच्या शेजारी राष्ट्रांशी पूर्वापार चालत आलेले वैर आहे. इंग्रजांनी द्विराष्ट्रवादाला खतपाणी घालून भारताची फाळणी केली आणि तेव्हापासूनच भारताला पाकिस्तानातील कट्टरपंथीयांच्या प्रभावामुळे इस्लामी दहशतवादाचा सामना सातत्याने करावा लागत आहे. अगदी तसाच अनुभव आर्मेनियन लोकांना तुर्कस्तान आणि अझरबैजानमधील कट्टरतावादी मुस्लिमांकडून सातत्याने आलेला आहे. फाळणी झाली तेव्हा पाकिस्तानात मुस्लिमांनी हिंसाचार सुरू केल्यामुळे लक्षावधी हिंदूंना पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतात यावे लागले होते. आर्मेनियाच्या अनेक नागरिकांना देखील तुर्कस्तान आणि अझरबैजानने पोसलेल्या जिहादच्या भीतीने पलायन करावे लागलेले आहे. बदलत्या स्थितीत आर्मेनियाशी व्यापार बळकट करून, भारताने तुर्कस्तान आणि अझरबैजानला शह दिला आहे.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# डिजिटल प्रतिकृती; उद्याचे आभासी वास्तव!

सयामी जुळे वा जुळ्या व्यक्तींबद्दल आपण जाणतो. साधारण एकमेकांसारखेच दिसणारे व काही वेळा एकसारखाच विचार करणारे ते एक व्यक्तिमत्त्व असते. अनेक वेळा जुळे इतके सारखे दिसतात की कोण कुठला हेही ठरवणे अवघड जाते. हे झाले भौतिक विश्वाबद्दल. आता क्षणभर कल्पना करा की, आपली एक प्रतिकृती डिजिटली तयार झाली तर काय होईल? ही वास्तवाशी समांतर असणारी प्रतिमा असेल आणि आपली नक्कलही असेल. आज असे काही घडत असून तंत्रज्ञानाचा नवसाक्षात्कार घडवत आहे. या प्रतिकृतीला डिजिटल ट्विन (जुळे) असे म्हटले जाते. एखाद्या वस्तूचा डिजिटल ट्विन म्हणजे तिची आभासी प्रतिकृती. ही प्रतिकृती मूळ वस्तू/व्यक्तीची इत्थंभूत माहिती मिळवून पूर्ण जीवनचक्राचे सदृशीकरण (सिम्युलेशन) करते. डिजिटल ट्विन म्हणजे एखाद्या वास्तविक वस्तूचे, प्रणालीचे किंवा प्रक्रियेचे एक अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिबिंब असते. हे प्रतिबिंब सॉफ्टवेअरच्या साहाय्याने तयार केले जाते आणि वास्तविक वस्तूच्या सर्व वैशिष्ट्यांचे अनुकरण करते. नित्यनेमाने नवोन्मेषाला सामोरे जाणाऱ्या आजच्या काळात तंत्रज्ञानाचे असे आविष्कार सातत्याने पाहायला मिळत असतात. त्यातील काही कल्पनेच्या पलीकडचे असतात, पण आपले जीवन मोठ्या प्रमाणात सुसह्य करतात. उद्याचे आभासी वास्तव ठरू शकणाऱ्या या डिजिटल प्रतिकृतीचे अंतरंग आवर्जून समजून घेण्यासारखे आहेत.

डिजिटल ट्विन हे एक अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे, जे एखाद्या भौतिक वस्तू, प्रणाली किंवा प्रक्रियेचे अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिनिधित्व करते. या आभासी प्रतिनिधित्वालाच डिजिटल ट्विन म्हणतात. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिजिटल क्षेत्र आणि वास्तविक जगाचे एकत्रीकरण झाले आहे. यामुळे डिजिटल ट्विन तंत्रज्ञान हे एक अपरिहार्य साधन म्हणून उदयाला आले आहे. या तंत्रज्ञानामुळे उद्योगांना आकार मिळतो आहे. व्यवहारांमध्येही क्रांती घडते आहे. सुरुवातीच्या काळात फक्त उत्पादनाच्या स्तरावर याची कल्पना केली होती. पण आता आभासी जगात आणि भौतिक वास्तवांसाठीही हे डिजिटल तंत्रज्ञान वापरात येणार आहे. 'डिजिटल ट्विन' हा शब्द सगळ्यात पहिल्यांदा २००२ मध्ये मिशिगन विद्यापीठात डॉ. मायकेल ग्रीव्हस यांनी सादर केला होता. सुरुवातीच्या काळात उत्पादन क्षेत्रात ही संकल्पना मांडण्यात आली होती. त्यानंतर ही कल्पना मोठ्या प्रमाणात ॲप्लिकेशन्सचा समावेश करण्यासाठी विकसित झाली. डिजिटल ट्विनमध्ये विविध परिस्थितींचे अनुकरण करून आणि डेटाचे विश्लेषण करून भविष्यसूचक देखभाल, परिपूर्ण व्यवहार आणि उत्पादन विकासामध्ये नावीन्य आणले जाते. भौतिक मालमत्ता आणि प्रक्रियांच्या कामगिरीचे परीक्षण, विश्लेषण आणि त्याची क्षमता वाढवण्यासाठी उत्पादन, आरोग्यसेवा, वाहतूक आणि शहरी नियोजन यासारख्या विविध उद्योगांमध्ये डिजिटल ट्विन्सचा वापर केला जातो. हे तंत्रज्ञान वेगवेगळ्या परिस्थितींची पडताळणी करू शकते, त्याच्या परिणामांचा अंदाज लावू शकते आणि निर्णय घेण्यासाठीही मदत करू शकते.



मेटाव्हर्समध्ये एक आभासी जागा तयार केले जाते. यामध्ये वापरकर्ते डिजिटल वातावरणाशी आणि एकमेकांशी संवाद साधतात आणि डिजिटल ट्विनिंगला अनेक प्रकारे छेदतात. मेटाव्हर्स विकसित होत असताना समग्र आणि एकमेकांशी जोडलेले आभासी जग तयार करण्यासाठी डिजिटल ट्विन कणा म्हणून काम करू शकतात. हे तंत्रज्ञान वापरकर्त्यांना मेटाव्हर्समध्ये स्वतःचे अत्यंत तपशीलवार आणि अचूक प्रतिनिधित्व तयार करण्यास सक्षम बनवू शकते. यामुळे वैयक्तिक स्वरूपाचे आणि खरे असल्यासारखे अनुभव घेता येतात. उदाहरणार्थ, व्हर्च्युअल शॉपिंगमध्ये उत्पादनांचे डिजिटल ट्विन्स खरेदीचे निर्णय घेण्यासाठी वापरकर्त्यांना मदत करू शकतात. शिवाय डिजिटल ट्विन्स मेटाव्हर्समधील विविध मंच आणि यंत्रणांमधली देवाणघेवाण सुलभ करतात. तसेच विविध आभासी वातावरणांमध्ये अखंड संवाद आणि परस्परसंवादही घडवून आणतात. या देवाणघेवाणीमुळे परस्परसंबंधित अनुभव घेता येतात आणि जागतिक स्तरावर सहयोग आणि नवकल्पना वाढीला लागते. डिजिटल ट्विन्स विविध क्षेत्रांमध्ये खोली, समृद्धी आणि कार्यक्षमता वाढवून मेटाव्हर्सचा लक्षणीय विस्तार करू शकतात. याव्यतिरिक्त स्मार्ट शहरे, औद्योगिक संयंत्रे किंवा नैसर्गिक वातावरण यासारख्या संपूर्ण इकोसिस्टिमचा समावेश करण्याच्या उद्देशाने डिजिटल ट्विन वैयक्तिक प्रतिनिधित्वाच्या पलीकडे विस्तारू शकतात. रिअल-टाईम डेटा आणि सिम्युलेशन एकत्रित करून हे तंत्रज्ञान बहुआयामी आणि प्रतिसादात्मक आभासी जग आणखी सक्षम करते. यामुळे त्यांचे भौतिक समकक्ष जवळून प्रतिबिंबित करता येतात.

डिजिटल जुळे डेटा स्रोतांशी जोडलेले असतात. परिधान केलेल्या एका छोट्या उपकरणाद्वारे आपले डिजिटल विश्व साठवले जाते, आपण भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे सोशल प्रोफाईल्स, झालेले संभाषण, व्यवहार या सर्व बाबींचा त्यात अंतर्भाव असतो. अनेक वर्षांच्या साठवणुकीनंतर या माहितीचे एआय तंत्राद्वारे पृथक्करण करून काही विशिष्ट साचे, वर्तणुकीचे प्रकार तयार केले जातात. या संकल्पनेचा उपयोग आपल्याला स्मरण केलेल्या गोष्टी साठवण्यासाठी करता येऊ शकतो. मानवी मेंदूमध्येही अफाट क्षमता असते, पण त्यात कालानुरूप त्रुटी निर्माण होतात. अनेकांना विस्मरण होते, एखादी व्यक्ती समोर येते पण नाव आठवत नाही. कधी कधी नाव आठवते पण व्यक्ती डोळ्यासमोर येत नाही. इथे आपला डिजिटल जुळा मदत करू शकतो. एआयमधील प्रिडिक्टिव्ह अॅनॅलिटिक्स तंत्रामुळे आपण एखाद्या व्यक्तीला वा ठिकाणी जायच्या आधी त्यासंबंधी माहितीची खातरजमा, उजळणी आधीच करू शकतो. काही टूल्स तुमची रिअलटाईम मदत करू शकतात.

प्लॉड या एआय उद्योगाने नोट नावाचा एक स्लिम सक्षम ऑडिओ रेकॉर्डर विकसित केला आहे. तो तुमच्या फोनच्या मागील बाजूस अडकवला जाऊ शकतो किंवा तुमचे संभाषण रेकॉर्ड करण्यासाठी, हावभाव रेकॉर्ड करण्यासाठी आणि सारांशित करण्यासाठी शर्टच्या खिशात ठेवला जातो. हे तंत्र नेहमी तुमचे संभाषण ऐकते आणि कालांतराने तुमचे व्यक्तिमत्त्व, तुमची प्राधान्ये, तुमचे संवाद जाणून घेत काही वर्षांत तुमचे, डिजिटल जुळे तयार करते. या तंत्रात आणि चॅटजीपीटीसारख्या जनरेटिव्ह एआय टूल्समध्ये बराच फरक आहे. चॅटजीपीटी सार्वत्रिक डिजिटल माहितीसंग्रहाचे पृथक्करण करून माहिती निर्माण करते. इथे तसे होत नाही. फक्त आपल्याशी संबंधित माहितीचे पृथक्करण आपला डिजिटल ट्विन करतो आणि गरज पडल्यास आपली जागादेखील घेतो. यामुळे आपल्या मानवी मेंदूच्या क्षमता कमी होतील असे काहींना वाटते. गुगल मॅप वापरून आपण दिशा शोधतो आणि इच्छित स्थळाचा वेध घेतो. पूर्वी आपण स्मरणशक्तीला ताण देऊन विचारत विचारत एखादा पत्ता शोधत असू. एकदा कष्टाने शोधलेला पत्ता कायम लक्षात राहत असे. आता हेच तंत्र सर्वत्र हातपाय पसरू लागले आहे. यामुळे भविष्यात माणसाचे आयुष्य सुसह्य नक्की होणार आहे. फक्त एक मोठा धोका आहे तो सुरक्षेचा. आपल्याबद्दलची सर्व माहिती सायबर गुन्हेगारांनी चोरली तर ते दुरुपयोग करू शकतात. सर्वच तंत्रांना असा धोका असतोच. त्यामुळे जास्त काळजी घेतली पाहिजे हेच अंतिम सत्य.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# पुन्हा कोरोना; सावध होण्याची वेळ

कोरोना विषाणूने संपूर्ण जगाला हादरवून सोडले होते. भारतातही याचा प्रचंड फटका बसला. लाखो जणांना आपले प्राण गमवावे लागले, कोट्यवधी लोकांचे आयुष्य बदलून गेले. दोन वर्षांच्या कठीण काळानंतर कोरोना नियंत्रणात आला, लसीकरणाने जनतेत आश्वस्तता आली आणि समाज पुन्हा एकदा सामान्य जीवनाकडे वळला. मात्र, नुकतेच समोर आलेले आकडे पाहता पुन्हा एकदा कोरोनाचा धोका डोके वर काढत आहे. देशात सध्या चार हजार नवीन कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. विशेषतः महाराष्ट्रात पुन्हा नव्याने ८६ रुग्ण आढळले असून, चंद्रपूर, नागपूर आणि इतर काही जिल्ह्यांमध्ये केवळ दोन दिवसांत चार मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. ही स्थिती गंभीर असून, जनतेने आणि शासनाने दोघांनीही योग्य खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे. लसीकरणानंतर कोरोना संपला आहे, अशी एक सामूहिक भावना समाजात निर्माण झाली होती. त्यामुळे अनेकांनी मुखाच्छादन वापरणे, सार्वजनिक ठिकाणी भौतिक अंतर राखणे, सॅनिटायझर वापरणे यासारख्या गोष्टी पूर्णपणे थांबवल्या.



पण आता, जेव्हा पुन्हा रुग्णसंख्या वाढू लागली आहे, तेव्हा या गाफीलपणाचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. लस ही संसर्ग पूर्णपणे रोखत नाही, तर ती फक्त गंभीर लक्षणे, हॉस्पिटलायझेशन आणि मृत्यूचे प्रमाण कमी करते. नव्याने आढळणारे कोरोना व्हेरिएंट्स, विशेषतः ओमिक्रॉन आणि त्याचे उपप्रकार, हे अधिक संसर्गजन्य असून लसीकरणानंतरही लोकांना बाधित करत आहेत. त्यामुळे वाढती रुग्णसंख्या ही फक्त आरोग्य व्यवस्थेसाठी नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी चिंतेची बाब आहे.

पुढील मोठा प्रश्न हा आहे की शासनाने नव्याने उद्भवणाऱ्या परिस्थितीकडे किती गांभीर्याने पाहिले आहे? २०२० आणि २०२१ मध्ये जो त्रास सहन करावा लागला- ऑक्सिजनचा तुटवडा, बेड्सची अनुपलब्धता, औषधांची टंचाई- ही परिस्थिती पुन्हा उद्भवू नये यासाठी सरकारने आणि आरोग्य यंत्रणांनी योग्य त्या उपाययोजना आखणे गरजेचे आहे. शासनाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजना जर लोकसंख्येच्या तुलनेत अत्यंत मर्यादित राहिल्या, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचबरोबर सार्वजनिक कार्यक्रम, सण-समारंभ, राजकीय सभा यामध्ये खबरदारी घेतली जात आहे का, याचीही खातरजमा केली पाहिजे. सध्याच्या वातावरणात कुठलाही हलगर्जीपणा प्रचंड महागात पडू शकतो. कोरोनाचा संसर्ग पुन्हा पसरू नये यासाठी काही ठोस उपाययोजनांची अंमलबजावणी आवश्यक आहे. सर्वप्रथम, मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहिमा पुन्हा सुरू कराव्या लागतील. नागरिकांनी मुखाच्छादन वापरणे, गर्दी टाळणे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे याचे महत्त्व पुन्हा लक्षात आणून द्यावे लागेल. शाळा आणि महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांमध्ये योग्य माहिती पसरवणे अत्यावश्यक आहे. तसेच, समाज माध्यमावर अफवा आणि चुकीच्या माहितीचा प्रसार होऊ नये यासाठी सायबर यंत्रणांनी अधिक जागरूक राहिले पाहिजे. साथीच्या रोगांमध्ये सुरुवातीचे काही दिवस अत्यंत महत्त्वाचे असतात. त्यामुळेच कोविड चाचण्या मोठ्या प्रमाणावर वाढविणे, संसर्ग असलेल्या भागात हॉटस्पॉट तयार करून निर्बंध लावणे, नागरिकांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे हे तातडीचे उपाय असू शकतात. याशिवाय, सरकारी रुग्णालयांमध्ये कोविडसाठी आवश्यक औषधे, व्हेंटिलेटर्स, पीपीई किट्स, ऑक्सिजनची साठवणूक याची पुन्हा एकदा तपासणी करून सर्व व्यवस्था सज्ज ठेवावी लागेल. अशा उपाययोजनांनी मोठ्या संकटाला टाळता येऊ शकते. ज्या जिल्ह्यांमध्ये आधीच मृत्यू झाले आहेत, तिथे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. चंद्रपूर, नागपूर आणि इतर भागांमध्ये घडलेले मृत्यू हे केवळ आकडेवारी नसून तो एक इशारा आहे. हे मृत्यू लसीकरण असूनही झाले का, संबंधित व्यक्तींना इतर आजार होते का, त्यांच्यावर वेळीच उपचार झाले का - या सर्व बाबींची चिकित्सा व्हायला हवी. सरकारने अशा भागांमध्ये विशेष आरोग्य पथक नेमून स्थानिक स्तरावर उपाययोजना सुरू करायला हव्यात. कोरोनाचा अनुभव आपल्याला शिकवून गेला होता की, आरोग्य व्यवस्था किती महत्त्वाची आहे. त्यामुळे आता पुन्हा ही चूक टाळण्याची गरज आहे. ही वेळ काळजी घेण्याची आहे. जागरूक होण्याची आहे. कारण पुन्हा कोरोना आला आहे आणि तो कोणाला क्षमा करणार नाही, हे तितकेच सत्य आहे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# तेजप्रताप, राजद आणि बिहारची निवडणूक

बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे सर्वेसर्वा लालूप्रसाद यादव यांनी आपला मोठा मुलगा तेजप्रताप यादव याची पक्षातून आणि कुटुंबातून हकालपट्टी केली. राजकीय पक्षात पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे एखाद्या नेत्याची पक्षातून हकालपट्टी करण्याच्या घटना नवीन नाही. पण पक्षासोबत एखाद्या नेत्याची कुटुंबातूनही हकालपट्टी होण्याची घटना दुर्मिळ म्हणावी लागेल. याला कारण ठरले २४ मेची फेसबुकवरील एक पोस्ट. यात आपण १२ वर्षांपासून अनुष्का यादव यांच्यासोबत लिव्ह इन मध्ये असल्याचे तेजप्रताप यादव यांनी म्हटले होते. एकप्रकारे त्यांनी आपल्या प्रेमाची जाहीर कबुली दिली. यामुळे बिहारच्या राजकारणात विशेषतः राजदमध्ये भूकंप आला.

भाजपा आणि जदयूच्या प्रवक्त्यांनी राजदवर हल्ला चढवला. त्यामुळे तेजप्रताप यांनी ही पोस्ट काढून टाकली. नंतर पुन्हा टाकली आणि दुसऱ्यांदा पुन्हा काढून टाकली. यामुळे राजद तसेच लालूप्रसाद यादव यांच्या कुटुंबाचे व्हायचे ते राजकीय नुकसान होऊन गेले. पक्षाची तसेच कुटुंबाची प्रतिमा डागाळल्याच्या कारणावरून लालूप्रसाद यांनी तेजप्रताप यांची पक्षातून सहा वर्षांसाठी तसेच कुटुंबातून अनिश्चित काळासाठी हकालपट्टी केली. खरं म्हणजे सामान्यस्थितीत ही असामान्य घटना नव्हती. पण बिहार विधानसभेची निवडणूक यावर्षीच्या अखेरीस होऊ घातली आहे. त्यामुळे तेजप्रतापची छछोर वागणूक आपल्याला अडचणीत आणेल, असे वाटल्यामुळे लालूप्रसाद यादव यांना या घटनेची गंभीर दखल घ्यावी लागली.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तेजप्रताप आणि ऐश्वर्या राय यांच्या घटस्फोटाचे प्रकरण न्यायालयात आहे. तसेच येत्या महिन्या दोन महिन्यात त्याचा निकाल लागण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील निकाल तेजप्रताप यांच्या विरोधात जाण्याची शक्यता आहे. ऐश्वर्या राय या बिहारचे माजी मुख्यमंत्री दरोगाप्रसाद राय यांची नात आहे. ऐश्वर्याचे वडील चंद्रिकाप्रसाद हे राजदचे नेते होते. तेजप्रताप १२ वर्षांपासून अनुष्का यादव हिच्यासोबत लिव्ह इनमध्ये असताना लालूप्रसादांनी त्याचे ऐश्वर्या रायशी लग्नच का केले, असा प्रश्न उपस्थित होतो. म्हणजे लालूप्रसादांनी ऐश्वर्या राय आणि तिच्या संपूर्ण कुटुंबाची फसवणूक केली, असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतील संभाव्य राजकीय नुकसान टाळण्यासाठी लालूप्रसादांना तेजप्रतापची कुटुंबातूनही हकालपट्टी करावी लागली. अन्यथा लालूप्रसाद यादव आणि नैतिकता आणि नीतिमत्ता यांचा दूरदूरपर्यंत संबंध नाही. लालूप्रसाद यादव यांचा आतापर्यंतचा राजकीय इतिहास पाहिला तरी यापेक्षा जास्त गंभीर अशी अनेक प्रकरणे त्यांच्या कार्यकाळात राजदमध्ये घडली आहेत. लालूप्रसाद यांचा साळा साधू यादव याच्या गुंडगिरीच्या घटना तर बिहारमधील जनतेच्या अंगावर काटा आणणाऱ्या होत्या. पण तेव्हा कधी लालूप्रसादांना नैतिकता आठवली नाही. त्यांनी साधू यादववर कोणतीही कारवाई केल्याचे स्मरत नाही. त्यामुळे तेव्हा कुठे गेला होता तुझा धर्म असे लालूप्रसादांना विचारावेसे वाटते. याचा अर्थ तेजप्रताप यादव यांच्यावरील त्यांची कारवाई चुकीची आहे, असे नाही.



काही वर्षांपूर्वी राजदमध्ये सक्रिय असताना तेजप्रताप यादवने आकाश यादव याची राजदच्या युवा आघाडीचा अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती. त्यावेळी राजदचे प्रदेश अध्यक्ष जगदानंदसिंह यांनी आकाश यादवची त्याच्या पदावरून हकालपट्टी केली होती. त्यामुळे चिडलेल्या तेजप्रतापने जगदानंदसिंह यांचा जाहीरपणे अपमान केला होता. आकाश यादव हा त्याच अनुष्का यादवचा भाऊ असल्याचे आता उघडकीस आले आहे. गंमत म्हणजे जगदानंदसिंह यांचा मुलगा खासदार सुधाकरने तेजप्रताप यादवची पाठराखण केली आहे. लालूप्रसाद यादव यांनी कारवाई केली असली तरी तेजप्रतापने त्यांच्याविरोधात कोणतेही विधान केले नाही वा नाराजीही व्यक्त केली नाही. ट्विटमधून त्याने वडील लालूप्रसाद यादव आणि आई राबडीदेवी यांच्याबद्दल आदरच व्यक्त केला आहे. एवढेच नाही तर आपण भाऊ तेजस्वी यादवच्या पाठीशी असल्याचे म्हटले आहे.

असे करताना त्याने आपल्यावरील कारवाईचे खापर पक्षातील जयचंदांवर फोडले आहे. तेजस्वी यादवांचे राजकीय सल्लागार संजय यादव यांच्यावर तेजप्रतापचा खरा राग आहे. संजय यादवमुळे पक्षात आपल्याला डावलले जात असल्याचा त्याचा आरोप आहे. त्यामुळे संजय यादव यांचा उल्लेख तेजप्रतापने जयचंद असा केल्याचे मानले जात आहे. शिवसेना उबाठात जे स्थान मिलिंद नार्वेकर यांचे आहे, ते स्थान राजदमध्ये संजय यादवचे असल्याचे समजते. ज्याप्रमाणे शिवसेनेत मिलिंद नार्वेकर यांच्या अनुमतीशिवाय कोणी उद्धव ठाकरे यांना भेटू शकत नाही, त्याप्रमाणे राजदमध्ये संजय यादव यांच्या अनुमतीशिवाय कोणालाच लालूप्रसाद यादव आणि तेजस्वी यादव यांना भेटता येत नाही, असे म्हटले जाते.

तेजप्रताप यादव हा कधी स्वत:ला भगवान कृष्णाचा अवतार मानतो, कधी शंकराचा. राजदमध्ये असतानाही त्याच्या वागणुकीने पक्षाचे सर्व नेते त्रस्त झाले होते. त्यामुळे त्याच्या हकालपट्टीने सुंठेवाचून खोकला गेल्याची भावना पक्षात व्यक्त केली जात आहे. पण तेजप्रताप फार दिवस पक्षाबाहेर राहील असे वाटत नाही. त्याचे फार दिवस बाहेर राहणे राजदला परवडणारे नाही. याचा अर्थ पक्षात त्यांचा खूप फायदा आहे, असे नाही. राजदमध्ये फूट पाडण्यासाठी जदयू वा एखादा राजकीय पक्ष तेजप्रतापला आपल्याकडे ओढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेजस्वी यादव यांचे पक्षातील राजकीय वर्चस्व वाढल्यानंतर तेजप्रतापने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी राजदला आव्हान देण्यासाठी लालू-राबडी मोर्चा काढला होता. त्याला राजदविरुद्ध उमेदवार उतरवायचे होते, पण ते शक्य झाले नाही. फक्त जहानाबाद लोकसभा मतदारसंघात त्याने चंद्रप्रकाश हा आपला उमेदवार दिला. त्याला ७७५५ मते मिळाली. या मतदारसंघात राजदचे सुरेंद्र यादव यांचा १७५१ मतांनी पराभव झाला होता.

म्हणजे तेजप्रताप आपले उमेदवार जिंकवू शकला नाही तरी राजदचे उमेदवार हरवू नक्की शकतो. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या आधी लालूप्रसाद तेजप्रतापला पक्षात परत घेतील, हे नक्की. बाहेर निर्वासितासारखे राहण्यापेक्षा राजदमध्ये राहण्यात तेजप्रताप याचाही फायदा आहे. लालूप्रसाद यांचा ओढा तेजस्वी यादवकडे असला तरी तेजप्रताप आई राबडीदेवीचे लाडके आहेत. त्यामुळे राबडीदेवीच्या मध्यस्थीने येत्या काही दिवसांत तेजप्रतापची घरवापसी झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मात्र काही दिवस तरी तेजप्रताप बिहारच्या राजकारणात खळबळ उडवेल, यात शंका नाही.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### मनपा व महा मेट्रोची उत्कृष्ट संकल्पना

नागपूर विमानतळाकडून अजनी चौकाकडे येताना वर्धारोड महामार्ग व मेट्रोरेलचा तीन मजली अत्याधुनिक उड्डाणपूल आहे. त्यातील मधील मार्गावर अगदी वर चढतानापासूनच भारतरत्न पुरस्कारांनी सन्मानित व्यक्तींचे मोठाले फोटो नावांसह सुंदररीत्या विशिष्ट अंतरावर लावण्यात आले आहेत. यामधील उड्डाणपुलाचे अंतर पार करताना एका वेगळ्याच आनंदाची अनुभूती होते व या महानुभावांचे सहजच स्मरण होते. ही सुंदर संकल्पना प्रत्यक्षात उतरविणारे कौतुकास पात्र आहेत. माझे मित्र आनंद सहस्त्रबुद्धे यांनी या संदर्भात मांडलेली एक संकल्पना मांडू इच्छितो. आनंद यांचा असा प्रस्ताव आहे की नागपुरातीलच एक असा उड्डाणपूल जो सदर ते कामठीपर्यंत विस्तारित आहे (ऑटोमोटिव्हच्या पण पुढे जाणार) हा मेट्रो-महामार्गावर देखील अशाच प्रकारे आपले तीनही सैना दलांचे शूरवीर, सर्वोच्च परमवीरचक्र विजेते जवान/अधिकारी यांचे पण फोटो लावून त्यांना पण सन्मानित करण्यात यावे. नागपूरमधील अशा वेगळेपणाला नागरिकांचा व नागपुरात चहूबाजूंनी प्रवेश करणारे प्रवासी यांना नक्कीच अभिमान वाटेल ही खात्री आहे. नागपूर नगरीत प्रवेश करताच अशा प्रेरणादायी व्यक्तींचे दर्शन घडल्यास नक्कीच नागपूरच्या वैभवात भर पडेल यात शंका नाही. तेव्हा या सूचनेचा विचार व्हावा, ही विनंती.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

### काँग्रेसकडून मोदीद्वेषाचा अतिरेक सुरूच

'शशी थरुर बनले भाजपाचे प्रवक्ते' ही बातमी वाचली. म्हणजे आजवर शशी थरुर यांनी जे केले ते काँग्रेसला योग्य वाटत होते पण आता कुठे त्यांनी मोदींचे थोडेसे कौतुक केले तर काँग्रेसला ती चमचेगिरी वाटावी? या सगळ्या प्रकारांचा नीट आणि खोलवर विचार केला तर त्याच्या मुळाशी, देशहिताला दुय्यम मानून व्यक्तिपूजेचा अतिरेक हे एकमेव कारण असल्याचे दिसून येते. काँग्रेस, भाजपा, समाजवादी पक्ष, द्रमुक, अण्णा द्रमुक, तृणमूल काँग्रेस, शिवसेना (दोन्ही गट), राष्ट्रवादी काँग्रेस (दोन्ही गट), नॅशनल कॉन्फरन्स, मनसे, राष्ट्रीय जनता दल अशा विविध राजकीय पक्षांची विचारसरणी बघितली की आपला नेता म्हणेल ती पूर्वदिशा अशी विचारधारा फोफावत आहे, मग तो नेता काहीही म्हणो! पूर्वी म्हणजे १९७५ च्या आणिबाणी लागण्याआधी, काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष असलेल्या देवकांत बारूआ यांनी इंदिरा इज इंडिया आणि इंडिया इज इंदिरा असे वादग्रस्त वक्तव्य करून व्यक्तिपूजेच्या जाहीर अतिरेकाचा श्रीगणेशा केला होता. अर्थात तत्पूर्वी आणि त्यानंतरही अनेकांच्या बाबतीत हा अतिरेक झाला आहे. आताही मोदींना विरोध म्हणजे भारताला विरोध, असे नवीन समीकरण जन्माला आले आहे. वास्तविक पंतप्रधान नरेंद्र मोदी जे काही करतात ते त्यांच्या व्यक्तिगत फायद्यासाठी नसून केवळ देशहितासाठीच असते, हे जनताजनार्दन चांगले ओळखून आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात जनता कधीच बोलत नाही. मात्र मोदींना ठिकठिकाणी विरोध करणे हाच काँग्रेसच्या नेत्यांचा जीवनमार्ग झाल्यामुळे कोणीही मोदींचे कौतुक केले की काँग्रेसच्या तळपायाची आग मस्तकात जाणे साहजिकच आहे. मग काँग्रेसचे शशी थरुर यांनी मोदींचे केलेले कौतुक त्यांना कसे सहन होणार? भारतद्वेष आणि मोदीद्वेष यात फरक करण्याची काँग्रेसच्या नेत्यांची तयारी नाही हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### विस्तारवादी चीनला अद्दल घडवायलाच हवी

चीन हा नेहमीच पाकिस्तानची बाजू घेत आलेला आहे. दहशतवादाला पाठिंबा देतानाच त्याची पाठराखण करत आलेला आहे. प्रत्येक वेळी भारताविरुद्ध असलेली त्याची भूमिका काही नवीन नाही. ऑपरेशन सिंदूरच्या वेळी त्याने पाकिस्तानला शस्त्रे पुरवली. या आधीही ''हिंदी चिनी भाई भाई'' म्हणत त्याने आपला विश्वासघात केलेला आहेच. आता तर तो उघडपणे भारताविरुद्ध पाकिस्तानला समर्थन देतो आहे. नुकतेच त्याने बांगलादेशला देखील कर्ज दिले आहे. मदतीच्या नावाखाली त्या देशाला शस्त्र विकणे आणि हळूहळू तिथे आपले हातपाय पसरून तो भाग गिळंकृत करणे ही चीन अर्थात ड्रॅगनची जुनीच खोड आहे. पण ही खोड जिरवणे आपल्या हातात आहे. कारण पाकिस्तान आणि बांगलादेशच्या सीमा भारताला लागून असल्यामुळे भारतासाठी ही चिंताजनक बाब आहे. त्यामुळे या ड्रॅगनच्या मुसक्या आवळून त्याच्या मुळावरच घाव करायला हवा आणि त्यासाठी त्याचा पाठीचा कणा मोडायला हवा. शत्रुराष्ट्राशी युद्ध हे केवळ शस्त्राने लढता येत असे नाही तर त्याची आर्थिक बाजू कमकुवत करून सुद्धा युद्ध जिंकता येते. भारतीय बाजारपेठ जर चीनच्या हातून आपण काढून घेतली तर या विस्तारवादी चीनचे कंबरडे मोडल्याशिवाय राहणार नाही. यासाठी चीनच्या वस्तूंवर बहिष्कार घालायला हवा.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# पहिल्या बुधवारी महापालिकेच्या चार झोनमध्ये जनता दरबार

### झोन क्रमांक १ मध्ये ५ तर २ मध्ये ७ तक्रारी

### विभागीय कार्यालय ३ व ७ मध्ये एकही अर्ज नाही



**सोलापूर, दि. ४ जून-**

आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या निर्देशानुसार प्रत्येक बुधवारी दुपारी १२ ते २ या वेळेत नियंत्रण अधिकारी यांच्या उपस्थिती संबंधित विभागीय कार्यालयांमध्ये जनता दरबार आयोजित करण्यात आले होते.

पहिल्या बुधवारी महापालिकेच्या ४ झोन मध्ये जनता दरबार घेण्यात आला. झोन क्रमांक १ मध्ये ५ तर २ मध्ये ७ तक्रारी अर्ज आले होते. विभागीय कार्यालय ३ , ७ मध्ये एकही अर्ज प्राप्त झाला नाही महापालिकेच्या वतीने सोलापूर शहरातील नागरिकांच्या समस्यांचे तातडीने आणि प्रभावीपणे निराकरण करण्यासाठी हा जनता दरबार घेण्यात येत आहे. आज पहिल्या बुधवारी विभागीय कार्यालयात १ येथे उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या उपस्थितीत जनता दरबार घेण्यात आला. यावेळी विभागीय कार्यालयाकडे एकूण ५ तक्रारी अर्ज प्राप्त झाले त्यामध्ये दूषित पाणीपुरवठा, नळ कनेक्शन, घनकचरा व सार्वजनिक शौचालय बाबत तक्रारी करण्यात आले होत्या.

विभागीय कार्यालय क्रमांक २ येथे उपायुक्त किरणकुमार मोरे यांच्या उपस्थितीत जनता दरबार घेण्यात आला.यावेळी ७ तक्रारी अर्ज प्राप्त झाल्या होत्या.त्यामध्ये पाणीपुरवठा,ड्रेनेज, अतिक्रमण, रस्त्यावरील दिवे, रस्त्यावरील खड्डे इत्यादी संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. विभागीय कार्यालय क्रमांक ३ व ७ येथील जनता दरबार घेण्यात आला पण या विभागीय कार्यालयामध्ये एकही अर्ज आज प्राप्त झाला नाही.

आज प्राप्त झालेल्या सर्व तक्रारीच्या अनुषंगाने उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी यांनी संबंधित विभागाच्या अधिकारी यांना तात्काळ आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सोडवण्यासंदर्भात सूचना दिल्या. यावेळी सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांच्यासह विभागीय अधिकारी, संबंधित विभागीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## GANDHI NATHA RANGJI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE & HOSPITAL, SOLAPUR

13, Budhawar Peth, Jain Boarding Campus, Balives, Solapur-413002.
Phone College : (0217) 2624900 / 01, Prathisthan : (0217) 2324187
Fax No. (0217) 2624900 Email : gnrhmc09@gmail.com

**WANTED**

| Sr. No. | Dept. / Subject | Vacant Post: Professor | Associate Professor (Reader) | Assistant Professor (Lecturer) |
|---|---|---|---|---|
| 1. | Homoeopathic Materia Medica | 01 (Open) | 01 (Open) | 01 (SC) |
| 2. | Organon of Medicine Homopathic Philosophy Fundamentals | 01 (Open) | -- | 01 (SC) |
| 3. | Homoeopathic Repertory & Case Taking | 01 (Open) | -- | 01 (SC) |
| 4. | Anatomy | 01 (Open) | -- | -- |
| 5. | Physiology including Biochemistry | 01 (Open) | -- | -- |
| 6. | Forensic Medicine & Toxicology | -- | -- | 01 (Open) |
| 7. | Community Medicine Research Methodology & Biostatistics | -- | -- | 01 (Open) |
| 8. | Pathology & Microbiology | -- | 01 (Open) | -- |
| 9. | Surgery | -- | -- | 01 (Open) |
| 10. | Obstetrician & Gynecology | -- | -- | 01 (Open) |

Qualification, experience and pay scales are as per NCH New Dehli/MUHS, Nashik Norms. Eligible candidates should send resume and copies of qualifications certificates, experience certificate at College Office within 15 days from the date of publication of Advertisement.

**Mr. Sanjay Gandhi**
**President**

Sri Swami Samarth Ads

## श्री बालाजी शिक्षण मंडळ, बालाजीनगर

**ता. मंगळवेढा, जि. सोलापूर**

**पाहिजेत**

आमच्या श्री बालाजी शिक्षण मंडळ, बालाजीनगर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर या संस्थेमार्फत चालू असलेल्या विजाभजच्या १००% अनुदानीत माध्यमिक आश्रम प्रशाला, कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, बालाजीनगर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर या माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत खालीलप्रमाणे पदे भरावयाची आहेत.

| अ. क्र. | आश्रमशाळेचे नाव | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | विषय | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | माध्यमिक आश्रम प्रशाला, बालाजीनगर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | शिक्षक | ३ | B.SC.B.Ed. - २<br>B.A.B.Ed. - १ | गणित - १<br>विज्ञान -१<br>इंग्रजी - १ | अनु. जाती (SC) / अनु. जमाती (ST), भज-ब (NT-B)/ भजड (NT-D)/ एसईबीसी (SEBC)/इ. डब्लूएस (EWS) **या प्रवर्गामधून ३ पदे भरणार.** |
| | | प्रयोगशाळा परिचर | १ | १२ विज्ञान उत्तीर्ण | - | अनु. जाती (SC) / अनु. जमाती (ST)/ अराखीव (OPEN) **या प्रवर्गामधून १ पद भरणार.** |
| २ | कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय बालाजीनगर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | स्वयंपाकी | १ | ४ थी पास | - | अनु. जाती (SC) / भज-ब (NT-B) / अराखीव (OPEN) **या प्रवर्गामधून १ पद भरणार.** |
| | | कामाठी | १ | ७ वी पास | - | अनु.जाती (SC)/ अनु.जमाती (ST), भज-ब (NT-B)/इमाव (OBC)/ एसईबीसी (SEBC)/ इ. डब्लूएस (EWS) /अराखीव (OPEN) **या प्रवर्गामधून २ पद भरणार.** |
| | | मदतनिस | १ | ७ वी पास | - | |

वरील पदे अनु.जाती/ अनु. जमाती व इतर प्रवर्गामधून भरावयाची आहेत. तसेच अनु. जमातीचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर प्रवर्गातील उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. सदर पदाचे वेतन व भत्ते शासनाच्या नियमाप्रमाणे देय राहतील. तरी इच्छूक उमेदवारांनी बुधवार दि.११/०६/२०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता संस्था कार्यालय (C/O माध्यमिक आश्रम प्रशाला, बालाजीनगर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर) येथे लेखी अर्ज व मूळ प्रमाणपत्रासह उपस्थित रहावे. प्रत्यक्ष उपस्थित उमेदवारांची प्रथम लेखी परीक्षा घेतली जाईल व त्यानंतर लेखी परीक्षेतील पात्र उमेदवारांची तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित रहावे.

**मुख्याध्यापक / प्राचार्य**
**माध्यमिक आश्रम प्रशाला, कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, बालाजीनगर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर**

**सही/-**
**अध्यक्ष**
**श्री. बालाजी शिक्षण मंडळ, बालाजीनगर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर**

## जाहीर समन्स

मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा),
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप, असोसिएशन लि. सोलापूर,
113 (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - 413002

**कृषीसेवा अर्बन को-ऑप बँक लि. कोळे - अर्जदार**
**ता. सांगोला जि. सोलापूर**
**विरुध्द**
**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| 1 | 1134/2024-25 | 439348/- | 2 | श्री. उमेश पोपट माळी<br>मु.पो. कोळे, ता.सांगोला जि. सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहिर समन्स देत आहोत.

**उपनिर्दीष्ठ अर्जासबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार दि.24/06/2025 रोजी दुपारी 12.00 वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीव्दारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहील्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. आज दि. 03/06/2025 रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप, असोसिएशन लि., सोलापूर**

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**सार्वजनिक आरोग्य अभियंता**
**जलवितरण विभाग**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

सोलापूर महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाकडील विविध ठिकाणी पाईपलाईन टाकणे कामाचे ई-निविदाबाबत.

१) TENFER ID : 2025_SMC_1186835_1
२) TENFER ID : 2025_SMC_11868641_1
३) TENFER ID : 2025_SMC_1186948_1

या कामाचे टेंडर शासनाच्या **http://mahatenders.gov.in** या वेबसाईटवर दि. ०५/०६/२०२५ सकाळी १०.०० वाजल्यापासून पहावयास उपलब्ध आहेत.

**सही/-**
**प्र. सार्वजनिक आरोग्य अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

## अवसायक दि लक्ष्मी को ऑप बँक लि सोलापूर (अवसायनात)

**मुख्य कार्यालय - ३१९ दक्षिण कसबा सोलापूर**

**परिशिष्ट - IV- ए ८ (६) ची तरतूद**
**स्थावर मालमत्ता विक्री साठी विक्री सूचना.**
**पुनर्लिलाव**

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्टक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ऍक्ट २००२ तरतुदी या सिक्युरिटी इंटरेस्ट (इनफोर्समेन्ट) नियमावली २००२ च्या नियम ८ (६) नुसार अंतर्गत या सह वाचण्यात याव्यात. अचल मालमत्तेच्या विक्री साठी जाहीर लिलाव सूचना.**

सामान्य जनता आणि विशेषत कर्जदार/जामीनदार/गहाणकार यांना याद्वारे सूचित करण्यात येते खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता ही बँकेकडे तारण ठेवली असून त्यावर सिक्यूअर क्रेडिटर्स यांचा बोजा आहे. ज्याचा प्रत्यक्ष ताबा अवसायक दि लक्ष्मी को ऑप बँक लि सोलापूर (अवसायनात) प्राधिकृत आधिकारी यांना घेतला असून या तारण मालमत्तेची विक्री दिनांक ०४/०७/२०२५ रोजी सदर मालमत्ता जशी आहे तशी जी जेथे आहे तेथे जशी आहे तशी या तत्वावर कर्जदार/जमीनदार/गहाणकार श्री. गुर्रम प्रॉपर्टीज याचे भागीदार १. श्री. गुर्रम सिद्धार्थ सुदर्शन २. श्री. गुर्रम विनोद सुदर्शन यांच्या कडून रुपये **२७,९८,१५४/-(अक्षरी रुपये सत्तावीस लाख अठ्ठ्याण्णव हजार एकशे चौपन्न फक्त )** ०४/०६/२०२५ पुढील व्याज, खर्च, इतर शुल्क आणि खर्चासह या रकमेचे वसुलीसाठी अवसायक दि लक्ष्मी को ऑप बँक लि सोलापूर (अवसायनात) सिक्युअर क्रेडिटर्स यांनी जाहीर लिलावाने विक्री करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी राखीव किंमत व बयाणा रक्कम पुढीलप्रमाणे

**मालमत्तेचे विशिष्ट तपशील विक्री हेतु वर्णन केलेल्या संपत्तीची विशिष्ट माहिती खालील प्रमाणे देणेत येत आहे.**

जिल्हा व उपजिल्हा सोलापूर तालुका तालुका उत्तर सोलापूर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील न्यू पाच्छा पेठ येथील टी.पी स्कीम न १ सिटी सर्व्हे नंबर १०३८१ फायनल प्लॉट नं १६-१७ सब प्लॉट नं १३ यासी क्षेत्रफळ १८५.०६ चौ. मीटर वर बांधण्यात आलेल्या

| मजला | फ्लॅट | क्षेत्रफळ चौ. मी. | राखीव किंमत |
|---|---|---|---|
| दुसरा मजला | २०१ | १२४.६२ | ४३,६१,७००/- |

चतुःसिमा
१) पूर्वेस - रस्ता    २) पश्चिमेस - मार्कंडेय शाळा व एमएससीबी ऑफिस
३) दक्षिणेस - रस्ता    ४) उत्तरेस - कुंभार यांची मिळकत

| | |
|---|---|
| डिमांड नोटिस दिनांक | २४/०९/२०१८ |
| प्रत्यक्ष ताबा दिनांक | २३/०३/२०२३ |
| कर्ज खाते नंबर | ००८००१०१२००००००७ |
| लिलावाच्या ठिकाणचे दिनांक व वेळ | अवसायक दि लक्ष्मी को ऑप बँक लि सोलापूर (अवसायनात) प्रधान कार्यालय सोलापूर<br>०४/०७/२०२५ वेळ दुपारी १.०० |

चा ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया पार पाडली जाईल त्यानंतर सदर मालमत्तेचे मूल्यांकन करून जाहीर लिलावाने विक्री करण्यात येईल, होणाऱ्या सर्व परिणामास संबधित कर्जदार व त्याचे जामीनदार व्यक्तिशः जबाबदार राहतील यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. उक्त निर्दिष्ट स्थावर मालमत्तेची प्रतीकात्मक ताबा नोटीस माझे सही व कार्यालयिन मुद्रेसह दिली असे.

**सही/-**
**दिनांकः ०४/०६/२०२५**    **प्राधिकृत अधिकारी**
**स्थळ : सोलापूर**    **अवसायक दि लक्ष्मी को ऑपरेटिव्ह बँक लि, सोलापूर (अवसायनात)**

## कमला को-ऑप. बँक लिमिटेड, सोलापूर

## कमला को-ऑप. बँक लिमिटेड, सोलापूर.

१४/३०, रविवार पेठ, गांधी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर ४१३००६.

**२६ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस व सभासद प्रशिक्षण कार्यक्रम (फक्त सभासदांसाठी)**

कमला कमला को-ऑप, बँक लि., सोलापूर या बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व सभासद प्रशिक्षण कार्यक्रम गुरूवार दि. १९ जून २०२५ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता बँकेच्या सभागृहात खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे, ही नम्र विनंती...

**सभेपुढील विषय**

१) मागील दिनांक १५/०६/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२४-२५ सालाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.
३) मा. संचालक मंडळाचे शिफारसीनुसार सन २०२४-२५ च्या नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०२४-२५ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची वाचून माहिती घेणे व सन २०२३-२४ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची दोष दुरूस्ती माहितीसाठी.
५) सन २०२४-२५ च्या अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे तसेच मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२५-२६ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
६) सन २०२५-२६ सालाकरीता वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मेहनताना ठरविणे.
७) सन २०२५-२६ सालाकरीता अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
८) सन २०२५-२६ सालाकरीता बाहेरील कर्ज मर्यादा ठरविणे.
९) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१०) मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने येणारे आयत्या वेळेचे विषयांवर विचार करणे.

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - ०१/०६/२०२५**

**मा. संचालक मंडळाचे आदेशावरून**
**जे.जी. कल्याणशेट्टी**
**व्यवस्थापक**

**✻ विशेष सूचना ✻**

१) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेच्या अर्ध्यातासानंतर घेतली जाईल. त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.
२) बँकेचा सन २०२४-२५ सालाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक बँकेच्या नोटीस बोर्डावर लावलेला आहे. कृपया, याची नोंद घ्यावी.
३) सन २०२४-२५ अखेरच्या ताळेबंद व नफातोटा पत्रकाची काही माहिती, स्पष्टीकरण विचारावयाचे असल्यास दि. १५-०६-२०२५ पर्यंत बँकेचे कार्यालयात, बँकेचे वेळेत व्यवस्थापकाकडे लेखी कळवावे. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा सदरहु सभेत विचार केला जाणार नाही.
४) ज्या सभासदांनी अद्यापही शेअर्स सर्टिफिकेट नेले नाहीत व वारस नोंद केलेली नाही त्यांनी त्वरीत बँकेशी संपर्क साधावा.
५) केंद्र शासनाच्या सुचनेनुसार पर्यावरण संरक्षण म्हणून बँकेचा अहवाल, नोटीस वगैरे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठविणेसाठी सर्व सभासदांनी आपला ई-मेल आयडी बँकेकडे कळवावा.
६) प्रतिवर्षी लाभांश त्वरीत मिळणेसाठी कृपया सभासदांनी आपले बचत खाते उघडून सहकार्य करावे.
७) ज्या सभासदांचा पत्ता बदल झाला असेल त्यांनी नवीन पत्ता, मोबाईल नंबर बँकेस त्वरीत लेखी कळवावे.
८) मा. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या निर्देशानुसार प्रत्येक खातेदारांने KYC पूर्तता **(ओळखीचा पुरावा, पत्त्याचा पुरावा, स्वतःचा फोटो, आधार कार्ड, पॅन कार्ड व मोबाईल नंबर)** करणे आवश्यक आहे. अन्यथा दि. ३१/१२/२०२५ नंतर खात्यावर व्यवहार करता येणार नाहीत.
९) ज्या सभासदांनी किमान रु. १,०००/- चे शेअर्स धारण केले नाही त्यांनी सदरची पुर्तता त्वरीत करावी. अन्यथा नवीन पोटनियमानुसार त्यांचे सभासदत्व रद्द होईल.
१०) सभासदांनी सभेस येतेवेळी कृपया नोटीस प्रत सोबत आणावी.

**www.kamalabank.com**

## मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना**

**भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत.**

| निविदा सूचना क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजे किंमत | बयाणा पैसा | काम पूर्ण होण्याचा कालावधी | देखभाल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 12-2025-SrDENC | सोपूर येथे OH टँक आणि UG टँकसह व्यापक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, पाण्याच्या पाईप लाईनवरील सांडपाणी प्रवाह प्रणाली | रु. 3,28,76,473.87 | रु. 3,14,400.00 | 12 महिने | 24 महिने |
| www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ. | | | 19/06/2025 दुपारी 3:00 वाजेपर्यंत | | |
| www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ | | | 19/06/2025 रोजी दुपारी 3:30 वाजता | | |

**या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट : www.ireps.gov.ln.**

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर**

SUN 72   अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

## मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना**

**भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत.**

| निविदा सूचना क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजे किंमत | बयाणा पैसा | काम पूर्ण होण्याचा कालावधी | देखभाल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 14-2025-SrDENC | KWV-MRJ विभागात LC क्रमांक 22, 24, 31, 49 आणि 70 येथील रस्ते वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेसाठी गेट लॉज आणि इतर विविध कामांमध्ये सुधारणा. | रु. 1,52,87,572.85 | रु. 2,26,400.00 | 06 महिने | शुन्य |
| www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ. | | | 25/06/2025 दुपारी 3:00 वाजेपर्यंत | | |
| www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ | | | 25/06/2025 रोजी दुपारी 3:30 वाजता | | |

**या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट : www.ireps.gov.ln.**

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर**

SUN 71   अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

## मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना**

**भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत.**

| निविदा सूचना क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजे किंमत | बयाणा पैसा | काम पूर्ण होण्याचा कालावधी | देखभाल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 11-2025-SrDENC | सोलापूर विभागात, सीनियर DEN(C) SUR अधिकारक्षेत्रात DD-KWV TRR(P) - 15.4 किमी, KWV-LUR TRR(P) - 16.4 किमी, DD-KWV-TBR 10.5 किमी, रेल्वेचे कॅन्युअल नूतनीकरण - 6 किमी आणि स्लीपरचे कॅन्युअल नूतनीकरण 7 किमी, CTR(P)-1.605, TRR(P) - 2.579 किमी आणि TRR(S) - 2.95 किमी यार्ड, TWSEJ आणि ग्लुड जॉइंट्ससह SEJ चे नूतनीकरण, ADEN/KWV, PVR आणि LUR विभागात TTR (TWS-WCMS). | रु. 6,96,04,479.58 | रु. 4,98,000.00 | 12 महिने | शुन्य |
| 12-2025-SrDENC | ADEN/LUR उपविभागाअंतर्गत SSE/P.way/LUR अंतर्गत दोन वर्षांच्या कालावधीसाठी विविध P.way काम. | रु. 2,95,63,147.47 | रु. 2,97,800.00 | 24 महिने | शुन्य |
| 13-2025-SrDENC | ADEN/LUR उपविभागांतर्गत SSE/P.way/BTW अंतर्गत दोन वर्षांच्या कालावधीसाठी विविध P.way काम. | रु. 2,96,24,322.05 | रु. 2,98,100.00 | 24 महिने | शुन्य |
| www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ. | | | 23/06/2025 दुपारी 3:00 वाजेपर्यंत | | |
| www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ | | | 23/06/2025 रोजी दुपारी 3:30 वाजता | | |

**या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट : www.ireps.gov.ln.**

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर**

SUN 70   अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

## लोकमंगल को-ऑप बँक लि., सोलापूर

१२८, मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर - ४१३००१
फोन नं. ०२१७-२७३५५०३/ फॅक्स नं.२७३५५६६ ई-मेल : lokmangalbankho@gmail.com

**नमुना झेड**

(नियम १०७ पोटनियम ((११)(ड)-१)-२पहा)

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्याआर्थि खाली सही केलेल्या वसुलीअधिकारी द्वारा लोकमंगल को. ऑप बँक लि., सोलापूर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये खालील नमुद यादीतील ऋणको (थकबाकीदार) यांना थकबाकी मागणी नोटीस खालील नमुद दिनांकास ऋणको यांना देऊन सदरचे नोटीसीमध्ये नमुद रक्कम सदर नोटीस मिळल्याच्या दिनांकापासून ऋणको यांने रक्कम जमा करण्यास कसुर केले आहे. त्याअर्थी खाली सही करणऱ्याने खालील नमुद यादीतील ऋणको यांना खालील नमुद दिनांकास स्थावर मिळकत जप्तीची नोटीस देऊन पुढे निर्दीष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला आणि सर्व नागरीकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करण-याने त्याला महाराष्ट्र सहकरी संस्था निमय १०७ (११) (ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार प्रतिकात्मक (सिम्बॉलिक) ताबा खालील नमुद दिनांकास घेतला आहे, विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरीकांना या व्दारे सावध करण्यात येते की, खाली नमुद केलेल्या यादीतील मालमत्तेसंबधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास लोकमंगल को-ऑप बँक लि. सोलापूर या संस्थेच्या खाली नमुद केलेल्या बोज्याची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यातील इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | वसुली दाखला क्र. दिनांक | मिळकत क्र./ क्षेत्र/आकार/चौ.मी. | थकबाकीदाराचे नाव | मागणी नोटीस आदेश दिनांक | प्रतिकात्मक ताबा घेतलेली तारीख | दिनांक ३१/०४/२०२५ अखेर एकूण येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०१/६४३/ २०२४/२५ दि. ०१/०१/२०२५ | **मौजे. करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर**<br>**१)** गट नं-१४६७/४, क्षेत्र. २.८७.०० हे.आर, आकार ३.७०.<br>**२)** गट नं-१४६७/३, क्षेत्र. १.४३.०० हे.आर, आकार १.८७.<br>**३)** गट नं-१४६७/५, क्षेत्र. २.८७.०० हे.आर, आकार ३.७०.<br>**४)** गट नं-१४६८/१/अ/१, क्षेत्र.१.०२.०० हे.आर, आकार १.२९<br>**५)** गट नं-४०/३/१, क्षेत्र. ४.४३.२० चौ.मि, आकार ०.०.<br>**६)** गट नं-४०/३/२, क्षेत्र ५.४६.००, चौ.मि, आकार ०.०.<br>**७)** गट नं-४०/३/५, क्षेत्र ४.५२.१० चौ.मि, आकार ०.०.<br>**८)** गट नं-४०/३/७, क्षेत्र १.८०.६९ चौ.मि, आकार ०.०.<br>**९)** गट नं-४०/३/९, क्षेत्र १.८०.६९ चौ.मि, आकार ०.०.<br>**१०)** गट नं-४०/३/१०, क्षेत्र १.४७.११. चौ.मि, आकार ०.०.<br>**११)** गट नं-४०/३/११, क्षेत्र १.४७.११ चौ.मि, आकार ०.०<br>**१२)** गट नं-४०/३/१२, क्षेत्र २.७१.६६ चौ.मि, आकार ०.०.<br>**१३)** गट नं-४०/३/१५/ क्षेत्र १.७६.०० चौ.मि, आकार ०.०.<br>**१४)** गट नं-४०/३/१७, क्षेत्र १.३७.७८ चौ.मि. आकार ०.०.<br>**१५)** गट नं-४०/३/२१, क्षेत्र १.०८.०० चौ.मि, आकार ०.०.<br>**१६)** गट नं-४०/३/२२, क्षेत्र १.०८.००. चौ.मि. आकार ०.०.<br>**१७)** गट नं-४०/३/२३, क्षेत्र १.०८.०० चौ.मि, आकार ०.०.<br>**१८)** गट नं-४०/३/२४, क्षेत्र १.०८.०० चौ.मि. आकार ०.०.<br>**१९)** गट नं-४०/३/२५, क्षेत्र १.०८.००. चौ.मि, आकार ०.०.<br>**२०)** गट नं-४०/३/२६, क्षेत्र १.०८.००. चौ.मि, आकार ०.०<br>**२१)** गट नं-४०/३/२७, क्षेत्र १.०८.०० चौ.मि. आकार ०.०<br>**२२)** गट नं-४०/३/२८, क्षेत्र १.०८.०० चौ.मि. आकार ०.०.<br>**२३)** गट नं-४०/३/३०, क्षेत्र १४.५२.२१ चौ.मि आकार ०.०. | बाळासाहेब हरीचंद्र शिंगटे | ०७/०२/२०२५ | २६/०५/२०२५ | रु. ७४,६८,६००/- अधिक व्याज |
| २ | १०१/७१६/ २०२१/२२ दि. २०/०५/२०२२ | **मौजे. करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर.**<br>**१)** गट नं-४०/३/अ/४९ क्षेत्र ७.७५.४४ आर चौ.मी. आकर ००<br>**२)** गट नं -७२/२, क्षेत्र १.७९.००, आकर ३.३३<br>**३)** गट नं - ७२/४, क्षेत्र २.८५.०० आकर ५.२५ | राहुल पांडुरंग शिंगटे | ०५/०६/२०२२ | २६/०५/२०२५ | रु. २५,८१,२८०/- अधिक व्याज |
| | | **मौजे. करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर**<br>गट नं-२२४/२, क्षेत्र. ३.३५.०० हे.आर, आकर ०.०३.०० | तानाजी मारुती जाधव | | | |
| | | **मौजे. वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर**<br>**१)** गट नं-१२, क्षेत्र. ०.१४.०० हे.आर, आकर ०.५०.<br>**२)** गट नं-१७३०, क्षेत्र. ०.०५.०० हे.आर, आकर ०.१० | अनिल लिंबाजी आसबे | | | |
| ३ | १०१/७३८/ २०२१-२२ दि. २०/०५/२०२२ | **मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर**<br>गट नं-१७७६/१/अ/१, क्षेत्र ०.६९.०० हे.आर. आकर ०.६० | दिलीप सिद्राम गंगथडे | ०९/०७/२०२२ | २६/०५/२०२५ | रु. ३,३७,०००/- अधिक व्याज |
| | | **मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर**<br>गट नं-१७७३/१, क्षेत्र १.१३.००. हे आर, आकर १.१५ | धनाजी तुकाराम घायाळ | | | |
| | | **मौजे. गुरसाळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर**<br>गट नं-१५१/१/ब/२/ड, क्षेत्र ०.६७.००. हे आर, टाकर. १.३५. | प्रशांत परमेश्वर चव्हाण | | | |

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : २८/०५/२०२५**

मोहर

सही/- वसुली अधिकारी
**लोकमंगल को-ऑप बँक लि., सोलापूर**
(म.सह.संस्था अधिनियम १९६० कलम १५६ अन्वये अधिकार प्रदानित)
द्वारा लोकमंगल को.ऑप. बँक लि., सोलापूर

# पर्यावरण दिन विशेष

## अहिल्यादेवी आणि पर्यावरण



**पर्यावरण रक्षण ही आज काळाची गरज बनली आहे.जागतिक स्तरावर असणारे हे एक आव्हान असून अनेक देश त्यासाठी मोठे जनजागृतीचे कार्य करीत आहेत. मानवी अस्तित्वाशी थेट संबंध असणाऱ्या पर्यावरण रक्षणासाठी अहिल्यादेवी होळकर यांनी त्याकाळी दिलेले योगदान पाहून त्यांच्या विषयीचा आदर दुणावतो. पर्यावरणाचे महत्त्व त्यांनी त्याकाळी ओळखले होते यात तिळमात्र शंका नाही.**

पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर या मराठा साम्राज्यातील एक आदर्श प्रशासक आणि जनकल्याणकारी राजमाता म्हणून प्रसिद्ध आहेत. यावर्षी त्यांचे त्रीशताब्दी जयंती वर्ष सर्वत्र साजरे केले जात आहे. त्यांचे जीवन समाजसेवेसाठीच्या आदर्शाचा वस्तुपाठ मानले जाते. संपूर्ण भारतीयांसाठी त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक योगदान मोठे आहे. त्यासोबतच पर्यावरण संवर्धन, जलव्यवस्थापन आणि निसर्गाशी सुसंवाद राखण्यामध्येही त्यांचे योगदान महत्त्वाचे होते. अहिल्यादेवींनी इस. १७६७ ते १७९५ या कालावधीत होळकर राज्याचा कारभार हाती घेतला आणि लोककल्याणासाठी अनेक उल्लेखनीय कार्य केले. अहिल्यादेवी होळकर यांच्या काळात पर्यावरण शब्द हा आधुनिक अर्थाने प्रचलित नव्हता, तरीही त्याच्या धोरणांमधून अप्रत्यक्षपणे पर्यावरण व वनसंवर्धनास चालना मिळाल्याचे दिसते. त्यांच्या कार्यातून निसर्ग व संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन याला महत्त्व देण्यात आले होते.अहिल्यादेवी होळकर यांनी अनेक धार्मिक स्थळांच्या पुनर्बांधणीसोबतच त्या परिसरात वृक्षारोपण केले. मंदिरांच्या आवारात फळझाडे, वड, पिंपळ आणि औषधी वनस्पती लावल्या. जे पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी उपयुक्त होते.अहिल्यादेवींनी शेतकऱ्यांस मदत करून शेतीस चालना दिली व न्यायपूर्ण प्रशासन ठेवून प्रजेचे कल्याण साधले. ज्या काळात स्त्रियांवर अनेक बंधने होती, शिक्षणाची काही सोय नव्हती, सतीसारख्या कुप्रथा होत्या, राजकारणात युद्ध, लूट, कटकारस्थाने चालत, त्या काळात अहिल्यादेवींना राज्यकारभार करण्याची संधी मिळाली आणि स्वकर्तृत्वाने त्यांनी त्या संधीचे सोने केले. धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले व हे करत असताना पर्यावरण संवर्धनाची कामे केली.

### सामाजिक बांधणीसाठी वने जपली

अहिल्यादेवी होळकर यांनी वने ही समाजाच्या जीवनशैलीचा भाग मानली. लोकांना वनसंपत्तीचा वापर शाश्वत पद्धतीने करण्याचा सल्ला दिला. जलस्रोतांचे रक्षण करण्यासाठी नद्यांच्या आणि तलावांच्या परिसरातील झाडे तोडण्यावर अप्रत्यक्षपणे निर्बंध आणले. जलसंवर्धनासाठी वनाच्छादन टिकवणे आवश्यक आहे, हे त्यांच्या धोरणांतून दिसते.

### प्रवास मार्गावर झाडे लावणे

त्यांनी यात्रेकरूंना सावली व विश्रांती मिळावी म्हणून प्रवासमार्गावर झाडे लावली धर्मशाळा बांधल्या कामगार कारागिरांना काम मिळावे यासाठी रस्ते बांधले, रस्त्याच्या दुतर्फा ओसाड जमिनी, डोंगर या ठिकाणी त्यांनी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली व त्यांची निगा राखण्याचे आदेश दिले.

### शेतीसाठी जैवविविधतेला चालना

अहिल्यादेवींनी शेतीतही जैवविविधतेला महत्व दिले. शेतकऱ्यांना झाडे लावण्याचे व ती जपण्याचे मार्गदर्शन केले. प्रत्येक शेतकऱ्याने २० झाडे लावावीत असा हुकूम दिला. त्यातील ११ झाडे सरकारची तर ९ झाडे शेतकऱ्यांची होती. विनापरवाना झाडे तोडणाऱ्यांस मोठी शिक्षा केली जात होती. त्यांच्या या कार्यामुळे शेतीत, बांधावर झाडांची लागवड वाढली, जमिनीची धूप थांबवली गेली आणि पर्यावरणीय नुकसान कमी झाले. त्यांच्या या कार्यामुळे पर्यावरणीय दृष्टिकोनातून मोठा फायदा झाला.

### नद्यांचे संरक्षण आणि स्वच्छता

अहिल्यादेवींच्या काळात नद्यांना पवित्र मानले जाई, परंतु त्यांनी नद्याचे पाणी केवळ धार्मिक कार्यासाठी नव्हे, तर पिण्यासाठी आणि शेतीसाठीही टिकवून ठेवले. पाणी प्रदूषण रोखण्यासाठी घाटांचे व्यवस्थित व्यवस्थापन करण्यात आले. काशीमधील अहिल्याबाई घाट आणि उज्जैनमधील क्षीप्रा घाट त्यांच्या दूरदृष्टीची उत्तम उदाहरणे आहेत. अहिल्यादेवी होळकर यांचे पर्यावरणीय योगदान हे त्यांच्या दूरदृष्टी आणि शाश्वत विचारांचे प्रतीक आहे. त्यांनी जलव्यवस्थापन, वनसंवर्धन, शाश्वत शेती आणि निसर्गपूरक स्थापत्यशास्त्राद्वारे पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्यातून आधुनिक काळातील पर्यावरण संरक्षण आणि शास्वत विकासाला प्रेरणा मिळते. त्यांनी बांधलेले व आजही उत्तम स्थितीत असलेले अनेक घाट, बारव, कुंड हे त्यांच्या कार्याचे स्मरण करून देतात. त्यांच्या दृष्टेपणाचे हे द्योतक आहेत. त्यांच्या या योगदानामुळे त्या निसर्गाप्रति संवेदनशील नेत्या होत्या हे स्पष्ट होते. ''ज्ञात-अज्ञात अहिल्यादेवी होळकर'' या ग्रंथाच्या लेखिका विनया सडपेकर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सुंदर वर्णन केले आहे. त्या म्हणतात, ती सत्ताधारी होती. पण ती सिंहासनावर नव्हती. ती राजकारणी होती. पण ती सत्तेच्या चढाओढीत नव्हती. ती पेशव्यांशी निष्ठावंत होती. पण ती त्यांच्यापुढे नतमस्तक नव्हती. ती व्रतस्थ होती. पण ती संन्यासिनी नव्हती. जेव्हा लढाई हे जीवन होते आणि लूट हा जेत्यांचा धर्म होता, हुकमत हा सत्तेचा स्वभाव होता तेव्हा - तिच्या कल्याणी प्रतिभेचे किरण नदीवरच्या घाटांमधून उमटले तिच्या जीवनदायिनी प्रेरणेने तळी, अन्नछत्रे, धर्मशाळांचे रूप घेतले. तिच्या अनाक्रमक धर्मशीलतेचे मंगल प्रतिध्वनी भरतखंडाच्या मंदिरामंदिरांतून घुमले. मात्र ती सर्वगुणसंपन्न देवता नव्हती, तिला माणूसपणाच्या सगळ्या मर्यादा होत्या.अठराव्या शतकातल्या मराठ्यांच्या इतिहासाच्या पटावर ती शुक्राच्या चांदणीसारखी लुकलुकली. अहिल्यादेवी होळकर यांच्या स्थापत्यकलेमध्ये पर्यावरणाशी सुसंवाद साधल्याचे दिसून येते. त्यांनी मंदिर, घाट आणि बारव बांधताना स्थानिक व नैसर्गिक साधनांचा समतोल राखून वापर केला. जलस्रोतांच्या संरक्षणासाठी संरचनांमध्ये पाणी गाळून पुनर्वापर करता येईल अश्या यंत्रणा वापरल्या गेल्या. त्यांच्या धोरणातून आधुनिक काळातील वनसंवर्धनाच्या कार्याला प्रेरणा मिळते.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवींना विनम्र अभिवादन...!**

### अहिल्यादेवी होळकर यांचे पर्यावरण संवर्धनातील योगदान

घाट आणि बारव बांधणी (कुंड आणि पाणवठे) पाण्याचे महत्व ओळखून अहिल्याबाईंनी पाण्याबाबत आपले धोरण आखले होते. अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक नद्यांच्या काठावर घाट आणि पाण्याच्या बारव बांधून जलव्यवस्थापनाला चालना दिली. पाण्याच्या सोयीकरता त्यांनी अनेक ठिकाणी विहिरी, तळी, बारव, कुंड, नद्यांवर बंधारे बांधले. ही कामे त्यांनी भारतभर अनेक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी देखील केली. त्यांचे घाट आणि बारव बांधण्याचे काम केवळ पूजाअर्चेसाठी नव्हते, तर त्या समाजातील लोकांसाठी जलस्रोत टिकवण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरले. काशीमध्ये गंगा नदीच्या काठावर अहिल्यादेवी होळकरांनी घाट बांधले. या घाटाचा उपयोग धार्मिक विधींसाठी तसेच स्नानासाठी होत असे. तसेच गोदावरी नदीच्या काठावर त्यांनी घाट बांधले. महाकालेश्वर मंदिराच्या परिसरात क्षिप्रा नदीवरील घाट सुशोभित केला. इंदूरमध्ये त्यांनी पाण्याच्या काही कुंडांची निर्मिती केली, अहिल्यादेवी होळकर यांनी काशीतील विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार केला तसेच गंगा, गोदावरी आणि नर्मदा नद्यांच्या काठावर धार्मिक स्थळे बांधताना त्यांनी वृक्षाच्छादनाला महत्त्व दिले.

- डॉ. राजेश मणेरीकर ७५८८०६५२०५
- चंद्रकला शिंदे - ८९५६३३२९३३
(लेखक डॉ. मणेरीकर पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशनचे सीईओ आहेत)

---

## सोलापूर ते सोलारपूर
### स्वच्छ ऊर्जेची नवी दिशा

पाच जून हा जागतिक पर्यावरण दिन, हा दिवस केवळ प्रतिज्ञांचा नाही, तर कृतीचा आहे. आज पृथ्वीवर हवामान बदल, प्रदूषण आणि नैसर्गिक संसाधनांची कमी ही मोठी आव्हाने बनली आहेत. या संकटांना उत्तर म्हणून सौरऊर्जा हे एक प्रभावी आणि पर्यावरणपूरक पर्याय म्हणून पुढे येत आहे.

### पीएम सुर्याघर योजना आणि सोलापूरचं महत्त्वाचं लक्ष्य

भारत सरकारच्या प्रधानमंत्री सूर्य घरः मुफ्त बिजली योजना अंतर्गत २०२७ पर्यंत १ कोटी घरांमध्ये सौर पॅनल बसवण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. या योजनेअंतर्गत **MSEDCL** सोलापूर विभागाने १.२० लाख घरांमध्ये सौरऊर्जा प्रणाली बसवण्याचं लक्ष ठेवले आहे. आतपर्यंत केवळ ५००० घरांवर सौर उर्जा प्रकल्प उभारण्यात आले आहेत.

तीन किलोवॅट क्षमतेसाठी ७८,००० पर्यंत अनुदान उपलब्ध. आय स्मार्ट पोर्टलद्वारे सोपी अर्ज प्रक्रिया : www.mahadiscom.in/ismart

● **Elgris Solar** : सोलापूरची स्थानिक ऊर्जा क्रांती
सोलापूरमधील **Elgris Solar Power Systems Pvt. Ltd.** ही कंपनी स्थानीयतेचा आणि विश्वासाचा पर्याय बनली आहे. एश्रसीळी डेश्ररी ने आतापर्यंत हजारों यशस्वी प्रकल्प पूर्ण केले असून, ते सौरऊर्जेच्या प्रसारासाठी सातत्याने कार्यरत आहेत.

### या पर्यावरण दिनी घ्या संकल्प

''घराच्या छतावर सोलर पॅनल, आणि आपल्या भविष्याला ऊर्जा!'' '' **Elgris Solar** आणि **MSEDCL** च्या मार्गदर्शनाने सोलापूर करूया पर्यावरणस्नेही आणि ऊर्जासंपन्न!''

हवामान बदल आणि पर्यावरण रक्षणासाठी सौर उर्जा हा एकमेव शाश्वत पर्याय मे महिन्याच्या मुसळधार पाऊसाने हवामान बदलाची गंभीर जाणीव करून दिली आहे. हवामान बदलाची ही केवळ सुरुवात आहे...! हवामान बदलाचं वास्तव दरवर्षी अधिक भयावह होतंय... वेळेत जागे व्हा पर्यावरण वाचवा, सौर ऊर्जा स्वीकारा! तुमचा आजचा निर्णय, पूढील पिढीला वाचवेल....! **Elgris Solar** सोबत पर्यावरण पूरक निर्णय घ्या.





**- संपतकुमार धूत, सौर ऊर्जा तज्ञ**

**अधिक माहिती साठी संपर्क**
**Elgris Solar Power Systems Pvt. Ltd.**
**www.elgrissolar.coा**
०२० ७१५३ ००२७
आय स्मार्ट पोर्टल (सरकारी अर्ज):
**https://www.mahadiscom.in/ismart**

---

## झाडाचे संगोपन गरजेचे...

**जागतिक पर्यावरण औचित्य साधून सर्वजण वृक्षारोपण करून निसर्ग सेवा करण्याचा प्रयत्न करतात. आज-काल पावसाळा सुरू झाला की, भरमसाट रोपे लावली जातात. पण त्यानंतर त्या रोपाकडे पहायला देखील कोणी नसते, व त्याचे दुरावस्था होते. ती वाळून जातात म्हणून जी रोपे लावली जातात त्याचे काळजी घेणे, संगोपन, करण्याची गरज आहे.**

### वृक्षारोपण करण्यापूर्वी खालील नियमावली लक्षात ठेवा

- चार फुटाच्या पुढील रोपे लावण्याचा प्रयत्न करा. ती जमिनीत सहजपणे रुसतात. पाण्याचीही कमी गरज भासते.
- रोपे खाली जाऊ नयेत म्हणून वृक्षारोपण केल्यावर त्याच्या संरक्षणासाठी काही दिवसासाठी ट्री- गाई काटेरी कुंपणाची व्यवस्था करा.
- वड, पिंपळ, उंबर, अशी मोठी डेरेदार वाढणारी झाडी एकमेकांना लागून लावू नका.
- सर्वात महत्त्वाचे म्हणजे रोपे तेवढीच लावा, जेवढी आपण लावून शकतो.
- पावसाळ्यात उत्सवाच्या भरात जागा दिसेल, तिथे वृक्षारोपण करू नका, ज्या ठिकाणी नियमित पाणी देणे, देखरेख करणे शक्य आहे अशा ठिकाणी वृक्षारोपण करा



दिवसेंदिवस तापमान वाढत होत आहे. त्याच्यासाठी लावलेल्या झाडाची जोपासना सर्वांनी करणे महत्त्वाचे आहे. रस्त्यावरच्या कडेला लावलेले झाड अमूल्य ऑक्सिजनसह सावली देण्यासाठी आहेत त्याचा प्रयोग शहरातल्या व ग्रामीण व्यवसायिकांनी जाहिरात लावण्यासाठी करू नये. आगामी काळात झाडांचे खिळे मुक्त करण्याचे मोहीम निसर्गप्रेमींच्या वतीने हाती घेण्यात येणार आहे. खिळे. पोस्टर, विद्युत रोषणाई, केबल, आदीमुळे वृक्षांना इजा होते. त्या ठिकाणी झाडाचे खोड कुजून ते मोडून पडण्याची अथवा मृत होण्याची शक्यता असते..

### वृक्षांची काळजी अशी घ्या

वीज वाहिन्या आणि टेलिफोन वाहिन्या याच्या खाली मोठे वाढणारे रोपे लावू नका, तीच झाडे मोठी झाल्यावर वीजवाहिन्यांना स्पर्श करूनन अर्थ शॉर्टसर्किटमुळे मोठा वीज अपघात करू शकतात अशा ठिकाणी कमी उंचीचे मध्यय आकाराची रोपे लावा. ड्रेनेज लाईन, पिण्याच्या पाइपलाईन आणि गटारी जवळ कोणत्याही रोपे लावू नका, कारण रोपे मोठी झाल्यावर त्याची मुळे पाण्याच्या पाइपलाइन आणि ड्रेनेज पाइपलाइन मध्ये घुसू शकतात. शाळेच्या कार्यालयाच्या, इमारतीच्या, आवारात रोपे लावताना ती कटे काटकोट भिंतीला, कंपाउंड ला लागून लावू नका मध्ये वाढणारे झाडे, भिंत कंपाउंड पासून थोडे अंतर ठेवून लावा. वृक्षावरील खिळे, जाहिरातीचे पोस्टर, काढून वृक्षांना मोकळा श्वास मिळावा, यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**- दीपक करकी, निसर्ग प्रेमी**

---

## प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन आणि मानवी जबाबदाऱ्या

**दरवर्षी ५ जून हा दिवस संपूर्ण जगभरात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे पर्यावरणाच्या संरक्षणाविषयी जनजागृती वाढवणे आणि कृतीशील होणे. १९७२ साली संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकाराने या दिनाची सुरुवात झाली आणि आजच्या घडीला या दिनाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. कारण मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचा समतोल झपाट्याने बिघडत आहे.**

आपल्याभोवती असलेली हवा, पाणी, माती, वनस्पती, प्राणी आणि माणसे - हे सर्व घटक एकमेकांशी निगडित असून त्यांच्या दरम्यान एक नाजूक समतोल असतो. या घटकांपैकी कुठल्याही घटकावर विपरीत परिणाम झाला, तर संपूर्ण पर्यावरणीय व्यवस्था कोसळते. जंगलतोड, वायू व जलप्रदूषण, तापमानवाढ, हवामानातील बदल, जैवविविधतेची हानी यांसारख्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालल्या आहेत. त्यामुळे नैसर्गिक आपत्ती - पूर, दुष्काळ, अधिक उष्णता, चक्रीवादळे - अधिक तीव्र होत आहेत.

दरवर्षी जागतिक पर्यावरण दिन वेगवेगळ्या संकल्पनांच्या (थीम्स) आधारे साजरा केला जातो. यामध्ये १५० हून अधिक देश सहभागी होतात आणि वर्षभर विविध उपक्रम राबवले जातात. २०२५ या वर्षाकरिता ''प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन'' ही थीम ठेवण्यात आली आहे, जी सध्याच्या पर्यावरणीय स्थितीत अत्यंत महत्त्वाची ठरते.

### प्लास्टिक प्रदूषण - एक गंभीर धोका

प्लास्टिक हे कृत्रिम रसायनांपासून बनवलेले असून ते नैसर्गिकरित्या विघटित होत नाही. प्लास्टिकचा नाश होण्यासाठी २० ते १००० वर्षांपर्यंत वेळ लागू शकतो. काही प्रकारचे प्लास्टिक, विशेषतः पिशव्या, हजारो वर्षे पर्यावरणात तस्सेच राहू शकतात. जैवविघटनशील **(biodegradable)** प्लास्टिक तुलनेने लवकर विघटित होते, परंतु त्याचा वापर अजूनही मर्यादित आहे.

प्लास्टिकचा पुनर्वापर अत्यंत कमी प्रमाणात केला जातो. त्यामुळे हे कचऱ्याच्या स्वरूपात नद्या, समुद्र, शेती, रस्ते आणि जंगलांत मोठ्या प्रमाणावर साचते. अनेक जलीय आणि स्थलीय जीव प्लास्टिकला अन्न समजून खातात आणि त्यामुळे त्यांचा मृत्यू होतो. अन्न व पाण्यात मिसळलेले सूक्ष्म प्लास्टिक **(microplastics)** मानवी आरोग्यासाठीही अत्यंत घातक आहेत.

| मानवी जबाबदाऱ्या | |
|---|---|
| **प्लास्टिक प्रदूषणावर मात करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने स्वतःहून पुढाकार घेणे अत्यावश्यक आहे. खालील उपाययोजनांद्वारे आपण सकारात्मक बदल घडवू शकतो** | |
| १. | वापर कमी करा (ठशर्वीलश): प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, स्ट्रॉ, चमचे, कप यांऐवजी कापड, कागद, स्टील यांचे पर्याय वापरा. |
| २. | पुनर्वापर करा (ठर्शीश): प्लास्टिकच्या वस्तू शक्यतो पुन्हा पुन्हा वापरण्याचा प्रयत्न करा. |
| ३. | पुनर्प्रक्रिया करा **(Recycle):** प्लास्टिक कचरा योग्य प्रकारे वर्गीकृत करून स्थानिक प्रशासनाकडे सुपूर्द करा. |
| ४. | संविधानिक जबाबदारी: भारतीय संविधानाच्या कलम ५१-ए(स) नुसार पर्यावरण रक्षण हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. |
| ५. | शिक्षण व जनजागृती: शाळा, महाविद्यालये, समाज यामध्ये प्लास्टिकच्या दुष्परिणामांबाबत उपक्रम राबवा. |
| ६. | सामूहिक सहभाग: स्थानिक संस्था, स्वयंसेवी गट, सरकार यांच्यासोबत मिळून स्वच्छता, वृक्षारोपण, कचरा व्यवस्थापन यामध्ये सहभाग घ्या. |
| ७. | शासनाचे उपाय आणि आपली भूमिका: शासनाकडून सिंगल-यूज प्लास्टिकवर बंदी, प्रभावी कचरा व्यवस्थापन, पर्यावरण शिक्षण सक्ती, पुनर्वापर उद्योगांना प्रोत्साहन यांसारख्या उपाययोजना राबवल्या जात आहेत. मात्र, या धोरणांची यशस्वी अंमलबजावणी नागरिकांच्या सक्रिय सहभागाशिवाय शक्य नाही. |

प्लास्टिक प्रदूषणाचे परिणाम: प्लास्टिक नैसर्गिकरित्या विघटित होत नाही, त्यामुळे जमिनीत साचून राहते आणि शेतीसाठी उपयोगी असलेल्या मातीचे पोषण कमी करते. नद्या, सरोवरे आणि समुद्रांमध्ये प्लास्टिकचा कचरा मोठ्या प्रमाणावर साचतो. यामुळे जलीय जीवांचा मृत्यू होतो. प्राण्यांनी प्लास्टिक गिळल्यास त्यांचा जीव जातो. अनेक पक्ष्यांच्या प्राणी पोटात प्लास्टिक भरून राहते, जे त्यांना उपासमारीकडे नेतं. प्लास्टिकद्वारे निर्माण होणाऱ्या सूक्ष्मकणांमुळे **(Microplastics)** माणसांमध्ये हॉर्मोनल बदल, कर्करोग, अपचन, आणि इतर आजार वाढण्याची शक्यता असते. प्लास्टिकचे उत्पादन व विल्हेवाट लावताना कार्बन डायऑक्साईडसारख्या प्रदूषक वायूंचे उत्सर्जन होते,

जे हवामान बदलाला **(Climate Change)** गती देते. शास्त्रीय पाहणीनुसार असेही लक्षात आले आहे की माणसाच्या रक्तात सुद्धा प्लास्टिकचे कण आढळून आलेले आहे. प्लास्टिक जाळल्यामुळे विषारी रसायने व त्याचे सूक्ष्म कण हवेत पसरून हवेचे प्रदूषण होते त्याचा प्राणी तसेच माणसांच्या श्वसनक्रियेवर तसेच एकंदरीत आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.




### आपली कृती

जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नसून पर्यावरण रक्षणाच्या वाटचालीस प्रारंभ करणारी एक प्रेरणा आहे. प्रत्येक दिवस हा पर्यावरणासाठी महत्त्वाचा आहे. आपल्या लहानशा कृतीही मोठा बदल घडवू शकतात. चला, आपण सर्वजण मिळून पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारूया. पृथ्वीच्या रक्षणासाठी एकत्र येऊया. आजपासूनच बदल घडवूया - आपल्या उज्ज्वल भविष्याकरता.

**- प्रा. डॉ. उमेश बी. काकडे**
मो. ९८६९३५३४५५
(लेखक उच्च शिक्षण सोलापूर विभागाचे सहसंचालक आहेत)

---

## निसर्गप्रेमी

हिरव्या बहारदार वृक्ष वैली पाहूनी।
प्रसन्न उत्साह यैई मनी।।

रंगीबैरंगी सुगंधित फुलांचे ताटवे
दिसावे नयनी।
हलकैच गारवा लाघवी
सरै तनामनातूनी।।

गर्द रानी डौंगरमाथ्यावरूनी
झरा थबकै जलवर्षाचा।
कौवळ्या ऊनी डौलै हिरव्या
वैलीतयावरी चमकै जलथैंबाचा।।

कैशरी किरण धरती
लैवूनी जसै शौभूनी।।

निसर्गाच्या रंगांची उधळण
हौई स्थिरावी नयनी।
असेच शब्दसुमने सुचली पर्यावरणदिनी।।

**- गौरी पंढरपूरकर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...




### साध्या पध्दतीने साखरपुड्यातच उरकले लग्न; खर्चाला फाटा देत ठेवला आदर्श

**श्रीपूर, दि.४ जून-**

बोरगांव सेक्शन ९ येथील पत्रकार सुखदेव साठे यांचा मुलगा प्रतिक व अनगर (ता. मोहोळ) येथील पोपट सौदागर मोरे यांची मुलगी कादंबरी यांचा विवाह अत्यंत साध्या पध्दतीने साखरपुड्यातच उरकला. त्यामुळे अनावश्यक खर्चाला फाटा मिळून सर्वांसमोर आदर्श ठेवला गेला आहे. अनगर येथे शुकवार २ जून रोजी साखरपुडा करणेचे ठरले त्या प्रमाणे सुखदेव साठे आपल्या आप्त स्वकिय व श्रीपूर मधील पत्रकार मित्र असलेले महादेव जाधव, संदीप लोणकर, दत्ता नाईकनवरे, राजू मुलाणी, बी. टी. शिवशरण, विजयकुमार देशमुख यांना घेवून अनगर येथे पोहोचले. पाहुण्यांशी पत्रकारांची ओळख करून देण्यात आली त्यानंतर औपचारिक गप्पा मारतानाच लग्न कधी घ्यायचे कोठे घ्यायचे अशी चर्चा चालु झाली. त्यावेळी बरेच पाहुणे आलेले आहेत दिवसही चांगला आहे कशाला खर्चात पडता साखरपुड्यातच लग्न उरकून टाकू असा सल्ला काहींनी दिला. परंतू हा सल्ला लगेच पचनी पडणारा नव्हता. कारण लग्न संबंधाने तयारी नव्हते. परंतू दोन्ही बाजूने यावर खल चालू असताना हळूहळू विचार पटत चालला होता. यात भर पडली श्रीपूर येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर, प्रोडक्शन मॅनेंजर एम. आर. कुलकर्णी व कम्प्युटर इंचार्ज तानाजी भोसले यांचे करवी धाडलेला सांगावा की साठेला म्हणावं सध्याचे दिवस कठीण आहेत. जास्त खर्चाच्या भानगडीत न पडता लग्नच उरकून घे यामुळे झटक्यात नूरच बदलला व लग्न लावण्याची धावपळ चालू झाली. लगेचच मुली कडील मंडळींनी वाजंत्री, हार, फुले, मंगळसूत्राची व्यवस्था केली. दुपारी १ वा. होणारा साखरपुडा गोरज मुहुर्तावर पार पाडत लगेचच लग्न लावण्यात आले. लग्न सोहळा अत्यंत साध्या पद्धतीने परंतू सर्व रितीरिवाज पाळत पार पडल्याने दोन्ही कडील वऱ्हाडी जाम खुश झाली. काळाची गरज ओळखत हे विधी पार पडणे महत्वाचे झाले आहे.



### खवणीत बाळूमामाच्या पालखीचा मुक्काम; ओव्यांमधून घुमला भक्तीचा जागर

**सोलापूर, दि.४ जून-**

मोहोळ तालुक्यातील खवणी येथे श्री संत बाळूमामाच्या १७ नंबर पालखीचे रविवारी आगमन झाले. ग्रामस्थांकडून मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. मेंढरं स्थळावर पहाटे पाच वाजेच्या दरम्यान उद घालण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर सकाळी आठ दरम्यान आरती, महाप्रसादाचे वाटप, तर रात्री साडेआठच्या दरम्यान आरतीसह ओव्याचा कार्यक्रमानंतर ग्रामस्थांकडून महाप्रसादाचे आयोजन केले होते. महाप्रसाद घेण्यासाठी ग्रामस्थासह परिसरातील भक्तजनांनी मोठी गर्दी केली होती. श्री संत बाळूमामाच्या १७ नंबर पालखीमध्ये मेंढ्यांचे ९ कळप, एक कळपामध्ये ३०० मेंढ्या एकूण संख्या २७०० मेंढ्या आहेत. यासाठी एकूण १५० लोक राखण करतात. ११ नंबर मेंढ्यांच्या कळपामधून १७ नंबर पालखीची निर्मिती सांगोला तालुक्यातील लोटेवाडी येथे झाली होती. या १७ नंबर पालखीचे कारभारी लहू लेंगरे, उपकारभारी राजेंद्र अनुसे, पुजारी बाळू लेंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होतो. खवणी बिरोबा मंदिर येथे बाळूमामा पालखी सोहळ्यानिमित्त नागेश व विकार मंडळ नजीक पिंपरीचे शाहीर दत्ता मळगे यांच्या वतीने ओव्या गायनाचा कार्यक्रम करण्यात आले. १९ पालख्यांमध्ये प्रत्येकी २००० मेंढरं, एका पालखीत १५० भक्तगण पालखीमध्ये बाळूमामा मूर्ती, बाळूमामाचे गुरू मुळे महाराज, विठ्ठल रुक्मिणी मूर्ती, दोन नाग देवतांच्या मूर्ती, घोडा मूर्ती, चांदीच्या पादुका, दोन बकरी, एक कुत्रा मूर्ती, बाळूमामाची काठी बटवा ठेवण्यात आला आहे. मामांची १९ मुख्य प्राण्यांच्या पालख्या आहेत. एका पालखीत दीडशे भक्तजन तर किमान २००० मेंढरं आहेत. वेगवेगळ्या तालुक्यांसह जिल्ह्यांत पालखी सोहळा बाराही महिने फिरतो.

## निधन वृत्त...

### दिगंबर देशमुख



**सोलापूर, दि. ४ जून-**

भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचारी व मोहन नगर लष्कर येथील दिगंबर विठ्ठलराव देशमुख ( वय ५६) यांचे आज बुधवारी ४ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी एक मुलगा,एक मुलगी, नातवंडे भाऊ, बहीण असा परिवार असून ते सेवानिवृत्त भूमी अभिलेख कर्मचारी विठ्ठलराव कृष्णात देशमुख यांचे चिरंजीव होत.

### द्रौपदी बोकेफोडे



**बार्शी, दि. ४ जून-**

भीमनगर येथील द्रौपदी जनार्दन बोकेफोडे (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने मंगळवारी (दि.३) रात्री निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पुणे विद्यापीठाचे निवृत्त उपकुलसचिव सुधाकर बोकेफोडे, बार्शी नगरपरिषदेचे मिळकत कर अधिकारी महादेव बोकेफोडे, निवृत्त अधिकारी भगवान बोकेफोडे, बांधकाम व्यावसायिक तुषार बोकेफोडे यांच्या त्या मातोश्री होत. बुधवारी त्यांच्यावर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# दर्शनकोंडी करणारी तुळशीपूजा बंद करा

**वारकरी पाईक संघाची मागणी**

**विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने सुरु केली होती पूजा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ जून -**

थेट व्हिआयपींना सोडायला मंदिर प्रशासनाला अडचण होते, मंदिर अधिनियम कायद्यानुसार दर्शनाला पैसे घेता येत नाही, त्यामुळे मंदिर समितीने २१००/- रुपयांत ५ भाविक सोडणारी तुळशी पुजा नावाची 'पेड' दर्शन व्यवस्था सुरु केली आहे. त्यामुळे भाविकांची दर्शनकोंडी करणारी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडून सुरु करण्यात आलेली पेडदर्शन म्हणून प्रसिद्ध झालेली श्रीविठ्ठल रुक्मिणीची तुळशीपुजा तात्काळ बंद करण्यात यावी अशी मागणी येथील वारकरी पाईक संघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात पाईक संघाच्या वतीने एक निवेदन मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आल्याची माहिती संघाचे राष्ट्रीय प्रवक्ते रामकृष्ण महाराज वीर यांनी दिली. या बाबत माहिती देताना प्रवक्ते वीर महाराज म्हणाले, दिवसातून साधारण चार वेळा प्रत्येक वेळी दहा ते बारा पुजा केल्या जातात. त्यामुळे दिवसभराचा हिशोब केला तर एकुण साठ पुजा दिवसभरात होतात. यात प्रत्येकी पाच या नुसार दिवसभरात तीनशेहून अधिक भाविक थेट सोडले जातात. या प्रत्येक पाच जणांना श्रीविठ्ठल रुक्मिणी मुर्ती जवळ हार, पेढे दाखवून अगदी निवांतपणे दर्शन दिले जाते. हे सगळं होत असताना सामान्य भाविक दर्शनासाठी व्याकूळ होऊन तहान भूक व इतर शरीरधर्म ताटकळत ठेवून... तासनतास उभा असतो त्याच्याकडे कोणाचेही लक्ष नसतं. तुळशीपुजांमुळे दिवसभरात किमान दोन तास दर्शनासाठी उभारलेल्या भाविकांच्या हक्काच्या वेळेतून घेतले जातात. या शिवाय व्हिआयपीच्या नावाखाली सोडले जाणारे लोक वेगळेच. त्यामुळेच तासनतास दर्शन बारी जागेवरुन हलत नाही व भाविकांचे अतोनात हाल होतात. दरम्यान याचाच उद्रेक दर्शन रांगेत तिष्ठत बसलेल्या भाविकांकडून गेल्या एक, दोन दिवसांपासून होतो आहे. हा निषेध नोंदविताना संपुर्ण दर्शन रांगेतील भाविकांनी मंदिर समितीच्या निषेधाच्या घोषणा देखील दिल्या आहेत. हि सर्व परिस्थिती तात्काळ बदलण्यासाठी मंदिर समितीकडून सुरु करण्यात आलेली हि तुळशी पुजा बंद केली पाहिजे अशी मागणी पाईक संघाच्या वतीने मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.



> वारकरी सांप्रदायाचा कुंभमेळा अर्थात आषाढी एकादशीचा सोहळा तोंडावर आलेला आहे. त्यामुळे येत्या काळात येथे विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी ताबडतोब लक्ष घालून मंदिर समितीकडून सुरु करण्यात आलेली तुळशीपुजा बंद करावी.
>
> **- रामकृष्ण हनुमंत महाराज वीर**
> **(राष्ट्रीय प्रवक्ता,वारकरी संप्रदाय पाईक संघ)**

# अगोदर मशागत करा मगच 'चाड्यावर' मुठ ठेवा

**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

यंदा हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर ऋतुचक्रात बदल होऊन वर्षातील तीनही हंगाम साधारणपणे १५ दिवस ते १ महिन्याच्या कालावधीने उशिरा सुरू होऊ लागले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून अलीकडे अवकाळीचा तुफान पाऊस मे महिन्यात कोसळला आहे. मात्र उन्हाळ्यात पडणारा हा पाऊस खरीप पिकांच्या पेरणीसाठी पुरेसा नसतो, यामुळे शेतकऱ्यांनी सध्या पेरणीपूर्व जमिनीच्या मशागती कराव्यात आणि नंतरच पेरणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

जमिनीची उन्हाळी नांगरट झाल्यानंतर शेतात मातीची घट्ट अशी ढेकळे मोठ्या प्रमाणात तयार होतात. कडक उन्हाळ्यात अशा प्रकारची ढेकळे चांगली तापून निघाल्यामुळे पडलेल्या मान्सूनपूर्व पावसानंतर किमान २ वेळा पणजी करणे किंवा रोटरणी करून जमीन भुसभुशीत करणे गरजेचे असते. अशा भुसभुशीत जमिनीत पुढे पावसाचे पडणारे पाणी चांगल्या प्रकारे मुरते. तसेच बी उगवणीसाठी जमिनीत योग्य वातावरणही तयार होते. मान्सूनपूर्व पावसाच्या ओलीवर कुठलीही मशागत न करता घाईने शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी केली व पाऊस लांबला किंवा लागोपाठ मोठे पाऊस झाले तर केलेली पेरणी वाया जाते. यामुळे महागडे बियाणे व खतांचा अपव्यय होतो. त्यासाठी सुरुवातीचे मोठे पाऊस होऊन गेल्यानंतर, पूर्वमशागतीनंतर जमिनीची तहान पुरेशी भागल्यानंतरच खरीपाच्या पिकांची शेतकरी बांधवांनी पेरणी करण्याची गरज आहे. मृग नक्षत्रातच पेरणी केली तर पिकांवर कमी रोग पडतात. पाऊसही मोठा पडत नसल्याने पिके बहरून उत्पन्नातही मोठी वाढ होते. यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची गडबड न करता १० जूनपासूनच तिफण उचलावी, असेही आवाहन भोसले यांनी केले आहे.



**यंदा शेतीत पीक चांगलेच येणार**

सध्या पावसाने गेल्या ४ दिवसांपासून विश्रांती घेतली असली तरी जून महिन्यात तो पुनरागमन करेल. त्यामुळे यंदा कधी नव्हे ती शेतकऱ्यांना जून महिन्यात पेरणी करता येईल. याचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होईल. यामुळे यंदा शेतीत पीक चांगले येईल, असा अंदाजही कृषी अभ्यासक आणि जाणकार शेतकरी बांधत आहेत.

**मे महिन्यात विक्रमी पाऊस**

जिल्ह्यात मे महिन्यात कधी नव्हे तो यंदा २३० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये उत्तर सोलापूर २७१.२ मिमी, दक्षिण सोलापूर २१७.८, बार्शी २५४.८, अक्कलकोट २०९.८, मोहोळ २११.४, माढा २५९.७, करमाळा १७८.४, पंढरपूर १५२.९, सांगोला २१९.६, माळशिरस २९०.९ आणि मंगळवेढा १८१.९ मिमी इतका पाऊस झाला तर जिल्ह्यात सरासरी २३०.८ इतका विक्रमी पाऊस नोंदला गेला आहे. तर पुणे विभागात २६०.३ मिमी इतका पाऊस पडला आहे.

# अकरावी प्रवेशप्रक्रीयेत तांत्रिक अडचणी; अर्ज करण्याचा आज शेवटचा दिवस

**ऑफलाईन अर्ज भरून घेण्याची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून**

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना आज गुरूवार ५ जून रोजी दुपारी २ वाजेपर्यंत अर्ज करता येणार आहे. यापूर्वी मंगळवार ३ जून पर्यंत अर्ज भरण्याची मुदत होती. पण, त्यामध्ये दोन दिवसांची वाढ करण्यात आली आहे. मात्र मंगळवार व बुधवार दोन दिवस ऑनलाईन प्रक्रियेमध्ये तांत्रिक अडचणी असल्याने विद्यार्थ्यांना प्रवेशअर्ज भरता आले नाहीत. जिल्ह्यात ४० हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेशअर्ज केला असून अजूनही दहा हजाराहून अधिक विद्यार्थी प्रवेशप्रक्रियेपासून वंचित आहेत. त्यामुळे प्रवेशप्रक्रियेसाठी मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात येत आहे . मुदतवाढ न दिल्यास विद्यार्थ्यांना ऑफलाईन प्रवेश घेण्यासाठी मान्यता देण्याची मागणी होत आहे.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये २६ मे पासून इयत्ता अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. ३ जूनपर्यंत अंतिम मुदत असताना शासनाकडून दोन दिवस मुदतवाढ देण्यात आल्याने प्रवेशअर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला. मात्र साइटच्या तांत्रिक अडचणीमुळे प्रवेशप्रक्रीया ठप्प असल्याचे सांगण्यात आले. आज ५ जून दुपारी दोन वाजेपर्यंत उर्वरीत विद्यार्थ्यांना अर्ज करावे लागणार आहे. अन्यथा त्यांना अकरावीसाठी प्रवेश मिळणार नाही. आजही अडचणी आली तर मुदतवाढ देण्यात यावी. मुदतवाढ न दिल्यास ऑफलाईन अर्ज भरून घ्यावेत अशी मागणी विद्यार्थी व पालकांकडुन करण्यात येत आहे.

# जिल्ह्यातील शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक व्हावी

**शिक्षकांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून -**

सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक व्हावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष सुरेश पवार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती स्मिता पाटील, शिक्षणाधिकारी कादर शेख यांची भेट घेऊन विविध विषयांवर निवेदन देऊन चर्चा केली. यामध्ये प्रतिक्षा यादीतून शिक्षण विस्ताराधिकारी व मुख्याध्यापकांची रिक्त पदे भरण्यात यावीत, इ ऑफिस कार्यप्रणालीच्या कार्यवाहीतील अडचणी दूर कराव्यात, मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रियेतील अनियमितता दूर करावी, अधिसंख्य पदांवरील शिक्षकांना स्थायित्वाचा लाभ द्यावा, केंद्रप्रमुख रिक्त पदे भरावीत , जिल्हा प्रज्ञाशोध परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करावा , विज्ञान व भाषा विषय शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करावी, अक्कलकोट तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांचे थकीत वेतन व पुरवणी देयके अदा करावीत, वरिष्ठ वेतनश्रेणीचे प्रस्ताव मंजूर व्हावेत आदी मागण्या करण्यात आल्या. यावेळी यशवंत पंचायतराज अभियानात सोलापूर जिल्हा परिषदेने राज्यात तृतीय क्रमांक पटकावल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्य उपाध्यक्ष राजन सावंत, डॉ रंगनाथ काकडे, मो.बा. शेख, बसवराज गुरव, अन्वर मकानदार, बाबासाहेब माने, विठ्ठल ताटे, चरण शेळके, राजन ढवण, विजय मुकणे,प्रदीप चवरे उपस्थित होते.



> सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून गतिमान प्रशासनाची अनुभूती येते. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शिक्षकांचे प्रलंबित प्रश्नांची लवकरच सोडवणूक होईल अशी अपेक्षा आहे.
>
> **- सुरेश पवार, जिल्हाध्यक्ष शिक्षक समिती सोलापूर**




# भाजप कार्यकर्त्यांनी सोलापूरच्या कामगारांची मांडली व्यथा

**भाजप प्रदेश कार्यालयात कामगारमंत्री आकाश फुंडकर यांचा जनता दरबार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

मुंबई येथे भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यालयात आयोजित कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या जनता दरबारात सोलापूरच्या कामगारांच्या विविध समस्या प्रदेश अध्यक्ष विजय हरगुडे यांच्या मार्गदरशनाखाली मांडण्यात आल्या.

यामध्ये कामगार भवन, एमआयडीसी येथे ईएसआय ओपीडी, व्यवसाय कर जो कामगारांच्या पगारातून दर महिन्याला कपात केला जातो त्याचा सध्याचा जो स्लॅब आहे तो ७५०१ महिन्याला कमावला तर १७५ रू कपात होतो तर त्याची लिमिट वाढवावी, या व्यातरिक्त सोलापुरातील टेक्सटाइल उद्योगातील असंघठीत कामगारांसाठी विविध योजना राबवाव्यात कारण सोलापूरमध्ये ही एकच इंडस्ट्री आहे ज्यात खूप मोठ्या प्रमाणात लोक काम करतात व बहुतांश लोकांकडे स्वतःचे घर पण नाही. गारमेंट उद्योगाला आणखी बळकट करण्याकरिता रे नगर येथील घरकुल मध्ये घर घेतलेल्या कामगारांना तिथेच काम मिळावे. याकरिता १००एकरचा गारमेंट पार्क उभा करावा अशी मागणी भाजप कामगार मोर्चाचे सचिव दर्शन अशोक कोचर यांनी केली. यावेळी सर्व प्रश्न लवकर मार्गी लावू असे कामगार मंत्री यांनी सांगितले.

या वेळी कामगार मोर्चा महाराष्ट्र प्रदेशचे संघटन सरचिटणीस हनुमंत लांडगे, उपाध्यक्ष अ‍ॅड. भूषण पाटील, उपाध्यक्ष जगन्नाथ गावडे, सरचिटणीस बाळासाहेब टेमकर, सनी मोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# झाडं वाचवा, उष्माघात टाळा: सोलापूरची हरित हाक

**झाडांसाठी या एकत्र - गाव, शाळा आणि संस्था यांनी घ्यावा पुढाकार**

**जागतिक पर्यावरण दिन विशेष**

**तभा वृत्तसेवा । प्रमोद जवळकोटे -**
**मंद्रूप, दि. ४ जून-**

सोलापूर जिल्ह्यात यंदाचा उन्हाळा नेहमीप्रमाणे तीव्रच होता. उष्णतेच्या लाटा, सततचा उकाडा आणि वाढलेली आर्द्रता यामुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले होते. यावर्षी मे महिन्याच्या सुरुवातीला अनपेक्षितपणे पावसाने हजेरी लावल्यामुळे काही काळ उन्हाचा तीव्रपणा कमी जाणवला. मात्र मागील अनेक वर्षांचा विचार करता, मे महिन्याच्या अखेरीस तापमान ४४ अंश सेल्सिअसच्या पुढे जाणं ही नेहमीची स्थिती झाली आहे.

सोलापुरातील रस्ते, चौक, बसथांबे किंवा कामगारांच्या विश्रांतीच्या जागा - प्रत्येक ठिकाणी झाडांची सावली हा जणू एकमेव आधार बनला आहे. मात्र झाडांची संख्या दरवर्षी घटत चालल्यामुळे सावलीचे हे ठिकाणही मर्यादित राहिले आहेत. रस्ते रुंदीकरण, उड्डाणपुलांची कामं आणि नव्या वसाहतींसाठी झाडांची संख्या कमी झाली. पण त्याऐवजी नवी झाडं किती लावली गेली, याचा लेखाजोखा कुठेच नाही. या झाडांच्या अभावामुळे वातावरणात प्रचंड उष्णता साठते, आणि जमिनीवरून परतलेली ही गरम हवा नागरिकांच्या शरीरावर थेट परिणाम करत आहे. पाणी कमी मिळणं, थकवा, चक्कर, डोकेदुखी यासारखी उष्माघाताची लक्षणं आता सामान्य झाली आहेत. वृक्षतोड, वायू व जलप्रदूषण, वाढते तापमान, कमी पावसाचे प्रमाण, मृदधूप - या सगळ्या संकटांमधून मार्ग काढायचा असेल, तर झाडांचाच पर्याय आहे, हे आता गावकऱ्यांना आणि पर्यावरण अभ्यासकांना स्पष्ट दिसतं आहे. याच कारणामुळे पर्यावरण दिनाच्या निमित्ताने सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायत, जिल्हा परिषद शाळा, महाविद्यालये आणि कंपन्यांना वृक्षारोपणाचे उद्दिष्ट घेऊन काम करावे लागेल. उडठ निधीचा वापर पर्यावरण संवर्धनासाठी व्हावा, अशी मागणी पर्यावरण प्रेमी करत आहेत. 'हरित सोलापूर' ही संकल्पना फक्त भाषणांपुरती मर्यादित न राहता, कृतीत उतरली तरच सोलापूरला उन्हापासून वाचवता येईल. शहरात झाडं वाढतील, सावली मिळेल, तापमान आटोक्यात राहील, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे माणसाला मोकळा श्वास घेता येईल. गावपातळीवर ग्रामपंचायतींनी सार्वजनिक ठिकाणी, स्मशानभूमी, तलाव परिसर अशा मोकळ्या जागांमध्ये झाडे लावण्याचा निर्णय घ्यावा. जिल्हा परिषद व नगरपालिका शाळांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने प्रत्यक्ष वृक्षलागवड करून पुढील पिढीमध्ये पर्यावरणाचे भान निर्माण करावे. महाविद्यालयांनीही 'ग्रीन कँम्स'साठी नियोजन करून अभ्यासाबरोबरच पर्यावरण रक्षणाचे धडे विद्यार्थ्यांना द्यावेत. शासकीय कार्यालयांनी आपल्या परिसरात झाडांची संख्या वाढवून इतरांसाठी अनुकरणीय उदाहरण निर्माण करावे. तसेच जिल्ह्यातील मोठ्या खाजगी कंपन्यांनी त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व (उडठ) योजनांमध्ये वृक्षलागवड आणि संवर्धन प्रकल्पाला प्राधान्य द्यावे, अशीही मागणी होत आहे. सोलापूरसारख्या उष्ण आणि दुष्काळी भागात प्रत्येक लावलेले झाड हे भविष्यातील सावली, प्राणवायू आणि सजीवतेचे प्रतीक असणार आहे, याची जाणीव प्रत्येक घटकाने ठेवावी, असा सूर नागरिकांमध्ये उमटत आहे.



> अनेक महत्वाच्या विषयांमध्ये 'पर्यावरण संवर्धन' हा एक अतिशय महत्वाचा विषय बनलेला आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' या घोषवाक्याऐवजी 'झाडे लावूया, झाडे जगवूया' अशाप्रकारची कृतिशीलता अवलंबविण्याची गरज निर्माण झाली आहे. योग्य ठिकाणी, योग्य रोपे लावून या रोपांना काही ठराविक कालावधीपर्यंत संभाळणं अनिवार्य आहे. या कार्यात सर्वांचा सहभाग अपेक्षित आहे. परिसरातील हरित पट्टे वाढवण्याच्या दृष्टीने सामाजिक, राजकीय पातळीवर ठोस कृती गरजेची आहे.
>
> **- अरविंद म्हेत्रे, पर्यावरणप्रेमी**

## महत्वाचे...



### राजकपूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त सूरमयी शाम कार्यक्रम उत्साहात

**सोलापूर, दि. ४ जून-**

हिंदी चित्रपटातील सुपरस्टार राजकपूर यांच्या पुण्यतिथी निमित्त मंद्रुपचे गायक तात्यासाहेब व्हनमाने यांनी सोलापूरातील समृध्दी हॉटेल येथे सूरमयी शाम कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रवादीचे शहरअध्यक्ष सुधीर खरटमल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपा अनूसूचित जाती मोर्चाचे तालुकाध्यक्ष नितीन रणखांबे, बसवनगरचे पोलीस पाटील प्रविण राठोड, डॉ. संजीव मुरूम कर, डी.के. चाचा, युसुफ पिरजादे, हसम, मंद्रुप ग्रामपंचायत सदस्य सुरेश टेळे, ग्रामसेवक नागेश जोडमोटे, मुदस्सर बिराजदार, अश्रफ खान, नरेंद्र लोभे, आनद रूपनर, इरफान शेख आदी उपस्थित होते. यावेळी तात्यासाहेब व्हनमाने यांनी जिना यहाँ, मरना यहाँ, एक दिन बिक जाएगा, प्यार हुआ, इकरार हुआ, जाने कहाँ गए ओ दिन, आवारा हूँ, सब कुछ सिखा हमने, दम भर जो इधर' आदी गाण्यातून स्व. राजकपूर यांच्या आठवणींना उजाळा दिला. अनुराधा गांगुल यांनी पंछी बनो, ओ मेरे सनम, रमया वस्तवया आदी गाणी गायले.

### दमदाटी केल्याप्रकरणी महिलेविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. ४ जून-**

तू माझ्या सोबतच रहायचे,बायकोसोबत रहायचे नाही असे म्हणून घरात घुसून शिवीगाळ करून धमकी दिल्याप्रकरणी एका महिलेविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सपना बालू वाडेकर (रा.विद्या नगर शेळगी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव असून याबाबत मिनाक्षी दिनेश बनसोडे (वय-३० वर्षे, रा- बसंवतराव पाटील नगर दहिटणे) हिने फिर्याद दिली आहे. ३ जून रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास यातील यातील फिर्यादी पती,बहिणीचा मुलगा, वडील, व मुले असे सर्वजण घरात बसलेले असताना वरील अरोपी महिला ही बेकायदेशीर पणे घरात घुसून फिर्यादीच्या पतीस तु माझ्या सोबतच रहायचे,बायकोसोबत रहायचे नाही,नाहीतर तुला व तुझ्या घरच्यानाही जीवे मारते असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पोलीस हवालदार जगताप हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### रस्त्यात अडवून मारहाण; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ४ जून-**

वापरण्यास दिलेली दुचाकी परत नेली म्हणून तरुणाला शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना शेळगी भागातील राही मंगल कार्यालयासमोर घडली. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात एका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नबीलाल रजाक शेख (रा- कुमारस्वामी नगर शेळगी सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत तौफिक जावीद बागवान (वय-३३रा- मुक्तेश्वर नगर शेळगी) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हे दोन जून रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास मोटार सायकलवरून घरी जात असताना राही मंगल कार्यालयासमोर यातील अरोपीने मागील आठवडयामध्ये फिर्यादीने अरोपीस वापरण्यास दिलेली मोटार सायकल परत नेल्याच्या कारणावरून चिडून जावून फिर्यादीस शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.



# बाळे ब्रिज, सहारा सिटीजवळील जलवाहिनी दुरुस्तीचे काम पूर्ण

- सकाळी दहा वाजल्यापासून पूर्ववत पाणीपुरवठा चालू
- महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता तपन डंके यांची माहिती





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या पाकणी ते सोलापूर दरम्यानच्या जलवाहिनीला मंगळवारी बाळे पुलाखाली व सहारा सिटी जंगलीहॉटेल समोर गळती लागली होती. त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले. दोन्ही ठिकाणाचे दुरुस्तीचे काम १२ तासात पूर्ण करण्यात आले. आज सकाळी १० वाजल्यापासून पाणीपुरवठा चालू करण्यात आला आहे, अशी माहिती महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता तपन डंके यांनी दिली.

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्यावतीने मंगळवारी सायंकाळी बाळेजवळील आदिला नदीमध्ये पिलर टाकत असताना धक्का लागल्यामुळे उजनी-सोलापूर जलवाहिनीला मोठी गळती लागली. मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत असल्याने दुरुस्तीचे काम अत्यंत तातडीने घेणे जरुरीचे होते. त्यामुळे काल संध्याकाळीच दुरुस्तीचे कामकाम हाती घेण्यात आले. बाळे पुलाखाली व सहारा सिटी जंगलीहॉटेल समोर गळती दुरुस्तीचे काम बारा तासात पूर्ण करण्यात आले. त्यानंतर सकाळी १० वाजल्यापासून पाणी पुरवठा चालू करण्यात आला आहे, असे सार्वजनिक आरोग्य अभियंता तपन डंके यांनी सांगितले.

दरम्यान, दुरुस्तीचे काम करण्यास बराच कालावधी लागणार असल्याने सोलापूर शहराचा उजनी पाईपलाईन वरून भवानी पेठवरून व हायलेवल वरून होणारा आणि अवलंबून असलेला परिसराचा पाणीपुरवठा एक रोटेशनकरीता एक दिवसाने पुढे ढकलण्यात आला होता. गळती दुरुस्तीनंतर पाणी पुरवठा चालू करण्यात आला आहे.

**जलवाहिनी दुरुस्तीसाठी अशी होती यंत्रणा**

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार सार्वजनिक आरोग्य अभियंता तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली तत्काळ हे काम हाती घेण्यात आले. कामासाठी महापालिकेचे सहायक अभियंता हिदायत मुजावर, कनिष्ठ अभियंता एजाज शेख, वार्षिक मक्तेदार यांच्याकडील ६ कर्मचारी कार्यरत होते. जेसीबी वापरण्यात आला.



# सीबीएससी शाळांची आज वाजणार घंटा

### शाळांची झाली स्वच्छता अन् साफसफाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जून-**

शहरातील सीबीएससी अभ्यासक्रमांच्या शाळांची आज घंटा वाजणार आहे. उन्हाळच्या सुट्ट्या संपल्यानंतर शाळेचा पहिला दिवस असणार आहे. गेल्या महिन्याभारापासून सुट्ट्यामुळे शाळा बंद होत्या. आता शाळा पूर्वव्रत सुरू होणार आहेत. त्या अनुषंगाने शाळेतील वर्गखोल्यांची आज स्वच्छता व साफ सफाई करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापकांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बोलावून घेत, कार्यक्रमाची पूर्वतयारी केल्याचे चित्र यावेळी दिसून आले.

दरम्यान, सोलापूर शहरातील विविध सी.बी.एस.सी अभ्यासक्रम पद्धतीच्या शाळांमध्ये हा प्रवेशोत्सव करण्यात येणार आहे. आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. त्यासाठी संबंधित शाळा समितीच्या वतीने विविध जय्यत तयारी करण्यात आली आहे. शाळेत प्रवेश घेतलेल्या विविध वयोगटाच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी आनंददायी व प्रसन्नमय वातावरणात प्रवेशोत्सव आणि गुलाब पुष्प देऊन औक्षण करत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात येणार आहे.

**बालगोपाळांच्या स्वागतासाठी तयारी**

शहरातील विविध शाळांमध्ये आता नवीन सीबीएससी अभ्यासक्रमांचे वर्ग सुरू झालेले आहेत. छोट्या गटापासूनच हा अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे चिमुकल्या बालगोपाळांना व त्यांच्या पालकांना हा क्षण अविस्मरणीय रहावा, यासाठी शाळा समितीच्या वतीने बालगोपाळांच्या स्वागतासाठी विशेष तयारी केल्याचे सांगण्यात आले.



**महेश नवमी साजरी :** सोलापूर : माहेश्वरी समाजाच्या वतीने महेश नवमीनिमित्त बुधवारी शोभायात्रा काढण्यात आली. युवक व युवती लेझीम खेळताना टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)

### एआयची जादू आणि उद्याचे जग या विषयावर

# अच्युत गोडबोले यांचे शनिवारी व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

संगणकाच्या युगात अनेक नवनवीन बदल आणि आधुनिकता येत असताना सध्या ए आय म्हणजेच कृत्रिम बुध्दीमत्ता याचा जगभर वापर सुरू होत असल्याने या ए आय चे फायदे आणि त्याचे नुकसान यावर जगप्रसिध्द लेखक माहिती तंत्रज्ञान अभ्यासक अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्या वतीने शनिवार दि. ७ जून रोजी लोकमान्य टिळक सभागृह ॲम्फी थिएटर मध्ये सायंकाळी ६.२५ वा. होणार असल्याची माहिती महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर आणि कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी दिली.



जगभरातल्या संगणक क्षेत्रातील विविध कंपन्यामध्ये २३ वर्षे काम करून केवळ तांत्रिक ज्ञानच नाही तर विविध संस्कृती, विचार आणि तंत्रज्ञानाची दृष्टी आत्मसात करणारे अच्युत गोडबोले तांत्रिक लेखणातही सिध्दहस्त आहेत. अनेक पुस्तकेही त्यांनी लिहली आहेत. त्यांच्या ज्ञानाचा आणि सध्या जगभरात आणि आपल्या देशातही सर्वच क्षेत्रात वापर वाढत असलेल्या ए आय अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुध्दीमत्ता याबाबत सविस्तर माहिती व्याख्यानाच्या माध्यमातून सोलापूरकरांना मिळावी या हेतुने महाराष्ट्र साहित्य परिषदेने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. नेहमी सोलापूरकरांना विविध प्रकारचे कार्यक्रमाची मेजवानी देण्याचा प्रयत्न करण्यात येतो त्याचा सोलापूरकरांनी लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# क्रोमा शोरुममधील चोरी तपासात आंतरराज्य गुन्हेगाराकडून ३६ लाखांचे ६७ मोबाईल फोन हस्तगत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

होटगी रोडवरील टाटा कंपनीचे क्रोमा शोरुम फोडून, चोरट्याने शोरुममधील विविध कंपन्यांचे ७८ महागडे मोबाईल फोन व एक क्रोमा शोरुमची काळ्या रंगाची सॅक (पिशवी) असा ४० लाख ४१ हजार २२० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी प्रकरणात रामनिवास उर्फ रामा मंजू गुप्ता (वय ३७ वर्षे) याला शहर गुन्हे शाखेने गजाआड केलंय. त्याच्या ताब्यातून ३६ लाख ३३ हजार ८२९ रुपये किंमतीचे मोबाईल हस्तगत करण्यात यश आले. हा आरोपी आंतरराज्यीय घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार असल्याचं पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आलंय.

याबाबत मिळालेली कधीच माहिती की, गुरुवारी, २९ मे ते रात्री अज्ञात चोरट्यानं, टाटा क्रोमा शोरुमचे फोडून ४०,४१,२२० रुपये किंमतीचे विविध कंपन्यांचे ६७ महागड्या किंमतीचे मोबाईल चोरून नेले असल्याची फिर्याद जितेंद्र दिलीप वाणी (रा. रोहीणी नगर भाग-३, ओम गर्जना चौक, सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दाखल केली.



**आरोपी गुप्ताविरूध्द पाच राज्यात गुन्हे दाखल**

हा गुन्हा सपोनि शैलेश खेडकर व त्यांच्या तपास पथकाने अत्यंत कमी कालावधीत कौशल्याने, अविरत परिश्रम घेऊन उघडकीस आणला. गुन्हेगार रामनिवास उर्फ रामा मंजू गुप्ता याचेवर, गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक, गोवा व महाराष्ट्र अशा विविध राज्यात घरफोडी-चोरीचे व मोबाईल शॉपी फोडून चोरी केल्याचे गुन्हे दाखल असल्याची माहिती शहर गुन्हे शाखेकडून सांगण्यात आलंय.

**यांनी पार पाडली कामगिरी**

गुन्हे शाखेकडील नेमणुकीचे स.पो.नि. शैलेश खेडकर, स.पो.नि. विजय पाटील व पथकातील पोलीस अंमलदार संदीप जावळे, विनोद रजपुत, राजकुमार पवार, इम्रान जमादार, उमेश पवार, आबा सावळे, अजिंक्य माने, धीरज सातपुते, इब्राहिम शेख, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, अंकुश भोसले, शैलेश बुगड, चालक सतिश काटे, शाम सुरवसे तसेच सायबर पो. स्टे कडील प्रकाश गायकवाड व मच्छिंद्र राठोड यांनी पार पाडली.

याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यावर गुन्हे शाखेचे व.पो. नि. सुनिल दोरगे, स.पो.नि. शैलेश खेडकर व त्यांच्या तपास पथकातील पोलीस अंमलदार यांनी गुन्ह्याचे घटनास्थळास भेट देऊन घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण केले. तपास पथकातील पोलीस अंमलदार इम्रान जमादार यांनी घटनास्थळाचे आजू-बाजूचे परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेज व तांत्रीक माहितीचे अत्यंत बारकाईने निरीक्षण केले.

त्या आधारे, सपोनि खेडकर व तपास पथकास एका अनोळखी व्यक्तीवर संशय निर्माण झाला. त्याअनुषंगाने, त्या अनोळखी इसमाची अधिक माहिती संकलित करण्यास सुरुवात केली असताना, तपास पथकास, ०३ जून रोजी मिळालेल्या गोपनिय माहितीनुसार सोलापूर रेल्वे स्टेशन परिसरात संशयीतरित्या फिरत असताना रामनिवास उर्फ रामा गुप्ता (रा. सध्या बिहार नगर, सत्यभामा चाळ नं.२, टाटा पावर हाऊस जवळ, दिवा (पूर्व) ठाणे, जि. ठाणे) याला चोरी केलेल्या मोबाईल फोनसह ताब्यात घेतले. त्याच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने कसून चौकशी केली असता, त्याने टाटा क्रोमा शोरूममधील मोबाईल चोरीप्रकरणी दाखल गुन्हा केल्याची कबूली दिली. त्यास या गुन्ह्यात अटक करणेत आलीय.

सपोनि शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकाने, गुन्हयाचे तपासात, आरोपीकडून, होटगी रोडवरील टाटा क्रोमा शोरुममधुन चोरी केलेले ॲपल, सॅमसंग, वन प्लस, ओप्पो, विवो, नथिंग अशा विविध कंपन्यांचे ६७ महागडे मोबाईल फोन व एक काळ्या रंगाची सॅक तसेच आरोपीकडं त्याचा वापरत असलेला मोबाईल फोन असा ३६,३३,८२९ (छत्तीस लाख तेहतीस हजार आठशे एकोणतीस) रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राज कुमार, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/वि.शा.) डॉ. दीपाली काळे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) राजन माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक (गुन्हे शाखा) सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेकडील नेमणुकीचे स.पो.नि. शैलेश खेडकर, स.पो.नि. विजय पाटील आणि त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदारांनी पार पाडली.







हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कवी वैभव जोशी यांना दत्ता हलसगीकर पुरस्कार जाहीर

### रविवारी वितरण

**सोलापूर दि. ४ जून-**
महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखा आणि प्रिसिजन फाऊंडेशन यांच्यावतीने दिला जाणारा ज्येष्ठ कवी स्वर्गीय दत्ता हलसगीकर श्रेष्ठ साहित्यिक पुरस्कार २०२५ महाराष्ट्रातील नामवंत कवी वैभव जोशी यांना जाहीर करण्यात आला आहे.

दहा हजार रुपये रोख, चांदीचे कमळ, आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. रविवार दिनांक ८ जून रोजी सायंकाळी ६ वाजता श्री. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक


स्व. दत्ता हलसगीकर


कवी वैभव जोशी

(ॲम्फी थिएटर) सभागृहात हा पुरस्कार सोलापुरातील संगमेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. सुहास पुजारी यांच्या हस्ते आणि प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार दिला जाणार आहे. पुरस्कार वितरणानंतर कवी वैभव जोशी यांचा काव्यवाचनाचा कार्यक्रम होईल, अशी माहिती मसाप जुळे सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी आणि कार्याध्यक्ष सायली जोशी यांनी दिली. यापूर्वी डॉ. स्वर्णलता भिशीकर, डॉ.अनिल अवचट, प्रा. मिलिंद जोशी, अभिनेत्री स्पृहा जोशी, कवी संदीप खरे, क्रीडा समीक्षक द्वारकानाथ संझगिरी, डॉ.अरुणा ढेरे आणि ज्येष्ठ साहित्यिक सुनील शिनखेडे, ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांना यापूर्वी स्वर्गीय दत्ता हलसगीकर श्रेष्ठ साहित्यिक पुरस्कार देण्यात आला आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज सोलापूर जिल्हा दौऱ्यावर

**सोलापूर, दि. ४ जून-**
राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गुरूवार, दि. ५ जून रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा याप्रमाणे : गुरूवार, दि. ५ जून रोजी दुपारी १.३० वाजता नाशिक विमानतळ येथून जिल्हा सोलापूरकडे प्रयाण, दुपारी २.१५ वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन व हेलिकॉप्टरने अक्कलकोट, जि.सोलापूरकडे प्रयाण, दुपारी २.४५ वाजता ब्यागेहळ्ळी रस्ता हेलिपॅड, अक्कलकोट येथे आगमन व मोटारीने कार्यक्रमस्थळाकडे प्रयाण, दुपारी ३.०० वाजता शिवसेना पक्षाचा जाहीर मेळावा स्थळ- मंगळुरी हायस्कूल जवळील मैदान, अक्कलकोट, जि.सोलापूर, सायंकाळी ४.३० वाजता मोटारीने ब्यागेहळ्ळी रस्ता हेलिपॅड, अक्कलकोट, जि. सोलापूरकडे प्रयाण, सायंकाळी ४.४५ वाजता ब्यागेहळ्ळी रस्ता हेलिपॅड अक्कलकोट येथे आगमन व हेलिकॉप्टरने सोलापूर विमानतळाकडे प्रयाण, सायंकाळी ५.१५ वाजता विमानतळ येथे आगमन व विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.



### श्री नीलकंठेश्वर शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी राजीव आडकी

**सोलापूर, दि. ४ जून-**
श्री. नीलकंठेश्वर शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ संचालक राजीव सुभाष आडकी यांनी निवड झाली. ४ जून रोजी संस्थेच्या कार्यालयात ही निवड एकमताने करण्यात आली. भास्कर बुगप्पा आडकी यांनी वैयक्तिक कारणामुळे राजीनामा दिल्याने रिक्त जागेवर राजीव आडकी यांची निवड झाली. याप्रसंगी सचिव रवी नादरगी, विश्वस्थ अर्जुन कस्सा, ॲड. अमरनाथ कनकी, रमेश दंडगळ, महेश बटगिरी, राम मुटकिरी, शिवाजी अच्युगटला आदी सदस्य उपस्थित होते. ते सोलापूर महानगरपालिकेच्या हुतात्मा स्मृती मंदीरचे माजी व्यवस्थापक आहेत. निवड झाल्यानंतर राजीव आडकी यांनी शैक्षणिक गुणवत्ता व पटसंख्या वाढविणार असल्याचे मनोगत व्यक्त केले.



### महावितरणच्या वर्धापनदिनी आज विविध कार्यक्रम

**सोलापूर, दि. ४ जून-**
महावितरण राज्य विद्युत वितरण कंपनीचा २० वा वर्धापन दिनानिमित्त गुरुवार, दि. ५ जून रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत. प्रादेशिक कार्यालय पुणे कार्यकारी संचालक, भुजंग खंदारे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. बारामती परिमंडळाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. सकाळी दहा वाजता स्वागत, उद्घाटन, दीप प्रज्वलन व सत्कार, तद्नंतर विद्युत सुरक्षा एकपात्री प्रयोग संदीप पाचंगे हे सादर करणार आहेत. नंतर होम मिनिस्टर व विविध मनोरंजक कार्यक्रम तसेच आर्केस्ट्रा हा कार्यक्रम जुळे सोलापुरातील टाकळीकर मंगल कार्यालयात असून कार्यक्रमास कर्मचारी व अधिकाऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन सोलापूर मंडळ अधीक्षक अभियंता सुनील माने यांनी केले आहे.

# किमान वेतनासाठी घंटागाडी कामगारांचे पाण्याच्या टाकीवर शोले स्टाईल आंदोलन

- तीन झोनच्या घंटागाडी कामगारांनी केले काम बंद

- त्या-त्या भागातील कचरा संकलनाचे काम ठप्प


सोलापूर : जुळे सोलापूर परिसरातील पाण्याच्या टाकीवर घंटागाडी कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले. यावेळी विजापूर नाका पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी या घंटागाडी कर्मचाऱ्यांना टाकीवरून खाली येण्यास सांगितले व त्यांची समजूत काढली.





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**
किमान वेतनाप्रमाणे वेतन मिळावे या प्रमुख मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी शहरातील घंटागाडी कामगारांनी दोन महिन्यानंतर पुन्हा बुधवारी काम बंद आंदोलन केले. दरम्यान, घंटागाडी कामगारांनी जुळे सोलापूर येथील पाण्याच्या टाकीवर उभारून शोले स्टाईल आंदोलन केले. जोरदार घोषणाबाजी केली. यामुळे त्या - त्या भागातील कचरा संकलनाचे काम ठप्प होते.

शहरात महापालिकेने घंटागाड्याद्वारे कचरा संकलन करण्याचा मक्ता नाशिकच्या वॉटर ग्रेस कंपनीला दिला आहे. या घंटागाडीवर चालक आणि मदतनीस असे कामगार कार्यरत आहेत. या कामगारांच्या माध्यमातून शहरातील कचरा संकलनाचे काम करण्यात येते. दरम्यान, संबंधित मक्तेदाराकडून या घंटागाडी कामगारांना किमान वेतनाप्रमाणे पगार दिला जात नाही. प्रत्येक महिन्याला कमी रक्कम दिली जाते. काही तक्रार अथवा नाराजी व्यक्त केल्यास कामावरून काढण्याची धमकी दिली जाते. घंटागाडी कर्मचाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप यावेळी संतप्त कामगारांनी केला आहे.

किमान वेतन, इएसआय, पीएफ देण्यात यावा या मागणीसाठी तीन व चार एप्रिल २०२५ रोजी शहरातील घंटागाडी कामगारांनी संप पुकारला होता. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी त्यावेळी ठेकेदारांना व कामगारांना आवश्यक त्या सूचना दिल्यानंतर संप मागे घेऊन कामगार पूर्वक कामावर रुजू झाले होते. मात्र यापूर्वी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्याने दोन महिन्यानंतर घंटागाडी कर्मचाऱ्यांना महिना भरल्यानंतर पूर्ण पगार न मिळाल्याने पुन्हा महापालिकेच्या तीन झोनच्या घंटागाडी कामगारांनी काम बंद ठेवले होते. इतर पाच झोनचे काम मात्र पूर्ववत सुरू होते.

**एका घंटागाडी कामगाराची प्रकृती बिघडली :** दरम्यान या आंदोलनावेळी नवनाथ पवार (वय ३६) कामगाराची प्रकृती बिघडली. त्यास शेजारील एका खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. आंदोलन केल्याने कामावरून काढून देण्याची धमकी मक्तेदाराने दिल्यामुळेच धसका घेतल्याने या कामगाराची प्रकृती बिघडली असल्याचा आरोप इतर कामगारांनी केला आहे.

**जेवढे काम तेवढेच वेतन दिले; मक्तेदार :** घंटागाडी कामगारांना नियमाप्रमाणे किमान वेतन अदा करण्यात येत आहे. जीपीएस प्रणालीनुसार कामाचे मूल्यमापन केले जाते. जितके काम केले तितका पगार दिला जातो. हॅन्ड ग्लोज, गणवेश घालणे, भंगार यासह इतर नियम न पाळल्यास पगार कपात करण्यात येतो. तसेच जेवढे तास काम केले त्याप्रमाणेही वेतन काढले जाते. महापालिकेच्या कराराप्रमाणे हे वेतन काढले जात आहे. तीन पैकी दोन झोन मध्ये सुमारे आठ गाड्या सुरू झाल्या आहेत. काम बंद संदर्भात सुपरवायझरशी चर्चा सुरू आहे. त्याचबरोबर नव्याने कामगार भरतीची प्रक्रिया ही सुरू केली आहे, असे स्पष्टीकरण मक्तेदाराने दिले आहे.

**एक दिवस काम बंद असल्यास मक्तेदारास २५ हजाराचा दंड : पवार**
घंटागाडी कामगाराच्या संदर्भात मक्तेदारांना सूचना दिल्या आहेत. शहरातील कचरा संकलनाचा मुक्ता संबंधित मक्तेदारांना देण्यात आला आहे. नियमितपणे हे कचरा संकलनाचे काम करणे आवश्यक आहे. एक दिवस कचरा संकलन बंद राहिल्यास मक्तेदारास साधारणतः २५ हजार रुपये दंड केला जाऊ शकतो. यामुळे घंटागाडी कामगारांनी केलेल्या काम बंद आंदोलनामुळे काही भागात एक दिवस संकलन झाले नाही. यामुळे २५ हजार रुपये दंड केला जाणार आहे, असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी स्पष्ट केले.

## नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित घरांच्या दुरुस्तीसाठी निधी होणार वितरित

- अवकाळीत पडझड झालेल्या घरांसाठी मिळणार मदत
- पुणे विभागास मिळणार १२ कोटी रुपये



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**
नैसर्गिक आपत्तीमुळे पडझड, नुकसान झालेल्या घरांच्या दुरुस्ती, पुनर्बांधणी यासाठी आपत्तीग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत करण्यासाठी सर्व विभागीय आयुक्तांना ४९ कोटी रुपये इतका निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली असून, या संदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. दरम्यान, पुणे विभागास यातील १२ कोटी रूपयांचा निधी वितरित होणार आहे.

नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या घरांचे पंचनामे होऊन त्याबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर बाधितांना मदत वितरीत करण्यासाठी बराच कालावधी जातो. या आपत्तीग्रस्तांना तातडीने मदत करता यावी यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरानुसार आर्थिक मदत करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासनाने हा निर्णय घेतला आहे.

या निर्णयानुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार अंतर्गत सद्यःस्थितीत कोकण विभागास ५ कोटी रुपये, पुणे विभागास १२ कोटी रुपये, नाशिक विभागास ५ कोटी रुपये, छत्रपती संभाजीनगर विभागास १२ कोटी रुपये, अमरावती विभागास ५ कोटी रुपये आणि नागपूर विभागास १० कोटी रुपये असे एकूण ४९ कोटी रुपये इतका निधी निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या घरांची दुरुस्ती, पुनर्बांधणी करण्यास मदत होणार आहे.

## रेशनचे ३ महिन्याचे धान्य जून अखेरपर्यंत टप्प्याटप्प्याने होणार वाटप

- अन्नधान्य वितरण अधिकारी पडोळे यांची माहिती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**
पावसाळा तसेच महापूर सारख्या आपत्ती जनक परिस्थितीत आता राज्यात शिधापत्रिकेवरील तीन महिन्याचे अर्थात ऑगस्टपर्यंतचे धान्य जून मध्येच देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असल्यामुळे रेशन कार्डधारकांनी जून मध्ये आपल्या हक्काचे तीन महिन्याची धान्य एकत्रित घेऊन जावे, असे आवाहनही करण्यात येत आहे.

दरम्यान, दुकानदारांकडेही ३ महिन्याचे धान्य ठेवण्यास पुरेशी जागा नसल्याने पहिल्या १५ दिवसांत जूनचे धान्य वाटप होणार आहे आणि पुढील २ महिन्याचे धान्य २० ते ३० जूनपर्यंत वाटपाचे धोरण ठरविण्यात आल्याची माहिती अन्नधान्य वितरण अधिकारी पडोळे यांनी दिली.

दरम्यान तीन महिन्याचे धान्य एकत्रित मिळणार अशी अफवा व फेकन्यूज व्हायरल होत असल्याचे त्यावर विश्वास ठेवू नये, असे सोलापूर जिल्ह्याच्या पुरवठा विभागाने सांगितले. तीन महिन्याचे धान्य एकदाच नाही पण टप्प्याटप्प्याने मिळणार आहे. धान्य साठवण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील कोणत्याच दुकानदाराकडे पुरेशी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे तीन महिन्याचे धान्य दुकानदारांनी एकत्र उचलणे आणि लाभार्थ्यांना एकत्रित तीन महिन्याचे धान्य वितरण करणे हे अव्यवहार आहे. यामुळे दोन ते तीन टप्प्यात दुकानदारांनी धान्य उचलावे मात्र जूनमध्येच सर्व धान्य वाटप करावे, असे दुकानदारांना कळविले आले आहे.

**३० जूनपर्यंत शहरातील धान्य व्हावे वाटप**
सोलापूर शहरात सर्वच रेशन दुकानात जून महिन्याचे धान्य उपलब्ध आहे, मशीनवर ज्या महिन्याचे डाटा उपलब्ध आहेत त्याच प्रमाणे धान्य वाटप करावे, जुलै-ऑगस्ट महिन्याचे धान्य उपलब्ध होताच पुढील दोन महिन्याचे वाटप करावे. एकंदरीत ३० जून पर्यंत तीनही महिन्याचे धान्य वाटप होणे अपेक्षित आहे.

- **नितीन अशोक पेंटर,** जिल्हा संपर्कप्रमुख

**जूनचे धान्य पोहोचले दुकानात :** सोलापूर जिल्ह्यात जवळपास सर्वच रेशन दुकानदारात जून महिन्याचे धान्य उपलब्ध झालेले आहे. अन्न सप्ताह दिनाचे औचित्य साधून पहिल्या पंधरवड्यात म्हणजेच सात ते पंधरा तारखेपर्यंत जून महिन्याचे धान्य वितरण केले जाईल.

**पॉस मशीनवरील डाटा पाहून धान्य वितरीत करा**
जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील पेंटर व सर्व जिल्हा पदाधिकारी यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांची भेट घेतली असताआणि केंद्र सरकारच्या वतीने देण्यात येणाऱ्या तीन महिन्याच्या धान्य वाटपाचे मार्गदर्शन विचारणा केली असता, जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दुकानात ज्या महिन्याचे धान्य व पॉस मशीन वर जो डाटा उपलब्ध आहे; त्याच महिन्याचे धान्य वाटप करावे, जेणेकरून धान्य वाटपात पारदर्शकता राहील.

## शाळा-महाविद्यालयातच मिळणार 'लालपरी' चे पास

- एसटी महामंडळाचा निर्णय; मुख्याध्यापकांचे पत्र आवश्यक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**
यंदाच्या चालू शैक्षणिक वर्षाची सुरवात १६ जूनपासून होणार आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयांमध्येच मोफत प्रवास व सवलतीच्या पासचे वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. शाळांमध्ये परगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी व त्यांचे बोनाफाईड मुख्यापकांनी दिल्यास, त्या संबंधित शाळांमधील विद्यार्थ्यांना 'लालपरी'च्या सवलतीत प्रवासाचे पास मिळणार आहेत.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात एसटीच्या बसगाड्यांमधून दरवर्षी सरासरी १५ लाख मुले-मुली मोफत पासद्वारे प्रवास करतात. मुलींसाठी १०० टक्के सवलत असून मुलांना तिकीट दराच्या ३४ टक्के शुल्क भरल्यास त्यांना देखील सवलतीचा पास मिळतो. एसटी महामंडळाच्या बसमधून सध्या ६० वर्षांवरील ज्येष्ठांना ५० टक्के तर ७५ वर्षांवरील वृद्धांना मोफत प्रवास आहे. तर लाडक्या बहिणींना ५० टक्के सवलत आहे. याच पद्धतीने शाळा-महाविद्यालयातील मुलींसाठी देखील मोफत प्रवासाची योजना लागू आहे.




**एसटीच्या सेवेला अधिक बळ मिळणार**
कोरोना काळात एसटीच्या प्रवासी संख्येत लक्षणीय घट झाली होती. प्रवासी संख्या पूर्वपदावर आणण्यासाठी आणि प्रवासाला प्रोत्साहन देण्यासाठी महामंडळ नवीन योजना राबवत आहे. या प्रयत्नांमुळे प्रवाशांचा प्रतिसाद हळूहळू वाढत आहे. नव्या सवलत योजनेमुळे कमी गर्दीच्या हंगामातही प्रवाशांची संख्या वाढण्याची अपेक्षा आहे. यामुळे एसटीच्या सेवेला अधिक बळ मिळेल.

**विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक पास योजना**
परगावाहून शाळा-महाविद्यालयात मोठ्या संख्येने येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्याच शाळांमध्ये पास उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. शाळा सुरू होताच त्यानुसार कार्यवाही होईल. मात्र यासंबंधी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांचे पत्र आवश्यक आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पास योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेता येणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी महामंडळाच्या कार्यालयाशी भेट द्यावी.

- **अमोल गोंजारी,** विभाग नियंत्रक, सोलापूर एसटी विभाग

**बोनाफाईड द्यावे लागणार**
एलकेजी, युकेजी, प्राथमिक, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व उच्च महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची मोफत पासची योजना सुरू आहे. मुलींसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मोफत बस पास योजना आहे. योजनेतून मोफत पास काढण्यासाठी मुलींना किंवा मुलांना त्या शाळा किंवा महाविद्यालयाचे बोनाफाईड व एक छायाचित्र द्यावे लागणार आहे. मुख्याध्यापक किंवा प्राचार्यांना त्यांच्या शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना मोफत बस पास द्यायचे असल्यास त्यांनी तसे पत्र महामंडळाच्या आगारप्रमुखांना द्यायचे आहे. त्यानुसार त्यांना त्यांच्या शाळेत पास उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

## सोलापुरात उद्या बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगार मेळावा

- मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याहस्ते मेळाव्याचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर व के.पी.मंगळवेढेकर इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी शुक्रवार ६ जून रोजी एस.पी.एम. इंग्लिश मिडियम स्कुल, डफरिन चौक, होम मैदान समोर, सोलापूर येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे.

पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे उद्घाटन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते होणार आहे. या रोजगार मेळाव्यास जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. जिल्ह्यातील नोकरीइच्छुक उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टिने सदर रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, आय. टी. आय, वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशीयन, मशिन ऑपरेटर, बी.कॉम, एम.कॉम अशा प्रकारची एकुण २ हजार १०० पेक्षा जास्त रिक्तपदे १८ उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचित केलेली आहेत. नोकरी इच्छुक उमेदवारांनी रिज्युमच्या तीन प्रती आणि कागदपत्रासह शुक्रवार, दि. ६ जून २०२५ ठीक सकाळी १० ते २ वाजेपर्यंत एस.पी.एम. इंग्लिश मिडियम स्कुल, डफरिन चौक, होम मैदान समोर, सोलापूर येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत ०२१७-२९९२९५६ या दुरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापूर येथे संपर्क साधावा तसेच https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलला भेट द्यावी, असे आवाहनही कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०३७

**तारिला आजामीळ । महापापी की चांडाळ ।।**
**पतित - पावन । करी नाम हे जतन ।।**

सर्वगुण संपन्न असा म्हणजेच सर्व चांगल्या गुणांचा संगम असलेला आणि अवगुणांना अजिबात थारा नसलेला जीव संसारात सापडणे तसे कठीण आहे. कारण संसार म्हटला की कळत न कळत मी हा आलाच. आणि मी आला म्हणजे थोड्या फार प्रमाणात का होईना ईर्षा, द्वेष, मत्सर, काम,क्रोध, अहंकार, माया, लोभ, स्वार्थ आदि किंवा आदिपैकी कांहीतरी आलेच. हे सत्य असले तरी जेव्हा जीवाला जीवनातील कोणत्याही पायरीवर देह हा मिथ्या असल्याची जाणीव होते आणि देहामुळे निर्माण झालेले ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध आदि सुध्दा मिथ्या वाटू लागतात तेव्हा त्याच्याकडून जे कांही घडते ते चांगलेच घडते. चांगल्या वर्तनाची सुरुवात म्हणजे समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम, कर्तव्यरुपी पांडूरंगाचे त्याच्या जीवनात आगमन होणे होय. महापातकांच्या राशीची जाणीव होऊन सत्याकडे पाऊल उचललेल्या आजमिळाचा जर उध्दार होऊ शकतो, तर संसारात लहान सहान पातक केलेल्यांचा उध्दार होणार नाही काय? या जीवाचाही उध्दार होईल. त्यासाठी या जीवाने संत समागम करून सत्याची कास धरावी. भगवंत अशांचा उध्दार करतो, स्वीकार करतो, अशांचा अभिमानही बाळगतो. आपला स्वीकार करुन त्याने अभिमान बाळगावा, अशा अपेक्षेसह सेनाजींनी त्यांचा हा भाव प्रगट करतांना पंढरीनाथांना,



**तारिला आजामीळ । महापापी की चांडाळ ।। पतित - पावन । करी नाम हे जतन ।।, वागवी अभिमान । सेना म्हणे यातिहीन ।।**

असे म्हटले आहे. हा पंढरीनाथ सर्वांचा उध्दारक आहे, येथे सर्व तरतात. असे सांगतांना चोखोबाराय, चोखा म्हणे येथें सर्वां अधिकार । उंच नीच अपार तरले नामें ।।, असे म्हणतात.

जन्मत: कोणीही वाईट नसतो. त्याचे चांगुलपण किंवा वाईटपण हे त्याच्यापासून घडणाऱ्या आचार-विचारावर अवलंबून असते. चांगल्या व्यक्तिला वाईटाचा संग लागला तर चांगला व्यक्ति वाईट होऊ शकतो. तसेच वाईट व्यक्तिला चांगल्याचा सहवास लाभला तर वाईट व्यक्ति चांगला होत असतो. अर्थात, चांगल्यांच्या पोटी जन्माला आला म्हणून चांगला आणि वाईटांच्या पोटी जन्माला आला म्हणून वाईट असे होत नाही. पंढरीचा पांडूरंग हा समचरणी उभा राहून समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम आणि कर्तव्याचा संदेश देतो. या पांडूरंगाचा ज्याला सहवास लाभला किंवा जो पांडूरंगाच्या अपेक्षांची पूर्ती स्वत:च्या वर्तनातून करतो, त्याचा उध्दार होतो, असे सेनाजींना वाटते. पंढरीचा पांडूरंग हे चांगुलपणाचे अत्युच्च टोक आहे. त्याचबरोबर हा पांडूरंग मानवतेचा, माणुसकीचा, प्रेमाचा सागर आहे. या सागरात मन:पूर्वक न्हाण्याचा प्रयत्न करणारा ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, माया, अहंकार, स्वार्थ, लोभ आदिच्या मळीतून मुक्त होतो. समचरणी उभा राहून समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम, कर्तव्याचा संदेश देणाऱ्या पांडूरंगाला कर्तव्य तत्पर राहून नि:स्वार्थ प्रेम करणारा भक्त आवडतो. असा भक्त कोणत्या जातीत जन्माला आला किंवा तो स्त्री आहे की पुरुष याच्याशी त्याला कांही देणे घेणे नसते. त्या भक्ताचे कार्य आणि प्रेम हेच त्याच्यासाठी सर्वश्रेष्ठ असते. आपण वाट्याला आलेले कार्य प्रामाणिकपणे करतो. त्यामुळे भगवंताने आपल्याकडे यातिहीन म्हणून न पाहता आपल्या कर्तव्याकडे आणि प्रेमाकडे पाहून आपला स्विकार करावा, आपला अभिमान बाळगावा असे सेनाजी लडीवाळपणे म्हणतात. खरे म्हणजे सेनाजींनाही माहिती आहे की, भगवंत त्यांना अव्हेरुच शकत नाही. तरीपण वाट्याला आलेले कार्य प्रामाणिकपणे पूर्णत्वास नेण्यातच भगवंताची भक्ती, प्रेम दडले आहे, हे सांगण्यासाठी सेनाजींनी हा लडीवाळपणा केला असावा. आपण स्वत:ला कमी न समजता कार्यतत्पर राहावे, असा भावार्थ येथे घेणे उचित होईल असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. ५ जून २०२५ | जागतिक पर्यावरण दिन, |
| विक्रम संवत् २०८१ | गंगादशहरा समाप्ती |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - ज्येष्ठ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. दशमी (२६.१५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - हस्त (अहोरात्र) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिध्द (०९.१२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (१३.०२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : वादग्रस्त किंवा अडकून पडलेली रक्कम मिळण्याचे योग आहेत.कौटुंबिक वाद होण्याची शंका आहे. राजकीय अधिकाऱ्यांपासून सहकार्य मिळेल.

**वृषभ** : धावपळ केल्याने आपली कामे पार पडणार आहे. नौकरीमध्ये बदल होण्याची शक्यता. फायद्याच्या इराद्याने जोखमीचे कामे स्विकारा.

**मिथुन** : सकारात्मक परिणाम अनुभवण्याची आशा ठेवू शकता. व्यापारात विस्तार होण्याची शक्यता आहे.

**कर्क** : ज्यादा फायद्याच्या इराद्याने जोखमीचे कामे स्विकारणे योग्य ठरणार नाही.

**सिंह** : अनकूल परिणाम मिळण्यासाठी सक्रीय राहणे आवश्यक आहे. कौटुंबिक वाद होण्याची शंका आहे. व्यापार चांगला चालेल.

**कन्या** : अधिकारामध्ये वाढ होईल. व्यापारात अपेक्षेप्रमाणे फायदा नुकसान होईल.अडकून पडलेली कामे मार्गी लागतील.

**तुळ** : कामातील स्थान बदलल्याने व अस्थिरतेमुळे मन दु:खी होईल. सौदेबाजीमध्ये सावधान राहणे फायदेशीर राहील. .

**वृश्चिक** : स्थावर मालमत्ता उदा. जमीन, जागा, घर या संदर्भातील चाललेली बोलणी आपल्या बाजूने राहील. सौदेबाजीमध्ये सावधान राहा. जिवनात आनंद निर्माण होईल.

**धनु** : निर्णय घेण्यासंबंधी द्विधा मनस्थिती निर्माण होईल त्यामुळे कार्याची गती कमी होईल.

**मकर** : आपल्या नि:स्वार्थीवृत्तीमुळे आपल्याला फायदा होईल. व्यापारात गुंतवणूक फायदेशीर राहील. व्यापारात विस्तार होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : अडकून पडलेली कामे मार्गी लागतील. भौतिक सुख साधने, सुविधामध्ये विस्तार होईल. अधिकारामध्ये वाढ होईल. धावपळ केल्याने आपली कामे पार पडणार आहे.

**मीन** : अंधविश्वासापासून लांब राहून आलेल्या संधीचा फायदा उठवा. व्यावसायिक कामे जबाबदारीने पार पाडा. तिवनात यशस्वी व्हाल.

# शेतकऱ्यांच्या देय रकमा थकविणाऱ्या अडत व्यापाऱ्यांवर कारवाई

### बाजार समिती आवारातील दुकाने सील

### शेतकऱ्यांच्या वर्षानुवर्षे थकीत तक्रारींची दखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अडत व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची देणी थकविल्याने त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. बाजार समिती प्रशासनाने व संचालक मंडळाने देयक चुकवणाऱ्या अशा व्यापाऱ्यांचे दुकान सील करण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. वास्तविक पाहता बाजार समितीकडून संबंधित अडत व्यापाऱ्यांना शेतकऱ्यांचे थकीत देयक देण्यासाठी विहित मुदत देण्यात आले होती. मात्र सदरची सवलत देऊ नये संबंधित व्यापाऱ्यांनी रक्कम अदा केली नसल्याने, प्रशासनाने तात्काळ कारवाई केली आहे. प्रशासनाच्या या कडक निर्णयामुळे बाजार समिती आवारात चर्चेला उधाण आले आहे.

दरम्यान, सोलापूर बाजार समितीचा पदभार स्वीकारल्यानंतर सभापती दिलीप माने यांनी प्रशासनात आमूलाग्र बदल करण्याचा सपाटा सुरू केला आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारींना त्यांनी प्रथम प्राधान्य दिले आहे. शेतमालाच्या विक्रीनंतर वेळेत त्यांच्या मालाची पट्टी (रक्कम) न दिल्याने अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेण्यात आली आहे. शेतमाल विक्रीनंतर निर्धारित वेळेत रकमा देण्याचे बंधन असताना त्याचे उल्लंघन करणाऱ्या अडत व्यापाऱ्यांना त्यांनी लक्ष्य केले.

#### या व्यापाऱ्यांवर झाली कारवाई

मनीष भीमाशंकर चिकलंडे या व्यापाऱ्याकडे शेतकऱ्यांच्या कांदा विक्रीची १५ लाख रुपये पट्टी (रक्कम) थकली होती. बाजार समितीने या फर्मवर कारवाई करीत दुकान गाळा 'ताब्यात घेतला. हवा ट्रेडिंग कंपनी यांनी शेतकऱ्यांच्या कांद्याची ५ लाख रुपये पट्टी थकवली होती. महाराष्ट्र फ्लॉवर स्टॉल यादुकान गाळ्यात हवा ट्रेडिंग कंपनीचा अडत व्यापार संमतीने केला जात होता. त्यामुळे महाराष्ट्र फ्लॉवर स्टॉल हा दुकान गाळा सील करून बाजार समितीने ताब्यात घेतला. तर दुसरी कारवाई रायली ओनियनस या दुकान गाळ्यावर करण्यात आली आहे. विनायक ट्रेडर्स या कांदा व्यापाऱ्याने शेतकऱ्यांची अडीच लाख रुपये रक्कम थकवली होती. रायली ओनियनस यांच्या दुकान गाळ्यात विनायक ट्रेडर्सचा संमतीने व्यापार सुरू होता. त्यामुळे रायली ओनियनस या. दुकान गाळ्यावर कारवाई करण्यात आली आहे.

#### नोटिसा देऊन दुकान गाळे केले सील

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांची देणी थकवणाऱ्या अडत व्यापाऱ्यांना यापूर्वीच तीन-तीन कारणे दाखवा नोटिसा बजावल्या होत्या. ३१ मे पर्यंत शेतकऱ्यांची देणी देण्यासाठी मुदत दिली होती. त्यानंतर देखील संबंधित व्यापाऱ्याऱ्यांनी मुदतीत रकमा अदा केल्या नाहीत. त्यामुळे दुकान गाळे सील करण्यात आले आणि त्यांचा ताबा बाजार समितीने स्वत:कडे घेतला आहे.

**- अतुलसिंह राजपूत, प्रभारी सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर.**

# बाजार समितीच्या प्रभारी सचिवपदी अतुलसिंह रजपूत

### बाजार समितीत नवा गडी नवे राज्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

सोलापूर बाजार समितीत नवा गडी नवे राज्य सुरू झाले आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रिक्त झालेल्या सचिव पदावर प्रभारी अतुलसिंह रजपूत सचिव नियुक्त करण्यात आला आहे. समिती प्रशासनात कनिष्ठ लिपिक पदावर कार्यरत असलेले अतुलसिंह रजपूत यांची प्रभारी सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दत्तात्रेय सूर्यवंशी यांच्या निवृतीमुळे हे पद रिक्त झाले होते.



दरम्यान, बाजार समितीचे पंचवार्षिक निवडणूक संपन्न झाली. या निवडणुकीत दिलीप माने यांच्या पॅनलने पुन्हा एकदा विजयश्री खेचून आणत, बाजार समिती प्रशासनावर आपला दबदबा कायम ठेवला आहे. मात्र त्यानंतर बाजार समितीच्या सचिव पदावर कोणाची वर्णी लागणार याबाबत काही दिवसांपासून चर्चा सुरू होती. ३६०० कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल असणाऱ्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिव पदासाठी कर्मचाऱ्यांमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू होती. पडद्याआडून यासाठी बरेच प्रयत्न करण्यात आले. संचालक मंडळाने सचिव पदाच्या निवडीसाठीचे सर्वाधिकार बाजार समितीचे सभापती दिलीप माने यांना दिले होते. त्यांनी रजपूत यांची निवड केली आहे. रजपूत हे प्रशासकीय कामकाजात निपुण असल्याची चर्चा आहे. मात्र कनिष्ठ लिपिक पदावर कार्यरत असतानाही त्यांची निवड केल्यामुळे सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. निवड करताना सेवा ज्येष्ठता डावलल्याची चर्चा आहे.



### कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी चंदनशिवे यांनी घेतली विधानसभा उपाध्यक्ष बनसोडे यांची भेट

**सोलापूर, दि. ४ जून-**

महानगरपालिकेच्या बदली व रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे व महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी घेतली भेट घेतली.

दोघांनी पुढाकार घेऊन गेल्या २० ते २५ वर्षे बदली व रोजंदारी कामगार न्याय मिळवून द्यावा ही मागणी या निवेदनाद्वारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी केली. तसेच सोलापूर शहरातील विविध विषयासंदर्भात यावेळी चर्चा करण्यात आली. हे सर्व विषय मार्गी लावण्या संदर्भात त्यांनी आदेश दिले. यावेळी माजी नगरसेवक गणेश पुजारी, उद्योजक तुकाराम गायकवाड, शशिकांत टाकळीकर, प्रा. अविनाश शिंदे, आरोग्य निरीक्षक धीरज वाघमोडे आदी उपस्थित होते.

# सोलापूर विद्यापीठात ५ लाख वृक्ष लागवडीचा संकल्प

### कुलगुरू डॉ. महानवर यांनी वाढदिवसानिमित्त 300 फळझाडांची केली लागवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सहकाऱ्यांसमवेत विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात २५ हजार रुपयांची ३०० फळझाडांची लागवड केली. त्यांच्या ५ वर्षाच्या कार्यकाळात ५ लाख वृक्ष लागवड करण्याचा संकल्प त्यांनी केला आहे. आतापर्यंत विद्यापीठ परिसरात ६० हजारहून अधिक विविध झाडांची लागवड करण्यात आली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त २५ हजार रुपयांची पाच ते सहा फूट उंचीची ३०० फळझाडे खरेदी करून त्या झाडांची विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात लागवड केली. यामध्ये प्रामुख्याने केशर आंबा, जांभूळ, नारळ, चिकू या झाडांचा समावेश आहे. वृक्षारोपण करण्याबरोबरच वृक्ष संवर्धन करण्यासाठी देखील विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने आवश्यक ती काळजी घेण्यात येत आहे. बुधवारी या ३०० फळझाडांची लागवड करण्यात आली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, वित्त व लेखाधिकारी महादेव खराडे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुनील थोरात यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. महानवर म्हणाले की, आधुनिकीकरणामुळे वातावरणात फार मोठे बदल होत आहे. तापमानात मोठी वाढ होत आहे. मोफत मिळणाऱ्या ऑक्सिजनसाठी मोठ्या प्रमाणात आज वृक्ष लागवड व संवर्धन करणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात पाच वर्षाच्या कार्यकाळात पाच लाख वृक्षलागवड करण्याचा संकल्प केला आहे. यासाठी विद्यापीठास सर्व स्तरातून सहकार्य मिळत आहे.



# तांत्रिक अडचणीमुळे टेट परीक्षेचे प्रश्न पुन्हा सोडवण्याची वेळ

### अनेक विवाहित महिला परीक्षेपासून वंचित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेच्या वतीने शिक्षक पदासाठी आयबीपीएस कंपनीच्या माध्यमातून शिक्षक पात्रता परीक्षा (टेट) घेण्यात येत आहे. राज्यातील अनेक ऑनलाईन परीक्षा केंद्रावर सकाळच्या सत्रात तीन वेळा सिस्टमच बंद पडली. सिस्टम सुरू झाल्यानंतर परीक्षार्थींना सोडविलेले प्रश्न पुन्हा सोडवावे लागले. त्यामुळे त्यांचा बराच वेळ वाया गेल्याची तक्रार परीक्षार्थींनी केली.

अनेक जिल्हात १४० पेक्षा अधिक विवाहितांकडे विवाह प्रमाणपत्र नसल्यामुळे परीक्षा देण्यापासून वंचित ठेवण्यात आल्याची तक्रारही परीक्षार्थींनी दिली. राज्यात अनेक विभागाची परीक्षा घेतली जाते. पण सर्व परिक्षाचे वेळ आणि गुणांचा विचार करून प्रश्नांची संख्या ठरवली जाते. पण याठिकाणी मात्र परिक्षांचे स्ट्रेथ कठीण पातळी अवघड आणि वेळ कमी आहे. २०० प्रश्न सोडवण्यासाठी १२० मिनिट आहेत. तसेच संगणकांचे स्क्रीनवर सुद्धा प्रश्न निट नसल्यामुळे उत्तर सोडवणे अवघड जात होते. याचा परिणाम उमेदवारांच्या निकालावर होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातून जवळपास १२ हजार पेक्षा जास्त उमेदवार शिक्षक अभियोग्यता परीक्षा दिली. जिल्ह्यातील जवळपास ८ हजार पेक्षा जास्त उमेदवारांच्या परीक्षा हे त्यांनी निवडलेल्या जिल्हा सोडून मराठवाडा, विदर्भ या ठिकाणी असलेल्या परीक्षा केंद्रावर झाली. यावेळी हजारो उमेदवारांचे मानसिक व आर्थिक शोषण होऊन धावपळ झाली.

#### सोडविलेले प्रश्न पुन्हा सोडवले

तीन वर्षानंतर परीक्षा होत असल्याने खूप आशा आहेत. परंतु, चांगली तयारी करूनदेखील तांत्रिक अडचणींमुळे पेपर पूर्ण सोडविता आला नाही. अचानक संगणक बंद झाले. पुन्हा सुरू झाल्यावर सोडविलेले काही प्रश्न पुन्हा सोडवावे लागले. त्यात वेळ गेला.

**- विनोद बनसोडे, अभियोग्यताधारक**

#### मागितले सोलापूर, मिळाले बीड

मी शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमापन चाचणी परीक्षा सोलापूर केंद्र मागितले असताना माझी परीक्षा बीडमध्ये पार पडली. या सेंटरमध्ये पाण्याची व बसण्याची व्यवस्था नव्हती. तांत्रिक अडचणीमुळे प्रश्नाचे उत्तर सोडवताना वेळोवेळी संगणकामध्ये खंड पडत होता. त्यामुळे पुढील वेळेचेही नियोजन करता आला नाही.

**- सोमनिंग कमळे, अभियोग्यताधारक, भंडारकवठे**



### आवसे वस्ती आंबराईत श्रामनेरी शिबिर सुरु

**सोलापूर, दि. ४ जून-**

आवसे वस्ती आंबराई येथे सिद्धार्थ तालीम संघ संचालित सिद्धार्थ बुद्ध विहार माता रमई भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने १० दिवसीय श्रामनेरी शिबीर सुरू झाले.

आयुक्त कार्यालयातील गुन्हे शाखेच्या डॉ दिपाली काळे यांनी शिबिरास भेट देऊन यांनी व्याख्यान दिले. त्यानंतर पुज्य भिकुनी धम्म चारीनी थेरी, भिकुनी आर्य सोमना थेरी (गुलबर्गा), श्रामनेरी अशिष्टमती भिकू संघाचा आशीर्वाद घेतला. यावेळी आकाश गायकवाड, नरेश सोनवणे, शांतीसागर वाघमारे, अजय नागमोडे, तम्मा खानापुरे, विश्वजीत कसबे, उदय वाघमारे, जॉन शिखरे, आनंद गायकवाड, स्वप्निल सुरवसे, महेंद्र गायकवाड, रवी जौजेट, धनु बगाळे, योगेश सोनवणे, अमोल वाघमारे, बापू रणदिवे, शितल खळसोडे, गौतम दंदाडे, गणेश लोंढे, ओम भडंगे, अक्षय नडगम, विकास खसुळडे, कृष्णा कांबळे, क्षितिज खडसुळे, जयश्री वाघमारे, चंदनबाई सोनवणे, अर्चना वाघमारे, शांताबाई खरसुडे, बाळाबाई गाडे, पार्वती कांबळे उपस्थित होते.

# अतिक्रमण कारवाईनंतर ७० फूट रोड झाला मोकळा

### अतिक्रमण न होण्यासाठी परिसरात पोलिस बंदोबस्त

### भाजीविक्रेते गायब; ना रस्त्यावर, ना मंडईत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

महापालिका प्रशासनाने कोट्यवधी रुपये खर्चुन चिप्पा भाजी मंडई उभारली. तरी भाजीविक्रेते अतिक्रमण करून रस्त्यावर बसत असल्याने वाहतुकीला मोठा अडथळा ठरत होता. यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी महापालिका भाजीविक्रेत्यांना मंडईत बसविण्याचे आवाहन करीत रस्त्यावरील अतिक्रमण काढले. त्यामुळे अनेक वर्षांनंतर ७० फूट रस्त्याने मोकळा श्वास घेतला. येथील भाजीविक्रेते मात्र गायब झालेले दिसून आले. ते ना ७० फूट रस्त्यावर दिसले ना मंडईत.





**सोलापूरः ७० रोडवरील अतिक्रमण महापालिका प्रशासनाने हटवल्यानंतर या रस्त्यावर बुधवारी पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता. तर दुसऱ्या छायाचित्रात चिप्पा मार्केट ओस पडलेले दिसून आले.**

महापालिकेच्या १३ अधिकृत मंडई आहेत. परंतु शहरात २७ ठिकाणी भाजीमंडई भरते. कस्तुरबा मार्केट वगळता महापालिकेच्या सर्वच मंडई ओस पडल्या आहेत. ७० फूट येथील चिप्पा मार्केट नव्याने बांधण्यात आले. अत्यंत सुसज्ज मंडई २० वर्षांपासून धूळखात पडून आहे. त्यामुळे हा परिसर तळीरामाचा अड्डा बनला आहे. प्रशासनाने अनेकवेळा भाजीविक्रेत्यांना मंडईत बसण्याची विनंती केली. अनेकवेळा कारवाईही झाली. तरीही विक्रेते रस्त्यावर अतिक्रमण करून मंडई बाटतात, यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी महापालिका प्रशासनाने ७० फूट रोडवरील अतिक्रमण काढून रस्ता मोकळा केला. भाजीविक्रेत्यांनी पुन्हा अतिक्रमण करून नये, यासाठी दिवसभर अतिक्रमण विभागाचे वाहन व पोलिस बंदोबस्त लावण्यात आला. त्यामुळे भाजीविक्रेते रस्त्यावर फिरकलेच नाही. मात्र ते मंडईतही बसले नाहीत. मंगळवारी व बुधवारी या परिसरातील भाजीमंडई गायबच होती. या कारवाईनंतर प्रथमच ७० फूट रोडवरून दिवसभर विनाअडथळा वाहतूक सुरू होती.

#### सत्तर फूट भाजी मंडई चांगल्या स्थितीत

सत्तर फूट भाजी मंडई चांगल्या स्थितीतील आहे. येथील दिवे फोडली गेली आहेत, त्यांची दुरुस्ती करून लवकरच सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, व्यापाऱ्यांसाठी, पार्किंगसाठी मोठी जागा आहे. ही जागा वापरात आणणे ही काळाची गरज आहे. या मार्गावरील रहदारी वाढली आहे. तसेच रस्त्यावरील अतिक्रमणही वाढत आहे. यातून एखादा अपघात झाल्यास याला जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित होतो.

## महत्वाचे...



## इर्लेवाडीत कृषी संकल्प अभियानातून संवाद

**वैराग, दि. ४ जून-**

बार्शी तालुक्यातील इर्लेवाडी येथे बुधवारी विकसित कृषी संकल्प अभियान २०२५ अंतर्गत कृषी क्षेत्रातील शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. कृषी विज्ञान केंद्राचे मृदा शास्त्रज्ञ डॉ.ताकटे यांनी मातीचे आरोग्य सांभाळण्यासाठी सेंद्रिय शेतीचा अवलंब करावा असे सांगितले. तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले यांनी कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शासनाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली. कृषी विज्ञान केंद्र सोलापूरचे वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ. तांबडे यांनी पीकांवर येणाऱ्या विविध रोगांची माहिती दिली. आत्मा प्रकल्प संचालक डॉ. खोत यांनी त्यांच्या विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. नम्रता गिरी, आत्मा बार्शीचे कल्पक चाटी, इर्लेवाडीचे उपसरपंच पंकज सरकाळे, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक चापले व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन सुजित काकडे यांनी केले. शिवजयंतीनिमित्त मिरवणुकीचा खर्च टाळून सुरू केलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक वाचनालयास सर्व मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली व कौतुक केले.



## बार्शीतील होंडा शोरुमजवळ रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघाताचा धोका

**बार्शी, दि. ४ जून-**

बार्शी-लातूर रोडवरील साई होंडा शोरूमजवळील रस्ता सध्या अत्यंत खराब अवस्थेत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, वाहनचालकांना हे खड्डे चुकवताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. या खड्ड्यांमुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. अनेक दुचाकीस्वार आणि वाहनचालक रोज या रस्त्याने जातात. खड्डे टाळताना अनेकदा अपघाताचे प्रसंग ओढवतात. तरी सुद्धा प्रशासन मात्र गप्प असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी अनेक वेळा प्रशासनाकडे तक्रार केली असूनही रस्त्याची कोणतीही दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नागरिक व सामाजिक संघटनांनी दिला आहे. प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने पाहावे आणि लवकरात लवकर रस्ता दुरुस्त करून नागरिकांना दिलासा द्यावा, हीच सर्वांची मागणी आहे.



## पिलीव येथील महालक्ष्मी मंदिर परिसरात वृक्षारोपण

**पिलीव, दि. ४ जून-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील स्व. प्रा. जयंत बगाडे यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त महालक्ष्मी मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी महालक्ष्मी यात्रा कमीटीचे संचालक बाबुराव पाटील, कुंडलीक कपने यात्रा कमीटीचे चेअरमन आनंद पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका संघटक लहु पाटील, नितीन कपने, निशांत बगाडे, चेतन बगाडे, सागर बगाडे, महालक्ष्मी यात्रा कमीटीचे व्हा चेअरमन नवनाथ पाटील, सचिव सतिश मदने,बाळु मदने,अप्पा पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सुरुवातीला माजी जिल्हा परिषद सदस्य कुसुम बगाडे, निशांत बगाडे, चेतन बगाडे यांच्या हस्ते स्व. जयंत बगाडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



## मैंदर्गी येथील अतिक्रमण हटवण्याची मागणी; सकल हिंदू समाजाचे आमरण उपोषण

**सोलापूर, दि. ४ जून -**

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथे झालेल्या अतिक्रमण हटवणी कारवाईत प्रशासनाने पक्षपाती आणि अन्यायकारक पद्धतीने निवडक कारवाई केल्याचा आरोप सकल हिंदू समाजाने केला आहे. मटन मार्केट व गैरजमुळे मैंदर्गी गावात अस्वच्छता व दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे अतिक्रमण करून व्यवसाय थाटलेल्यांवर कारवाई करण्याची मागणी मैंदर्गी येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. अतिक्रमण हटविण्यासाठी जिल्हा परीषदेसमोर उपोषण सुरू करण्यात आला असून आंदोलकांपैकी अनेकांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले. या संदर्भात सकल हिंदू समाजाच्या वतीने दिनांक १६ डिसेंबर २०२४, २९ जानेवारी २०२५, २८ एप्रिल २०२५ व २३ मे २०२५ रोजी सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदने देण्यात आली होती. मात्र आजतागायत प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आले नाही. त्यामुळे मैंदर्गी गावामध्ये अनधिकृत बोर्ड , व्यापारी गाळे व गैरजचे अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी दि.२ जून पासून सकल हिंदू समाजाच्यावतीने शांततामय व संविधानिक मार्गाने आमरण उपोषण सुरू करण्यात आला आहे.

# पेरणी कालावधीत बियाणे व खतांची टंचाई

### कृषी विभागाकडून कारवाईची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीची तयारी करीत असताना बियाणे व रासायनिक खत विक्रेत्यांकडून कृत्रिम टंचाई करून शेतकऱ्यांना लुबाडण्याचा प्रकार सुरू आहे. शेतकऱ्यांची बियाणे व खते मिळत नसल्याबद्दल ओरड सुरू असताना कृषी विभागाकडून कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. कृषी विभागाने दुकानांची तपासणी करून कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

यावर्षी मे महिन्यातच अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांकडून पेरणीची घाई करण्यात येत आहे. अवकाळी पावसानंतर रोहीणी नक्षत्राचे आगमन झाल्याने खरीप हंगाम तील उडीद, तूर, मूग, मटकी, बाजरी, सोयाबीन, मका यासारख्या पिकांच्या पेरणीची लगबग सूरू आहे. उडीद पिकांसाठी अधिक उत्पन्नाच्या वाणाची मागणी असताना टंचाई दाखवून अधिक पैसे उकळण्यात येत आहे. शिवाय वेळेवर बियाणे मिळत नसल्याने शेतकऱ्यांना वेळ वाया जात आहे.

रासायनिक खतांमध्ये पेरणीसाठी म गणी असलेला डीएपी सह इतर खतांचे लिंकींग व टंचाई दाखविण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पर्यायी खत वापरून पेरणी करावे लागत आहे. कृषी विभागाकडून प्रत्येक महिन्याला खत दुकानांची तपासणी करण्यात येत असताना खतांची टंचाई कशी दिसून आली नाही, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. शिवाय आठ दिवसांपूर्वी कृषी विभागाकडून बियाणे व खतांच्या उपलब्धतेबद्दल माहिती देऊन बियाणे व खतांच्या बाबतीत टंचाई असेल तर तक्रार करण्यास सांगितला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या तक्रारीची दखल घेऊन कृषी विभाग खत दुकानदारांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. शिवाय पेरणी काळात बियाणे व खतांची टंचाई होणार नाही, यासाठी कृषी विभागातील कर्मचाऱ्यांची पथक नेमण्याची मागणी होत आहे.

> **दुकानदारांकडून डीएपी व उडीद बियाणे टंचाई**
>
> सध्या खरीप हंगामातील उडीद , तुर, मटकी, मूग, सोयाबीन यासह इतर पिकांची पेरणी सुरू आहे. पेरणी काळात अधिक उत्पन्नाचे उडीद व रासायनिक खतामध्ये डीएपी मागणी केल्यानंतर खत दुकानदारांकडून टंचाई असल्याचे सांगण्यात येत आहे. कृषी विभागाने दुकानांची तपासणी करून खतांची टंचाई करणाऱ्या दुकानदारांवर कारवाइ करावे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक लुबाडणूक थांबण्यास मदत होइल. दुकानदारांकडून कृत्रिम टंचाई सुरू आहे.
>
> **- बक्षुभाइ मुल्ला, माजी सरपंच, मंद्रूप**

> **दुकानदारांवर कारवाई करणार**
>
> खरीप हंगामातील पेरणी सुरू आहे. यावेळी शेतकऱ्यांना बियाणे व खतांची टंचाई जाणवणार नाही, याची दक्षता खत दुकानदारांनी घेणे बंधनकारक आहे. शिवाय बियाणे व खतांच्या टंचाई बद्दल तक्रार असल्यास शेतकऱ्यांनी कृषी विभागाशी संपर्क साधावे. तक्रार असलेल्या दुकानदारावर कारवाई करण्यात येइल.
>
> **-अवधूत मुळे, तालुका कृषी अधिकारी, दक्षिण सोलापूर**



## मोडनिंब येथे १२७ दाखल्यांचे वाटप

### महसूल विभागाच्या उपक्रमाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.४ जून-**

मोडनिंब येथे माढा तहसीलच्यावतीने राबविण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानात १२७ दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले सर्व प्रकारचे दाखले त्वरित उपलब्ध करून देण्यासाठी महसूल विभाग कटिबद्ध आहे. महाराष्ट्र शासनाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक दाखले वाटप शिबिराचा लाभ सर्वसामान्यांनी घ्यावा, असे आवाहन मोडनिंब मंडळ महसूल अधिकारी बिभिषण वागज यांनी केले. नागरिकांना विविध दाखल्यांचे वाटप जागेवरच करण्यात येत असल्याने तसेच नागरिकांच्या वेळेची बचत होत आहे, त्यामुळे लाभार्थ्यांकडून समाधान व्यक्त होत आहे. या शिबिरात एकूण १२७ दाखले प्रमाणपत्राचे व शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले. यावेळी मोडनिंब मंडळ महसूल अधिकारी बिभिषण वागज, माजी सभापती भारत शिंदे, मंडळ कृषी अधिकारी गायत्री चव्हाण, विजय जाधव, कृषी पर्यवेक्षक दादासाहेब पवार, संतोष सुर्वे, उपसरपंच अमित कोळी, कैलास तोडकरी, नागनाथ ओहोळ, बाबुराव सुर्वे, ग्रामपंचायत सदस्य अमर ओहोळ, शिवाजी सुर्वे, विजय गिड्डे, संजीव शिंदे, शिवसेना नेते दीपक सुर्वे आदी उपस्थित होते. यावेळी छत्रपती शिवाजी म हाराज महाराजस्व अभियान शिबिरात राजू साधू नाईक यांचा वैद्यकीय उपचारासाठी उत्पन्नाचा दाखला तहसीलदार माढा यांच्याकडून १० ते १५ मिनिटात उपलब्ध करून दिला. त्यांनी आयोजकांचे आभार मानले. शिबिर पार पाडण्यासाठी मोडनिंब मंडलचे मंडलाधिकारी बिभिषण वागज, ग्राम महसूल अधिकारी मोहशीन हेड्डे, शिवाजी इंगोले, उमेश बनसोडे, शितल अवताडे व सर्व महा-ई-सेवा केंद्रसंचालक व ग्राम महसूल सेवक यांनी परिश्रम घेतले.

## करमाळ्यात अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.४ जून-**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त सकल धनगर समाज करमाळा तालुक्याच्या वतीने तुळशीवृंदावन देवीचारोड येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन, व चौंडी येथे जाणाऱ्या अनुयायांस दिवसभर नाष्टा आणि थंड पाणी वाटण्यात आले. यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन स्मिताताई शिंदे, वर्षाताई बंडगर, अहिल्या शिंदे, पूर्वा शिंदे, आम दार गोपीचंद पडळकर, मकाई सह.सा. कारखान्याचे चेअरमन दिग्विजय बागल, पी.आय रणजित माने, मनसेचे संजय घोलप, सुनील बापू सावंत, राष्ट्रवादीचे ता. अध्यक्ष संतोष वारे, हनुमंत मांढरे, मा.नगरसेवक सचिन घोलप, अतुल फंड, महादेव फंड, विनय ननवरे, सामाजिक कार्यकर्ते विजयभाऊ लावंड, कमाईचे संचालक अमोल यादव,आरपीआयचे अध्यक्ष अर्जुन गाडे, माजी सभापती शिवाजीराव बंडगर, पंचायत समिती चे सभापती अतुल पाटील,अ.स.सा. का.संचालक देवानंद बागल,नामदेव गायकवाड, जितेश कांबळे, सुहास ओहोळ, पत्रकार जयंत दळवी, विशाल घोलप, टीव्ही९चे पत्रकार शितलकुमार मोटे, हर्षवर्धन गाडे, सिध्दार्थ वाघमारे, विशाल परदेशी, गजानन ननवरे, जेऊर लोकनियुक्त सरपंच पृथ्वीराज पाटील, कुमार पलंगे, पत्रकार उज्वलकुमार माने, डॉ. अभिमन्यू टकले, दादा कोकरे, नरेंद्रसिंह ठाकूर, डॉ. श्रीराम परदेशी, भाजपाचे नेते दिपक चव्हाण, भरत आवताडे, अश्पाक जमादार, शहाजी ठोसर,सचिन गायकवाड,नाथाजी शिंदे,पोथरे सरपंच अंकुश शिंदे, डॉ. अशोक शेळके, विठ्ठल शिंदे, तात्या काळे, सतिश मोटे, महादेव वायकुळे, भागवत वाघमोडे रामदास कांबळे, चंद्रहास चोरमले, दत्तात्रय जाधव, बाळासाहेब वाघमोडे, संदीप मारकड,विक्रम घायतोंडे, मल्हारी मारकड, विजयकुमार सोलंनकर, सतिश रूपनवर, इंजि.हर्षल कोळेकर, सुरेश नाना शिंदे, नितीन मासाळ उपस्थित होते. यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिमा पूजन संपन्न झाले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रविण होगले, विनोद महानवर, बाळासाहेब टकले, अंगद देवकते, इंजि. शुभम बंडगर, बापू शिरगीरे, सुशील नस्टे,राहुल चोरमले,किरण केसकर,भिवा वाघमोडे, विकास मेरगळ, बाबासाहेब चौगुले,आशिष बंडगर ,विष्णू वाघमोडे,भिवा वाघमोडे, माऊली सलगर, विशाल पाडसे,विकी शिंदे,पप्पू चोरमले,अण्णा सुपनर, चंद्रहास चोरमले, संदीप मारकड, बाळासाहेब मोटे, सतीश नस्टे,किशोर शिंदे सह इत्यादींनी परिश्रम घेतले. यावेळी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या इतिहासातील कार्याविषयी आमदार गोपीचंद पडळकर, दिग्विजय बागल, प्रा. शिवाजीराव बंडगर, सुनील बापू सावंत, संजय घोलप, संतोष वारे, अर्जुन गाडे आदींनी मनोगत व्यक्त केले.

## सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील यांची चिंचणी पर्यटन केंद्रास सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ जून-**

सातारा जिल्ह्यातून विस्थापनानंतर अनेक अडचणींवर मात करत चिंचणीकरांनी ग्रामीण कृषी पर्यटन केंद्राची निर्मिती करून गावातच रोजगार निर्माण केला असून या पर्यटन केंद्राला भेट देण्यासाठी सातारा जिल्ह्यातील मधाचे गाव मांगर या गावातील लोकांची सहल काढून चिंचणीचे मॉडेल राबवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले.



> २७ सप्टेंबर या जागतिक पर्यटन दिनानिमित्त सोलापूर जिल्ह्यामध्ये धार्मिक पर्यटनासह कृषी पर्यटन केंद्राला चालना देण्यासाठी आमदार सुभाष (बापू) देशमुख यांनी कलम सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील यांची भेट घेऊन त्यांना लोकसहभाग लोकवर्गणी व शासन निधी यामधून सुरू असलेल्या चिंचणी पर्यटन केंद्राला भेट देण्याबाबत निमंत्रण दिले होते आणि आज जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी लागलीच भेट दिली. याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन २०२४ धोरणा नुसार भविष्यात पर्यटन क्षेत्रामध्ये खूप संधी असून या संधीचा लाभ घेणे आवश्यक आहे. चिंचणीकरांनी सुरू केलेले एकात्मिक पर्यटन हे राज्य शासनाच्या एकात्मि क पर्यटन धोरणाचा भाग असून हे पर्यटन केंद्र नाविन्यपूर्ण आहे. सातारा जिल्ह्यातून धार्मिक पर्यटनासाठी पंढरपूर अक्कलकोट तुळजापूर इत्यादी ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना चिंचणी ग्रामीण कृषि पर्यटन केंद्राशी जोडून या पर्यटन केंद्राला चलना देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही सांगितले. यावेळी त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी सौ.पाटीलयाही उपस्थित होत्या. चिंचणी गावातील वृक्ष लागवड व संगोपनाचे त्यांनी कौतुक केले. यावेळी चिंचणी येथील मोहन अनपट, शरद सावंत, सूर्यकांत जाधव ज्ञानेश्वर सावंत, शिवाजी अनपट, रवींद्र जाधव शेखर सावंत सविता सावंत, वैशाली सावंत, मयुरी कापसे, निता सावंत, कमल घोरपडे, आशा पवार, शोभा सावंत, यास्मिन शेख इत्यादी महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

## करमाळ्याच्या विद्या विकास मंडळाला राज्यस्तरीय आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ४ जून-**

करमाळा येथील विद्या विकास मंडळ संस्थेला कोल्हापूरमध्ये झालेल्या राज्यस्तरीय शिक्षक मेळाव्यात राज्याचे कुटुंब कल्याण आरोग्यमंत्री तथा कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, हातकणंगलेचे खासदार धैर्यशील माने, खासदार धनंजय म हाडिक, नियोजन मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर, भास्कर महाराज या मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार प्रदान करण्यात आला. एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने हा पुरस्कार व शिक्षक मेळावा संपन्न झाला.



हा पुरस्कार या महाविद्यालयास गुणवत्ता, कार्यपद्धतीवर आधारित प्रदान करण्यात आला. महाराष्ट्रातील ४० संस्थांना हा पुरस्कार देण्यात आला. यामध्ये विद्या विकास मंडळ, करमाळा या संस्थेचाही सम वेश होता. या संस्थेतर्फे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,करमाळा हे अनुदानित उच्च माध्यमिक व महाविद्यालय चालवले जाते. महाविद्यालयातील एन.सी.सी. व एन.एस.एसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजाची व देशाची सेवा करण्याचे बाळकडू दिले जाते. त्यामुळे या संस्थेचा समावेश पुरस्कारामध्ये होता. हा पुरस्कार संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड व संस्थेचे सदस्य यांच्यावतीने संस्थेचे विश्वस्त कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक व राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. लक्ष्मण राख यांनी स्वीकारला. या कार्यक्रमाला शिवसेनेचे सोलापूर जिल्हाप्रमुख मनीष काळजे, प्रमुख प्रेरणादायी व्याख्याते गणेश शिंदे, उपमुख्यमंत्री आरोग्य कक्षाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष मंगेश चिवटे, एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे राज्य अध्यक्ष डॉ. बापूसाहेब आडसूळ, पंढरपूरचे वासकर म हाराज यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाचे संयोजन गणेश चिवटे व एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे राज्यस्तरीय अध्यक्ष प्रा.डॉ. बापूसाहेब आडसूळ यांनी केले होते. या मिळालेल्या आदर्श पुरस्काराबद्दल विद्या विकास मंडळाचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# कोळगाव परिसरातील वीजप्रश्न पालकमंत्री गोरेंमुळे मार्गी

### गणेश चिवटे; नविन ब्रेकरचे झाले पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.४ जून-**

कोळगाव सब स्टेशन वर आधारित पाच ते सहा गावातील शेतकऱ्यांचा गेली अनेक दिवसांपासून प्रलंबित लाईटचा प्रश्न आता मार्गी लागला आहे, कोळगाव सब स्टेशन वरील आधारित शेतकऱ्यांनी भाजपा नेते गणेश चिवटे यांच्याकडे लाईट विषयासंदर्भात तक्रार केली होती यावेळी गणेश चिवटे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे पाठपुरावा केला यावर लगेच पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विशेष लक्ष देऊन



या कोळगाव स्टेशन आवश्यक असणाऱ्या दोन ब्रेकरची व्यवस्था केली आहे. त्यामुळे या भागातील गावांना अपुऱ्या दाबाने होत असलेला वीस पुरवठा आता पूर्ण दाबाने आठ तास सुरळीत होण्यासाठी मदत होणार आहे. या नवीन ब्रेकरचे पूजन भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांच्या हस्ते करण्यात आले,

यावेळी गणेश चिवटे म्हणाले की कोळगाव सब स्टेशनचा गेली अनेक दिवसांपासूनचा हा प्रश्न पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विशेष लक्ष देऊन मार्गी लावला आहे लवकरच ते या सबस्टेशनवर ३ घत ऐवजी ५ घतचा ट्रान्सफॉर्मर मंजूर करून या सबस्टेशनचा कायमस्वरूपी चा विजेचा प्रश्न मार्गी लावतील तसेच या भागातील रस्ते व इतर कामेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून आपण मार्गी लावू असे मत यावेळी गणेश चिवटे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रम प्रसंगी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अफसर जाधव, रामभाऊ ढाणे, तालुकाध्यक्ष काकासाहेब सरडे, कोळगावचे सरपंच तात्यासाहेब शिंदे, गौंडरेचे सरपंच सुभाष हनपुडे, हिसरे गावचे सरपंच नवनाथ जगदाळे, वंचित बहूजन आघाडीचे नेते सुभाष ओहोळ, श्रीमंत पाटील, गणेश महाडीक, नाना अनारसे,वैजिनाथ चव्हाण, भाऊ चव्हाण, अजय डोले, विशाल घाडगे, रावसाहेब पाटील, दत्ता विटुकडे, ओमकार पुजारी ,नाना पुजारी, भागवत पाटील, पै. विजय विटुकडे, पै. हनुमत पाटील, गणेश रोकडे, ज्ञानेश्वर बिचीतकर ,अक्षय हनपुडे, सम धान शिंदे, अतुल चेंडगे, चरण चेंडगे, हनुमत आतकरे, सुनील जगदाळे, तात्या जगदाळे, उमेश जगदाळे, सौरभ जगदाळे, रामा कराडे, सिध्देश्वर जगदाळे, भिम राव जगदाळे, दत्ता ठोंबरे, संतोष जगदाळे, आत्माराम खडके, वैभव खडके, युवराज पाटील, आबा पाटील, नितीन शिंदे, मि लिंद रोकडे, गणेश रोकडे, दया चेंडगे, समाधान शिंदे, बालाजी गोरे, निखिल वीर, श्रीमंत मोरे, पिंटू निंभोरकर, सचिन माने, हनुमंत अतकरे, अभी शिंदे, राजाराम हराळे, चरण शिंदे, परशुराम शिंदे आदी शेतकरी उपस्थित होते,

> कोळगाव सब स्टेशन वर आधारित आमच्या पाच ते सहा गावांचा विजेचा प्रश्न प्रलंबित होता आम्ही गेल्या अनेक दिवसांपासून तालुक्यातील लोक प्रतिनिधी व अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला परंतु हे काम मार्गी लागले नाही, पण गणेश चिवटे यांनी पालकमंत्र्यांकडे पाठपुरावा करून हे काम मार्गी लावले.
>
> **-सुभाष हनपुडे- सरपंच गौंडरे**

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## देगाव येथे आज श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर यांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.४ जून-**

देगाव येथील श्रीराम मंदिरात गुरूवारी सकाळी दहा ते बारा या वेळेत जगदगुरू श्रीसंत तुकाराम महाराजांचे विद्यमान वंशज श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर यांचे हरिकीर्तन होणार आहे.

येथील वै. हभप प्रल्हाद महाराज शिंदे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त श्रीराम मंदिरात श्रीमद भागवत कथा व नामसंकिर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर येथील हभप म



हेश महाराज भांदर्गे यांच्या अमृतवाणीतील भागवतकथा येथे झाली. तर दररोज हभप मंगेश महाराज कोरे (देगाव), एकनाथ महाराज जाधव(माहुरगड), ज्ञानेश्वर महाराज जाधव (जालना), माऊली महाराज बचुटे(सोलापूर), शिवाजी महाराज बिराजदार (बिदर), महेश महाराज बांदर्गे (लातूर) यांची किर्तनसेवा झाली. गुरूवारी सकाळी दहा वाजता गुलालाचे हरिकिर्तन श्रीगुरू कान्होबा महाराजांचे होणार आहे. तर रात्रीचे कीर्तन चिदानंद महाराज काळजे(देगाव) यांचे होणार आहे. या नामसप्ताहाचा समारोप शुक्रवारी दि. ६ जून रोजी सकाळी १० वाजता जगदगुरू श्रीसंत तुकाराम महाराजांचे विद्यमान वंशज श्रीगुरू बाळासाहेब महाराज देहूकर यांचे काल्याच्या किर्तनाने होणार आहे. समस्त शिंदे मित्र परिवार व श्रीराम भजनी मंडळाचे सहकार्य यासाठी लाभत आहे.

### महत्वाचे...



## बार्शी तालुक्यातील नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे करा : खा. निंबाळकर

**बार्शी, दि. ४ जून-**

सोलापूर जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने सरासरीपेक्षा अधिक हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विशेषतः बार्शी तालुक्यातील परिसरातील शेतकरी या संकटाला सामोरे जात आहेत. पांगरी, घारी, जामगाव या गावांतील शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन नुकसानीची खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. शेतकरी भगवान खबाले यांच्या रब्बी हंगामातील टरबुज पिकाचे ६० आर क्षेत्रावरील नुकसान झाले आहे. दत्तात्रय शिंदे यांच्या खरबुज पिकाचे ४० आर क्षेत्र तर कुसुम शिवाजी चित्राव यांच्या कांदा पिकाचे ६० आर क्षेत्र पावसामुळे नुकसानग्रस्त झाले आहे. ही पाहणी बार्शी तहसीलदार एफ. आर. शेख, तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले, तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक यांच्या उपस्थितीत पार पडली. नुकसानग्रस्त क्षेत्रांमध्ये तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी दिल्या. यावेळी माजी तालुका प्रमुख प्रविण काकडे, माजी शहर प्रमुख सचिन चव्हाण, माजी शिवसेना उपतालुका प्रमुख अरविंद पाटील, पांडुरंग गपाट, शिवसेना तालुका उपप्रमुख बाबा शिंदे, राजाभाऊ पाटील उपस्थित होते.



## महूद येथील महेंद्र महाजन नदी प्रहरी पुरस्काराने सन्मानित

**सांगोला,दि.४ जून-**

महूद (ता.सांगोला) येथील कासळगंगा फाउंडेशनचे महेंद्र महाजन यांना राजस्थान येथील तरुण भारत संघ या संस्थेच्या वतीने नदी प्रहरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. राजस्थान मधील अलवर जिल्ह्यातील ग्रामीण भागात तरुण भारत संघ ही स्वयंसेवी संस्था पर्यावरण क्षेत्रात काम करत आहे. सन १९७५ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेचे अध्यक्ष जलपुरुष डॉ.राजेंद्र सिंह हे आहेत. राजस्थान मधील ग्रामीण भागात जलसंरक्षण आणि जलप्रबंधन या क्षेत्रात या संस्थेने मोठे योगदान दिले आहे. या संस्थेचा सुवर्ण महोत्सवी कार्यक्रम नुकताच भीकमपुरा (जि.अलवर) येथे पार पडला. या कार्यक्रमात महेंद्र महाजन यांना डॉ.राजेंद्र सिंह यांच्याहस्ते नदी प्रहरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जलपुरुष डॉ.राजेंद्र सिंह यांचे मार्गदर्शनाखाली महेंद्र महाजन व त्यांच्या सहकाऱ्यांनी लोकसहभागातून कासाळगंगा फाउंडेशनच्या माध्यमातून सांगोला, पंढरपूर व माळशिरस तालुक्यातून वाहणाऱ्या आणि या परिसरातील २३ गावे-वाड्यांची अर्थवाहिनी असलेल्या कासाळगंगा नदीचे पुनर्जीवन करण्यात आले आहे. कासाळगंगा नदी चंद्रभागा नदीची उपनदी म्हणून साकारली आहे. या परिसरात जलसाखळी निर्माण करण्यात यश मिळवले आहे. लोकसहभागातून दुष्काळ आणि पूरमुक्तीचे छानसे मॉडेल तयार केले आहे. या कामाची दखल घेऊन केंद्र सरकारने यापूर्वीच महूदला नॅशनल वॉटर अवॉर्ड पुरस्काराने सन्मानित केले आहे. महेंद्र महाजन यांना नदी प्रहरी या पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



## खात्रीच्या रोपवाटिकेतूनच रोपांची खरेदी करणे उचित : डॉ. रायगुंड

**मोहोळ, दि.४ जून -**

मोहोळ तालुक्यातील सारोळे येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत कृषी विज्ञान केंद्र व राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.२ मे रोजी सारोळे येथे शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यात आला. या सुसंवाद भेटी दरम्यान डाळिंब पिकावरील सध्याच्या समस्या समजून घेणेसाठी मार्गदर्शन करण्यात आले. दरम्यान, सारोळे येथील कामराज चव्हाण यांच्या डाळिंब बागेची पाहणी शास्त्रज्ञ डॉ. पिंकी रायगुंड यांनी केली. डाळिंब पिकात सध्या मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे.यावर नियंत्रण मिळवण्यासाठी या रोगाचा प्रसार प्रामुख्याने रोगग्रस्त मातृ वृक्षापासून बनविलेल्या रोपाद्वारे होतो. त्यामुळे या रोगाचा प्रसार टाळण्यासाठी रोगमुक्त रोपांची लागवड करणे गरजेचे आहे.खात्रिशीर रोपवाटिकेतूनच रोपे खरेदी करून त्याची लागवड करावी.रोगट डागांवरून उडणाऱ्या पाण्याच्या थेंबातूनही या रोगाचा प्रसार होतो. त्यामुळे शक्यतो अनावश्यक रोगनाशक किटकनाशकाच्या किंवा मुख्य अन्नद्रव्याच्या फवारण्या टाळाव्यात. तेल्या, मुळकुजव्या रोगांच्या व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले.

# जिल्ह्यातील एक लाख १३ हजार लाभार्थ्यांचा सर्व्हेक्षण पूर्ण

### बेघरांना निवारा देण्याचा प्रयत्न

### ३६ हजार लाभार्थ्यांनी केली घरकुलाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रत्येक बेघराला घर देण्याचे स्वप्न आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षी टप्याटप्याने घरकुल मंजूर करून बेघरांना निवारा देण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाकडून पंतप्रधान आवास घरकुल योजनेसाठी फेब्रुवारी महिन्यात ६२ हजार ९०० लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी दहा हजाराहून अधिक लाभार्थ्यांना दुसरा हप्ता ७० रूपयांचे अनुदानही देण्यात आले आहे. उर्वरीत लाभार्थ्यांकडून पहिला हप्ता १५ हजार रूपये घेऊन घरकुल पायाभरणी करण्याचे काम सुरू आहे.

### ऑनलाईन सर्वेक्षण पूर्ण; छाननी बाकी

ऑनलाईन सर्व्हेक्षण पूर्ण झाला असून यातील लाभार्थ्यांनी जी माहिती भरली आहे ती योग्य आहे की, नाही याची तपासणी एआयच्या माध्यमातून कळणार आहे. त्यामुळे गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे. घरकुल सर्वेक्षणात लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांची संख्या अधिक आहे. अनुदानात वाढ झाल्यामुळे इच्छुकांची संख्या वाढली आहे. तपासणी झाल्यावर पुढील प्रक्रीया करण्यात येईल.

**-डॉ. सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा**



जिल्ह्यात घरकुल सर्वेक्षणात सर्वाधिक इच्छुक लाभार्थी अक्कलकोट तालुक्यात १५६८८ आहेत. तर सर्वात कमी उत्तर सोलापूर तालुक्यात ३६०० लाभार्थी आहेत . माळशिरस व बार्शी तालुक्यातही घरकुलसाठी अधिक इच्छुक लाभार्थी आहेत.

त्यामुळे जिल्ह्यात सर्वाधिक घरकुल मंजूर असताना दुसऱ्या टप्यासाठी सर्व्हे करण्याचे काम सुरू आहे.

जिल्ह्यात नवीन घरकुल मंजूर करण्यासाठी शासनाकडून ग्राम सेवकांमार्फत प्रत्येक गावात सर्व्हे करून ऑनलाईन माहिती घेण्यात आली. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील एक लाख १३ हजार लाभार्थ्यांचा सर्व्हे करण्यात आला आहे. या सर्व्हेमधील माहितीची उलटतपासणी ए आय च्या माध्यमातून केली जाणार आहे. त्यामुळे जो गरजू लाभार्थी आहे त्याला प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेचा लाभ मिळणार आहे. पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुलाचा सर्व्हेसाठी शासनाने ३१ मे रोजी अंतिम मुदत दिली होती. त्या अनुषगांने जिल्ह्यातील १ लाख १३ हजार ३९० लाभार्थ्यांचा सर्व्हे करण्यात आला आहे. ७६ हजार ८८५ ग्रामसेवकांनी सर्व्हे केला आहे. तर ३६ हजार ५०५ लाभार्थ्यांनी स्वतः घरकुलाची माहिती ॲपमध्ये भरून केला आहे. हा सर्व्हे काही ग्रामसेवकांनी केला आहे तर काही लाभार्थ्यांनी ॲप च्या माध्यमातून केला आहे. आता या सर्व्हे केलेल्या घरकुलाच्या लाभार्थ्यांची विस्तार अधिकारी यांच्या समकक्ष असलेल्याकडून तपासणी केली जाणार आहे. त्यासाठी ए आय च्या माध्यमातून देखील लाभार्थ्यांनी जी माहिती भरली आहे ती बरोबर आहे की, चुकीची भरली आहे हे कळणार आहे. संपूर्ण तपसाणी ऑनलाईन होणार आहे. त्यानंतर या सर्व्हे झालेल्या लाभार्थ्यांची नावे ग्राम सभेपुढे ठेवले जाणार आहे. ग्रामसभेची मान्यता घेतल्यानंतर पुढे प्रतिक्षा यादी लावली जाणार आहे. त्यामुळे सध्या राज्य सरकारकडून या पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुल योजनेचा दररोज आढावा घेण्यात येत आहे. शासनाने घरकुल लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ देखील केल्याने मागणी वाढली आहे.

### तालुकानिहाय झालेला सर्व्हेक्षण

- अक्कलकोट १५६८८
- माढा ९७४२
- मोहोळ ७२९८
- उत्तर सोलापूर ३६००
- बार्शी १०१३५
- माळशिरस १२७६२
- पंढरपूर ७२९८
- दक्षिण सोलापूर ७१०३
- करमाळा ६९६३
- मंगळवेढा ७११६
- सांगोला ९३५१

**एकूण १ लाख १३ हजार ३९०**



## आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी केली टेंभुर्णी स्टॅन्डच्या कामाची पाहणी

**टेंभुर्णी, दि.४ जून-**

सोलापूर जिल्ह्याचे विधान परिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या फंडातून सुरू असलेल्या टेंभूर्णी बसस्थानकाच्या कामाची पाहणी त्यांनी केली.

आमदार मोहिते-पाटील यांच्या फंडातून पंढरपूर तालुक्यातील करकंब, माढा तालुक्यातील टेंभुर्णी व करमाळा तालुक्यातील जेऊर येथे प्रत्येकी दोन-दोन कोटी याप्रमाणे ६ कोटी मंजूर केले होते. त्याच फंडातून सुरू असलेल्या टेंभुर्णी बसस्थानक येथील कामाची पाहणी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी केली. यावेळी टेंभुर्णीचे माजी सरपंच प्रमोद कुटे, युवा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख आदी उपस्थित

## मूकबधीर शाळेतील कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

### तीन दिवसांपासून आंदोलन सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

थकीत वेतनासह इतर अनेक लाभ मिळावे, यासाठी सांगोला तालुक्यातील मूकबधिर निवासी शाळेतील सहा कर्मचार्यांनी कुटुंबांसह गेल्या तीन दिवसापासून धरणे आंदोलनास सुरुवात केली आहे. मात्र, त्याकडे जिल्हा परिषदेचे समाजकल्याण विभाग दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने गेल्या पाच वर्षापासून वेतनासह इतर अनेक



लाभ दिले नाही. वेतनासह इतर लाभ थकल्याने कुटूंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे धरणे आंदोलनास सुरुवात केल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली आहे.

आंदोलनाच्या पहिल्या दिवशी समाजकल्याण विभागाचे कर्मचारी भेट देऊन मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, लेखी हमी न दिल्यामुळे धरणे आंदोलन सुरु ठेवल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी सांगितले. यावेळी वसंत पाटील, अनिल कांबळे, लक्ष्मण खरात, उमेश कोळेकर, दीपक गेजगे, शशिकांत गायकवाड उपस्थित होते.

### टक्केवारीसाठी वेतन थांबविले

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील कर्मचारी, अधिकार्यांनी गेल्या अनेक वर्षापासून जाणून-बुजून वेतन, सातवा वेतन आयोग, वैद्यकीय बिले, सेवा ज्येष्ठता असताना प्रभारी मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती देण्यास टाळाटाळ केले आहे. यासाठी तीस टक्के लाच मागत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

## दक्षिण तालुक्यात ‘कृषी भवन’ उभारण्याची मागणी

### आ. सुभाष देशमुखांनी घेतली कृषिमंत्र्यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी व ग्रामस्थांच्या मागण्यांबाबत मंत्रालयात आ. सुभाष देशमुख यांनी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याशी चर्चा केली. या बैठकीत दक्षिण सोलापूर तालुक्यात कृषी भवन आणि कृषी मॉल उभारणीच्या प्रस्ताव आ. देशमुख यांनी मांडला. राज्यभरात कृषी भवन उभारणीसाठी अंमलबजावणी सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश कृषिमंत्र्यांनी दिले.

आ. देशमुख यांनी सोलापूरमधील अन्न उत्कृष्टता केंद्र हे स्मार्ट प्रकल्पांतर्गत गतीने पूर्ण



करणे, सिंचन सुविधांचा विस्तार करावा, सामूहिक शेततळ्यांसाठी निधी वाढवणे, क्षारपट जमिनींचे पुनर्वसन करावे, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे तसेच स्वतंत्र सेंद्रिय खते दुकाने सुरू करण्यासंदर्भातही सखोल चर्चा झाली. एक गाव - एक पीक’ या योजनेंतर्गत तालुक्यातील निवडलेल्या गावांमध्ये पायलट प्रकल्प राबवण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार अंत्रोळी (द्राक्षे), मंद्रूप (गुलछडी), वडजी (गुलाब), बक्षीहिप्परगे (गाजर) आणि बोरामणी (घेवडा) या गावांमध्ये ही योजना प्रभावीपणे अंमलात आणली जाणार आहे. बसवनगर येथे कृषी मॉल स्थापन करण्याबाबत तसेच करमाळा भागात केळी उत्पादनाच्या पार्श्वभूमीवर केळी संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी जागा पाहण्याच्या सूचनाही यावेळी कृषिमंत्र्यांनी दिल्या. पीक विमा योजनेतील अडचणी सोडवण्यासाठी स्थानिक तलाठ्यांना जबाबदारी देण्याच्या नवकल्पनेवरही सकारात्मक चर्चा झाली.

### ‘कृषी भवन’ मुळे शेतकऱ्यांची प्रगती

बैठकीत झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी प्रत्यक्षात होऊन शेतकरी बांधवांना थेट फायदा मिळणार आहे. दक्षिण सोलापूरच्या शाश्वत व सर्वांगीण शेती विकासासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतीला दिशा देण्यासाठी आणि शेतकऱ्यांना बळकटी देण्यासाठी झालेला हा संवाद फायदेशीर ठरेल.

**- आ. सुभाष देशमुख**

## अचानक ब्रेक लावल्याने पाच वाहनांचा विचित्र अपघात

### मोहोळजवळील घटना, कोणतीही जीवितहानी नाही

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.४ जून-**

येथील शीतल हॉटेलजवळ एका वाहनाने अचानक ब्रेक लावल्याने पाठीमागून येणाऱ्या चार वाहनांनी एकमेकांना ठोकरले. ही घटना मंगळवारी सकाळी पुणे महामार्गावर घडली. अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार एका वाहनाने अचानक ब्रेक लावल्याने मागून येणाऱ्या ४ ते ५ वाहनांची एकमेकांना पाठीमागून धडक बसली. अपघात वाहनांचे किरकोळ नुकसान झाले. वाहन थांबवताना कसलीही दर्शक सूचना न करता रस्त्यावर वाहन थांबवल्याने मागून येणाऱ्या वाहन चालकांना अचानक ब्रेक लावता आला नाही. एकामागून एक अशी चार वाहने एकमेकांवर धडकली. अशी साखळी अपघाताची ही घटना घडली. वाहतूक शाखेचे कर्मचारी तत्काळ घटनास्थळी पोहोचले.

# माळशिरसमध्ये भाजपाची तयारी; विरोधी गटात बंडाळीची शक्यता?

### आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीवर होताहेत खलबतं

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ४ जून-**

लोकसभा व विधानसभा निवडणुकीत माळशिरस तालुक्यातील एकेकाळचे कट्टर विरोधक मोहीते-पाटील व जानकर गटाची युती झाली. लोकसभेला धैर्यशील मोहीते-पाटील खासदार झाले तर विधानसभेला उत्तम राव जानकर आमदार झाले. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत साटे-लोटे झाले. पण आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तिकीट वाटपाचा पेच सुटणार का हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य







संस्थेच्या निवडणुकीत कोणाचे पारडे जड होणार याची चर्चा रंगली आहे.

माळशिरस तालुक्यात ११ जिल्हा परिषद गट तर पंचायत समितीचे २२ गण आहेत. यामध्ये मोहिते पाटील व जानकर गटामध्ये तिकीट वाटप कसे होणार याची औत्सुक्यता आहे. कारण हे दोन्ही गट पूर्वीपासून जिल्हा परिषद व पंचायत समितीला विरोधात लढत आलेले आहेत. बऱ्याच जिल्हा परिषद गटात व पंचायत समिती गणात मोहिते-पाटलांचे वर्चस्व आहे. मग यामध्ये जर जानकर गटाने तिकीट मागणी केली तर मोहिते पाटलांचे कार्यकर्ते याठिकाणी बंडाळी करणार का, मग अंतर्गत बंडाळी झाल्यावर जानकर गटाचा तोटा तर विरोधी गटाचा नक्कीच फायदा होणार. विधानसभा व लोकसभा निवडणुकीत आपल्या कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत संधी देण्याचे आश्वासन दिले आहे.

मोहिते-पाटील व जानकर गटाच्या युतीमुळे यंदाच्या निवडणुकीचे चित्र वेगळे दिसणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची राजकीय समिकरणे कशी असणार याची चर्चा रंगलीीआहे.

यामुळे कार्यकर्ते तिकिटासाठी प्रयत्न करणार. दोन्ही गटात तिकीट वाटपाचा प्रश्न कसा मिटणार हा पेच दोन्ही गटात आहे. यामुळे बऱ्याच जिल्हा परिषद व पंचायत समिती गणात बंडखोरी होणार हे निश्चित आहे. मोहिते-पाटील गटाच्या कार्यकर्त्याला तिकीट दिले तर जानकर गटाच्या कार्यकर्ते काय करणार याची सध्या तालुक्यात जोरदार चर्चा सुरु आहे. नेत्यांनी कार्यकर्त्यांना दिलेला शब्द पाळावा लागणार आहे. अन्यथा बंडाळी होणार का आणि या बंडाळीचा फायदा भाजपला होणार का अशीदेखील चर्चा रंगली आहे. केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार असल्याने माजी आमदार राम सातपुते यांना राजकीय ताकत मिळत आहे. माळशिरस तालुका हा मोहिते-पाटलांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. माजी आमदार राम सातपुते या मतदारसंघात पाय रोवण्याचा प्रयत्न करीत आहेत. माळशिरस तालुक्यातील मोहिते-पाटलांचे पूर्वीचे जवळपास सर्वच विरोधक आता त्यांच्यासोबत आहेत. त्यामुळे तालुक्यात त्यांच्या गटाची राजकीय ताकत वाढल्याचे चित्र आहे. माजी आमदार सातपुते हे आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत काय रणिणती आखणार याचीदेखील तालुक्यात उत्सुकता लागलेली आहे.